Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
(Journal No. 47023)

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK



Volume - X, Issue - II,
May - October - 2022
English / Marathi / Hindi

Impact Factor / Indexing
2020 - 6.495
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - X Issue - II May - October - 2022

ENGLISH / MARATHI / HINDI

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023**

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.495
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

VOLUME - X, ISSUE - II - MAY - OCTOBER - 2022
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात संस्कृत चलचित्रपटांचा प्रवास : एक दृष्टिक्षेप<br>प्रा. दर्शना सायम | १-४ |
| २ | नक्षलवादी चळवळ<br>प्रा. गणेश ब. भागडे | ५-७ |
| ३ | चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे आर्थिक अध्ययन<br>हरिष एम. बावनगडे | ८-११ |
| ४ | राज्यशास्त्राच्या प्रभावी अध्यापनासाठी उपयुक्त : चर्चा पद्धती<br>प्रा. डॉ. योगेश दा. उगले | १२-१५ |
| ५ | प्रज्ञाचक्षु श्रीसंतगुलाबराव महाराज यांच्या योगदर्शनातील भक्ती प्रकार एक अभिनव विचार<br>सहा. प्रा. प्रज्ञा विश्वासराव इंगळे | १६-२२ |
| ६ | ख्यालगायकीत बदललेली वर्तमान स्थिती<br>प्रा. दत्तात्रय जोशी | २३-२८ |
| ७ | भारतीय डिजिटल लायब्ररी<br>नितेश गुलाब चामाटे | २९-३४ |
| ८ | मानवी जीवनात संगीताचे स्थान आणि आवश्यकता<br>डॉ. स्नेहल सुनील डहाळे | ३५-३८ |
| ९ | अटल पेंशन योजनेचे आर्थिक दृष्टिकोनातून अध्ययन<br>स्वाती र. चौधरी<br>प्रो. डॉ. सुनील श्री. केदार | ३९-४३ |
| १० | चिमूर तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील शिलेदार<br>प्रा. प्रफुल्ल एम. राजुरवाडे<br>डॉ. बी. आर. मस्के | ४४-४७ |

# ५. प्रज्ञाचक्षु श्रीसंतगुलाबराव महाराज यांच्या योगदर्शनातील भक्ती प्रकार एक अभिनव विचार

सहा. प्रा. प्रज्ञा विश्वासराव इंगळे
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, पार्वती नगर नं. २, अकोली रोड, अमरावती.

सारांश

प्रज्ञाचक्षु श्री. संत गुलाबराव महाराज यांचे एकूण १२४ साहित्य प्रसिद्ध आहे. यात हि साहित्य संस्कृत, हिंदी, मराठी, ब्रजभाषेतील आहे, त्यातील ३१ ग्रंथ हे संस्कृतमध्ये उपलब्ध आहे. महाराजांची प्रज्ञा, प्रतिभा स्मरणशक्ति, ज्ञानलालसा, चिकित्सक बुद्धी, खंडन मंडण युक्ती व त्यातून तयार झालेली ग्रंथसंपदा जणु एक नवीन अविष्कारच होय. महाराज यांनी भक्तीवर बरेच अभिनव विचार मांडले आहे. कारण साधक जेव्हा ईश्वर भक्ती करतो व त्या ईश्वराला प्राप्त करण्याची इच्छा करतो. तेव्हा भक्ताने ईश्वराची उपासना भक्तीच्या १६ प्रकारचे कशी करावी व ब्रह्मानंद तथा ईश्वरप्राप्ती कशी करावी या विषयी नऊ भक्तीच्या पलीकडील आणखी नवीन ७ भक्ती प्रकार आपल्या ग्रंथात मांडला आहे. तोच नाविन्यपूर्ण भक्ती प्रकार अर्थात १६ प्रकारची भक्ती हा शोधनिबंधाचा प्रमुख विषय मांडण्याचा प्रयत्न यात केला आहे.

प्रस्तावना

विदर्भाची माती अतिशय सकस या मातीत एक विलक्षण परंपरा लाभली आहे. या मातीत अनेक थोर संत महात्मे जन्माला आले असून त्यापैकी श्री संत ज्ञानियाचे राजे ज्ञानेश्वर महाराज यांच्या सारख्या श्रेष्ठ अश्या सुप्रसिद्ध माऊलीची ठिकाणी आपली श्रद्धा भक्ती एकवटून एकरूप झालेली आहे. श्री संत गुलाबराव महाराज प्रज्ञाचक्षु प्राप्त झालेले महापुरुष आहेत. केवळ अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर विश्वाला आपल्या आध्यात्मिक वेदांत शास्त्राच्या त्रिकालज्ञानाचा सिद्धांत बोधरुपी अमृत प्रदान करणारा असा महान दैवी पुरुष म्हणजे संत गुलाबराव महाराज होय.

गुलाबराव महाराजांचे साहित्य हे एक काळाची गरज आहे. गुलाबराव महाराजांचा काळ हा विसाव्या शतकातील मानला जातो. बालांध असलेल्या या संताची वास्तव्य इहलोकात फक्त ३४ वर्षाचे होते. एवढ्या अल्पवयीतली त्यांची ग्रंथसंपदा अपार आहे. महाराजांचा जन्म माधान या गावाच्या मोहोड या कुळात जन्मलेले हे बालक समन्वयमहर्षी, मधुराद्वैताचार्य, ज्ञानेश्वर कन्या, आंधळी गौळण या विविध नावाने जगप्रसिद्ध आहे. महाराजांच्या अमर ग्रंथसंपदेतील एक लेणे म्हणजे 'योगप्रभाव' हा ग्रंथ होय. भगवान पंतजलीनी योगशास्त्राचे संपूर्ण विवेचन सूत्ररूपाने केलेले आहे. यात एकून १९५ सूत्र असून ४ पादात विभागले आहे.

योग प्रभाव या अलौकिक ग्रंथामध्ये महाराजांनी शिष्यांचे तोंडी प्रश्न घातले आहेत व स्वतः त्याची उत्तरे दिली आहे. वास्तविक प्रश्नकर्ता व उत्तर दाता हे दोन्हीही महाराजच आहे. परंतु सर्व सामान्य भक्तास योगमार्गात आणि भक्तीमार्गात साधारणपणे कोणत्या समस्या येऊ शकतात हे धरून प्रश्न रूपाने शिष्यांचे निमित्त करून हे प्रश्न विचारले आहे व अत्यंत विचारपूर्वक मान पूर्वक परंतु सोप्या भाषेत उत्तरे दिली आहे. या ग्रंथात योगाचे महत्व विशद केले आहे. परंतु जिज्ञासू दृष्टीने योग प्रभावाचे वाचन, मनन व चिंतन केले असता "योगप्रभाव" हा भक्तीमार्गाची शास्त्रीय ग्रंथ होय असे मनोमन वाटते.

सगुण व निर्गुण हे दोन्ही एकरूप परमात्म्याची रूपे आहेत. तथापि सगुण भक्ति, भक्तांना सहज सुलभ आहे असे महाराज म्हणतात.

योगमार्गात पदोपदी अनेक विघ्ने उत्पन्न होतात व योगसिद्धी दुरावते म्हणूनच गुलाबराव महाराजांनी ‘ईश्वर प्रानिधानाध्दा’ या सूत्राचा अर्थ स्पष्ट करतांना भक्ती मार्गाची नितांत आवश्यकता वर्णिलेली आहे. केवळ आसने, प्राणायामादी करून अनेक सिद्धी प्राप्त करून घेणे हे योगाचे खरे ऐश्वर्य नसून भगवदप्राप्ती हे सर्व योगाचे आसीम साध्य आहे. आणि म्हणूनच भगवतप्राप्ती भक्तीमार्गाने किती सुलभ व सहज साध्य आहे. हे महाराजांनी योगप्रभाव या ग्रंथामध्ये रहस्यमय व तुलनात्मक शास्त्रीयपद्धतीने सिद्ध करून दाखविले आहे. प्रस्तुत योगप्रभाव ग्रंथात श्री महाराजांनी ज्ञानोतर भक्तीची गूढ तत्वे अलंकारिक पद्धतीने सांगितली असल्यामुळे हा ग्रंथ प्रसादपूर्ण वारसमय झाला आहे.

**संशोधन पद्धत**

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक पद्धतीचा वापर केले आहे तसेच ग्रंथलीयन पद्धतीचा वापर करून हा शोधनिबंध प्रस्तुत केला आहे.

**प्रमुख विषय :- भक्तीचे १६ प्रकार**

भक्ती वाङ्मयामध्ये दोन तीन पद्धतीनी भक्तीचे निरूपण केलेले आढळते. गीतेमध्ये आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी असेभक्ताचे प्रकार आहेत. कुठे नवविधा भक्ती सांगितली ती पुढीलप्रमाणे कुठे लालन, वात्सल्य, माधुर्य, तर कुठे गौणी व परा वगैरे पद्धतीनी भक्तीचे स्वरुप सांगितले जाते. या सर्व प्रकारांना एकत्र करून, त्यांची उत्तरोत्तर संगती लावून भक्तीची व्यवस्था समजावून घ्यावयाची असेल तर श्री. गुलाबराव महाराजांनी गोविंदानंदसुधा, प्रीतीनर्तन आदी भगवदसौरभ या ग्रंथातून केलेले विवेचन समजून घ्यावे लागेल.

महाराजांनी भक्तीचे गौणी, मध्यमा आणि परा असे मुख्य तीन प्रकार करून त्यांचेही एकूण सोळा प्रकारात विभाजन केले आहे. ते पुढील प्रमाणे -




**१. श्रवण** :- इतिहास पुराणादिकांत वर्णन केलेल्या भगवतकथा किंवा भक्तांच्या कथा गुरु मुखाने श्रवण कराव्यातदनुसार ध्यान करावे म्हणजे सर्वगुण आणि अवतार लीला आपल्या उपास्य विग्रहांच्या आहेत अशी भावना दृढ करावी ह्यालाच श्रवणभक्ती म्हणावी याच श्रवण भक्तीने फक्त सात दिवसात उद्धरून जाणारा महाभागवत राजा परीक्षित होऊन गेला. श्री शुकाचार्यांनी त्याला भगवत ऐकविले त्यात ज्ञान, वैराग्य आणि प्रेम यांनी परिपूर्ण असलेल्या श्रीकृष्णाच्या लीला वर्णन केल्या आणि एका सप्ताहात परमगती प्राप्त करून घेतले.

**२. कीर्तन** :- सज्जनांच्या मुख्यातून जे भगवंताचे षड्गुणे ऐश्वर्य श्रवण केले, ज्या लीला गुरुमुखाने ऐकिल्या त्याच स्वमुखाने पुन:पुन: वर्णन करावया तेच कीर्तन होय. या कीर्तन भक्तीचे आदर्श देवर्षि श्री. नारदाचार्य आहेत. कीर्तनाची परंपरा त्यांच्या पासूनच सुरु झाली. ते कीर्तन परंपरेचे आचार्य आहेत. भगवान नारद म्हणतात की वीणेचे तार छेडले की भगवान बोलावल्या प्रमाणे माझ्या हृदयात अविर्भूत होतात.

**३. स्मरण** :- जेव्हा आपण संतमुखाने भगवतलीलांचे श्रवण करीत नाही किंवा स्वमुखाने कीर्तन करीत नाही त्यावेळी त्या लीलांचे अन्त: करण्यात स्मरण करीत असावे. या एकांतातील स्मरणामुळे कीर्तनाचा आनंद अन्त: करणा कायम मिळू लागतो.

उदा : भक्त प्रल्हादाने अगदी बालपणापासुन 'नारायण' या नामाचे सतत स्मरण केले. अशा प्रकारे भक्त प्रल्हादाने जागतीत, स्वप्नात व सुषुप्तीत अखंड स्मरण केल्यामुळे नरसिंह अवतार घेऊन भगवंताने त्याचे संरक्षण केले. असा प्रल्हाद महान भक्त म्हणू आजही सर्वांना वंदनीय असा आदर्श आहे. या नाम स्मरणानेच योगाची अष्टांगे साधून भक्त पूर्ण कसा होतो याचे वर्णन महाराजांनी एका अभंगात केले आहे.

"योगाचे अष्टांग नामीच | मिळती नामले वैदांती मिश्रित की" ||

४. पादसेवन :- संत हे ईश्वर आहेत असे समजून त्यांची, तशीच श्री. गुरुंची, किंवा आपल्या आवडीच्या मूर्तीची प्रक्षालनादी उपचारांनी पादपूजा करणे म्हणजे पादसेवन होय. या पादसेवन भक्तित श्रीलक्ष्मी हीच सर्वश्रेष्ठ आहे. शेषनागावर विश्रांती घेत असलेल्या भगवान विष्णूच्या चरणांचे संवाहन ती अखंड करीत असते.

५. अर्चन :- अर्चन म्हणजे षोडशोपचारांनी भगवदविग्रहाचे सर्वांगपूजन करणे. आपल्याला जे जे पदार्थ प्रिय वाटतात ते ते सर्व भगवंताला समर्पण करणे. दही दुधाने स्नान घालणे, वैदिक मंत्रांनी अभिषेक करणे, सुवासिक फुल वाहणे, धूपादिप, नैवेद्य, आरती वगैरेचा, समावेश होतो. भावना दृढ होण्यासाठी प्रत्यक्षपूजेपेक्षा मानसपूजा श्रेष्ठ आहे.

६. वंदन :- अर्चन भक्तीमध्ये पूजाकरीत असताना मी पूजा करणार आहे. असा अभिमान उत्पन्न होतो. तो पूजभिमान नष्ट करण्यास सर्व प्रकारची लोकलाज सोडून भगवंताला नमन करावयास हवे अश्या नमन आपोआप दिनता आणि लाघव साधकांकडे येते. नमन केल्याने अत्यंत लहानपणा स्वतःकडे येतो त्या लहान पणाच्या बळावरच साधक पूर्ण अशा गुरुपदावर आरुढ होतो. हि वंदन भक्ती साधकाला जशी उपयोगी आहे तशी भक्तीलाहि परिपोषक आहे.

७. दास्य :- वंदन भक्तीने दिनता अन्तः करणात रुजली की मग सेवक जशी स्वामीची सेवा करतो त्याप्रमाणे भक्त भगवंताची सर्व प्रकारची सेवा आनंदाने करु लागतो पूजा करुनही पूजकत्वाचा अभिमान त्याला शिवत नाही मंदिराच्या झाडलोटी पासुन तो चरण संवाहनापर्यंत सर्व प्रकारचे दास्य करतो. उदा: भगवान रामचंद्राचे दास्य करण्याऱ्या हनुमानाला तोड नाही असे रामायणावरुन आढळते.

८. सख्य (मैत्री) :- दास्यभक्तीने दीनता आणि लघुता अंगी बाणली की भक्त स्वतःला निस्साधन समजू लागतो त्याला वाटते की आपण श्रीगुरुंची किंवा भगवंताची पूर्णपणे सेवा करु शकत नाही. आपल्यात किती तरी उणीवा आहेत. अशी दिन भावना तीव्र होऊ लागली की त्याचा त्राता भगवंता शिवाय कोणी राहत नाही. त्यांच्या आर्त पुकारला भगवान 'ओ' देतो आणि त्याचा मित्र होऊन राहतो अश्या रीतीने भगवानच त्याचा सखा झाला की मित्रत्वाच्या नात्याने तोच त्याला परमार्थाच्या उच्चासनावर नेऊन बसवितो. उदा : कृष्णार्जुनांचे आहे. मित्र मित्राशी मनात येईल तसे वागतो. अर्जुन कृष्णाशी भांडला, कृष्णाला आपल्या रथाचे सारथी केले. पण भगवंताने आपला मोठेपणा पाहिला नाही. उलट पापण्या जशा नेत्रांचे रक्षण करतात तसे अर्जुनाचे मित्ररुपाने रक्षण केले आणि युद्धासारख्या प्रसंगी त्याचा मोह दूर करण्यासाठी गीतादेखील सांगितली तीत उपदेश केला. विश्वरुप दाखविले आणि आत्मज्ञानसंपन्न केले.

आत्मनिवेदनाने जीव ब्रह्माचे एक्य होते असल्यामुळे ज्ञान प्राप्ती असल्याने, आत्मनिवे पनरुप नवव्या भक्तिला महाराजांनी मध्यमा प्रकारात समाविष्ट केले आहे. वरील अष्टविधा भक्तिील 'मी उपासना करणारा आह' हि अहंता नाहीशी करण्यासाठी भगवंताच्या चरणी आत्म निवेदन केले जाते. या अहंतेचे

दोन प्रकार आहेत. ममता आणि अहंता हे दोन्ही प्रकार समर्पण झाले की, जीवब्रह्माचे ऐक्य होते आत्मज्ञान होते म्हणून हि भक्ती गौणी नसून ज्ञानोत्तर मध्यमा भक्ती आहे.

९. ममता समर्पण :- इदं - प्रत्ययाने निर्दिष्ट असलेले 'सर्व मम' मध्ये अंतर्भूत होते. 'मला पाहिजे असलेले' आणि 'माझे असलेले' सर्व भगवंताला अर्पण केले की ममतासमर्पण झाले.

१०. अहंता समर्पण :- आपण अन्नमय देहाला 'मी' समजतो, म्हणून अहंता समर्पण करायची असल्यास प्रथम आपला देह भगवदर्पण करायला हवा. देह आणि श्रोत्रादी सर्व इंद्रिये भगवंताचीच आहेत असे समजून त्याचा उपयोग भगवंतासाठीच केला पाहिजे नंतर प्राण, मन, बुद्धी आणि शेवटी अहंकार देखील अर्पण झाला पाहिजे देहापासुन बुद्धी - अहंकारापर्यंत सर्व अहंतास्पद पदार्थ अर्पण झाले की शेवटी मी नसून भगवानच आहे असा अनुभव येतो. हेच पूर्ण अहंतेचे पूर्ण समर्पण होय.

आत्मनिवेदनाने ममता व अहंता समर्पण झाली की भक्त समाधीत आत्मैक्य करून अद्वैत - ज्ञानाने पूर्ण होतो. यासमाधीत तो परब्रह्मांशी संपूर्णत: एकरूप झालेला असतो.

११. लालन भक्ती :- आत्मनिवेदन पूर्ण झाले की भक्त - भगवंताचे ऐक्य होते. या एक्या समाधीतून भक्ती व्युत्थान पावला की अहंवृत्ती उत्पन्न होते हा अहंवृत्तीवर आरूढ असलेला कोण ? मी भगवंताचा आहे असे म्हणण्यात स्वत:कडे लहानपणा येते - व मोठे पण भगवंताकडे जाते भगवान व श्रीगुरु एकच असल्याने श्रीहरीची किंवा गुरूची भक्तीतो करतो 'मी त्याचा आहे ' असे म्हणतांना माता - पिता समजून भगवंतावर प्रेम करतो. भक्त स्वत:ला ज्ञानहंता येईल म्हणून या ज्ञानाहंतारूप संकटातून वाचविण्यासाठी भगवंताला 'पिता' म्हणून हाक मारतो. आणि आवडीने आळवायचे असेल तर लाडिवाळपणे 'आई' म्हणून हाक मारतो किंवा गुरुलच मातापिता समजून हि लालन भक्ति केली जाते.

१२. वात्सल्यभक्ती :- 'मम एव असौ' म्हणजे माझा भगवान आहे भावना. म्हणजेच वात्सल्यभक्ती यामध्ये स्वत:कडे मोठेपणा घेतला जातो आतापर्यंत लालनादी भक्तीत भगवंताने भक्तासाठीजे कष्ट घेतले त्या आठवणीमुळे भक्ताचे अंत:करण पिळवटून निघते यापुढे मात्र भगवंताला कष्ट होऊ नये म्हणून भक्त भगवंताला आपले लहान बाल समजतो आणि स्वत: कडे आईपणा होतो त्याच्या मनात येते की मी रडून रडून माझ्या श्रीहरीला फार कष्ट दिले आणि स्वत मात्र त्याची काहीच सेवा केली नाही.

त्याला भक्तांचे इतिहास आठवतात की लालन भक्तीत पंढरीनाथ दामाजी साठी महार झाला. जनाबाईकरता दळू लागला, एकनाथांच्या घरी चंदन उगाळीत असे प्रल्हादासाठी नृसिंघवतार घेतला आशा प्रकारे लालनभक्तीत भगवान भक्ताकर्ता सर्व प्रकारचे कष्ट घेतो पण भक्ताला दु:ख होऊ देत नाही हे सारे आठवून भक्ताचे अंत:करण व्याकुळ होते म्हणून तो भगवंताला आपले बाळ करतो आणि स्वत:आई होऊन सर्व प्रकारे सेवा करतो.

अशा प्रकारे महाराजांनी माधुर्यभक्तीची, समन्वयपूर्वक उत्पत्ती दाखविली आहे. हिलाच पराभक्ती म्हटले आहे. या माधुर्य भक्तीचे संयोग व वियोग हे दोन प्रकार करून पुन: त्यांचेही प्रत्येक गुप्त आणि

स्पष्ट असे दोन भेद दाखविले आहेत. असे हे पराभक्तीचे ४ प्रकार प्रितीनर्तन या ग्रंथात सविस्तर पणे महाराजांनी मांडले आहे.

१३. गुप्त संयोगरूप माधुर्यभक्ती :- भक्त आपल्या हृद संपुटात भगवंताचा साक्षात्कार करून घेतो पण बाहेर मात्र साऱ्या संसारात त्याला दुःख देणारे वैरी दिसतात. कामक्रोधादी सर्व विकार, मन, बुद्धी, अहंकार वैगैरे सर्वच त्याच्या भगवत्साक्षात्कारात आड येत असतात. म्हणून या सर्व वैऱ्यापासुन दूर आशा आपल्या हृदयातच तो भगवंताला लपवून ठेवतो. कधी कधी भक्त अहंकार व कामक्रोधादी विकरांना कुटुंब कल्पितो आणि स्वतः परस्त्रीत्व होऊन जारबुद्धीने भगवंताशी हृदमंचकावर प्रेमक्रिडा करतो.

१४. स्पष्ट संयोगरुपी माधुर्य भक्ती :- सद्गुरु गुलाबराव महाराज विश्वास वृत्तीच्या साह्याने आणि कात्यायनी व्रताच्या पूर्तीमुळे भगवान श्रीकृष्ण साक्षात पती म्हनुन लाभतात. म्हणजे हृदयातील भगवंत्साक्षात्कार बाहेर देखील अनुभवाला जातो. हाच अन्वयानुभव होय. गुप्त संयोग शृंगारात असलेला मनाचा संवेग तीव्रतम झाला की डोळे मिटले तर हृदयात आणि डोळे उघडले की बाहेर, अशी अन्तर्बाह्य सर्वत्र एक भगवंताची सावली सुकुमार मूर्तीच अनुभवाला येते असा हा नित्य संयोग प्राप्तझाला की तोच स्पष्ट संयोग श्रृंगार होय.

१५. गुप्त विप्रलंभरुपी माधुर्य भक्ति :- गुप्त विप्रलंभ म्हणजे हृदयातील भगवंतमूर्तीचा वियोग होणे. रासक्रीडेमध्ये गोपीना किंचित अभिमान झाला. आम्हाला भगवान प्राप्त झाले. आम्ही धन्य झालो अशी धन्यता वाटली म्हणजे भक्तित रसास्वाद विघ्न आले. असा गोपीचा सौभगपद नाहीसा करण्यासाठी आणि त्यांच्यावर प्रसाद करण्यासाठी भगवान त्यांच्या हृदयातच अन्तर्धान पावले गोपींना बाहेरही भगवान दिसेना आणि हृदयातच दिसेना.

१६. स्पष्ट विप्रलंभ भक्ती :- अन्तर्बाह्य सर्वत्र भगवंताचा वियोग अनुभवायाला येणे म्हणजे स्पष्ट विप्रलंभरुपा भक्ति होय. ◘अन्तरी बाहेर उमटे शोक | शोका पाठीपोटी वज्रनायक◘ यात जेव्हा भगवान लपला तेव्हा गोपी बावरी होऊन बाहेर पाहू लागली परंतु बाहेरही भगवान दिसेना तेव्हा मात्र विरहानलाने तिची अवस्था बेभान झाली आत आणि बाहेर वियोगाने शोकाकुल होऊन व्याकुळ झाली या शोका पूर्वी भगवंताचा संयोग होता व नंतर देखील संयोगच होणार म्हणजे शोकाच्या पाठीपोटी वज्रनायक असल्यामुळे तिच्या अनुभवाला आतबाहेर सर्वत्र चेतन ब्रह्मच भासू लागले सर्व जडभाव नाहीसा झाला सर्व विश्वात तिला प्रियसखीच दिसू लागल्या.

अन्तर्बाह्य भगवंताचा संयोग असूनही गोपींच्या प्रेमाचे समाधान होत नाही अहंबुद्धी होत नाही किंवा प्रेमस्थितीची जाणीव म्हणजे ज्ञातता देखील येऊ देत नाही. तिच्या प्रेमाचा प्रवाह, खंडित न होता, सतत सगुण अनभ्यस्त विवर्त भगवंताकडे वाहत राहतो.

**निष्कर्ष**

संत गुलाबराव महाराजांनी भक्तिचे १६ प्रकार स्वतःच्या अनुभवातून सिद्ध करुण दाखविले आहे. परंतु हे भक्ती प्रकार सर्व सामान्य जनते पर्यंत पोहचावे व त्यांना सुद्धा भगवंत प्राप्ती व्हावी अशी इच्छा असेल तर कोणत्याही भक्तासाठी गुलाबराव महाराजांनी सांगितलेल्या १६ भक्ती मार्गाचा अवलंब केला तर त्याला भगवंत प्राप्ती झाल्या शिवाय राहणार नाही आणि म्हणूनच गुलाबराव महाराजांचे भक्ती विषयक अभिनव विचार सर्वांपर्यंत पोहचले पाहिजे हे शोधनिबंधाचे फलित होईल.

**संदर्भ ग्रंथसूची**

-प्रकाशन-

१. योगप्रभाव - श्री. गुलाबराव महाराज सर्वोदय ट्रस्ट आळंदी
२. योगदर्शन (भगवान कुळकर्णी) - नंदिनी संतोष हांबोळी, सिंहगड रोड, पुणे
३. भक्तिशास्त्र( डॉ. कृष्ण माधव घटाटे) - श्री. गुलाबराव महाराज सर्वोदय ट्रस्ट आळंदी, पुणे.
४. भक्तीपुरुष(स्मरणिका)- श्री. संत गुलाबराव महाराज भक्तीधाम, श्री. क्षेत्र चांदूर बाजार.

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## March-2023

ISSUE No - (CCCXCVIII) 398 (B)

## A Journey of Indian women



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor
Dr.V.R.Kodape
Principal
Shri Kisanlal Nathmal Goenka Arts & Com.
College Karanja (LAD) Dist. Washim

**The Journal is indexed in:**
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO-398 -A

ISSN : 2278-9308 March, 2023

# लोककला विश्वातील लोकप्रिय महिला कलावंत लावणी सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर

**प्रा. जगन्नाथ इंगोले**

संगीत विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती,मो. नं. ९७६६७४८६९८

महाराष्ट्राची लोककला विविध अंगी लोककला म्हणूनमानली जाते. या कलेनी समाजभान जागण्याचे मोठे कार्य केले आहे. या लोककलेत पोवाडा, भारुड, खडी गम्मत, लावणी, गोंधळ, जागरण, वाघ्या मुरळी या सारख्या अनेक लोककलांचा समावेश होतो. या सर्व कला सादर करण्यात पुरुषा प्रमाणेच महिलांनी सुध्दा अमुल्य योगदान दिले आहे. अश्याच लावणी या लोकप्रिय कला प्रकारात आपले वेगळे विश्व निर्माण करणारी लोकप्रिय महिला कलावंत म्हणजे लावणी सम्राज्ञी **विठाबाई नारायण गावकर**ह्या होत्या.

विठाबाई नारायणगावकर यांचा जन्म **भाऊसाहेब खुडे (नारायण गावकर) व शांताबाई** या तमाशा कलावंताच्या पोटी पंढरपूर येथे झाला. महाराष्ट्राचे दैवत विठ्ठलावर अपार श्रद्धा असलेल्या भाऊंनी आपल्या मुलीचे नाव **'विठा'** ठेवले. भाऊ व पुतण्या बापू यांना तमाशा या लोककलेचे वेडलागले होते. गावोगावी तमाशा कला सादर करणाऱ्या ह्या कलावंतांनी पुणे जिल्ह्यातील ओतूर, घोनवड, मंचर, आळे जुन्नर, बेल्हे नगर, कोथुळ, नासिक इत्यादी लहान मोठ्या शहरात व जिल्ह्यात आपला तमाशा सादर करुन मनोरंजनाचे कार्य करीत होते. अल्प कालावधीत समाजात भाऊबापू यांच्या तमाशांनी एक आगळे वेगळे स्थान मिळविले होते. **'विठा'** ही लहानशी चुणचुणी सर्व कला प्रकार सुक्ष्मपणे पाहात वाढत होती. आपली मुलगी शिक्षण घेवून मोठी व्हावी असे स्वप्न पाहत भाऊंनी विठाबाईला शाळेत घातले. परंतु कलेचे बाळकडू प्राशन केलेल्या विठाबाईचे मन शाळेत रमत नसे. विठाचे शिक्षणात लक्ष लागत नाही हे ओळखून भाऊंनी विठाबाईला नृत्याच धडे देण्याचे ठरविले. त्या काळात **'तमाशा'** कला प्रकारात पुरुष स्त्री वेश धारण करुन नाचत असे. भाऊंनी स्त्री कलावंतांना प्रथम रंगमंचावर प्राधान्य देऊन बापुची पत्नी अनुसयाबाई हिला नाचण्यास प्रवृत्त केले व तमाशा कलेत एक नवीन प्रथा सुरु झाली. भाऊ बापूचे नाव सर्वत्र गाजू लागले पुढील काळात**'विठा'** नावाची एक कोवळी सुंदर मुलगी भाऊबापूंच्या तमाशात कलावंत म्हणून नावारुपास आली.

विठाबाईचे पाय तमाशाच्या रंगमंचावर पडताच रसिक मनात धडकी भरत होती. कारण विठाबाई म्हणजे तमाशा क्षेत्रातील एक मुर्तीमंत देणगीच ! उंच शरीर, सळपातळ बांधा, कटाक्ष नयन, गोरापान वर्ण व इतकाच गोड आवाज या गुण वैशिष्ट्यांनीविठाबाई रसिक जनांची आवडती नृत्यांगणा झाली होती. आपल्या सुंदर नृत्यांनी व वजनदार गाण्याच्या चालिनी, विठाबाईच्या तमाशात गर्दी वाढत होती. त्याकाळात तमाश्या क्षेत्रात बकुळा इस्लामपूरकर, विमलजळगावकर, कलावंती येवलेकर, जोहराबाई, लीला गांधी, यशोदाबाई वाईकर, लीलाबाई वाईकर इत्यादी स्त्री कलावंतांनी तमाशा कलावंत म्हणून सुरवात केली होती. परंतु तमाशात केवळ नाचणे नव्हे तर अभिनयांची गरज असते. त्याचे प्रत्यक्ष उदा: म्हणजे विठाबाई होती. त्या तमाश्यात इतक्या बेभान होऊन नाचत होत्या की नाचावेतर विठाबाईनीच असे वाटत होते. त्यांच्या नृत्यकलेवरुन त्यांना लावणीच्या लावण्यवती सम्राज्ञी म्हणून विठाबाईला संबोधल्या जात असावे. त्यातमाशाच्या क्षेत्रात आपल्या गोड आवाजांनी आणि मनमोहक नृत्याने रसिकांची मने जिंकत होत्या त्यामुळेच तिला लोक तमाशाची किंवा लावणीची सम्राज्ञी म्हणून ओळखू लागले. अनेक वर्ष तमाशा लोककलेत आपले समर्पण देणारी विठाबाई नारायणगावकर एक प्रतिभावंत स्त्रीकलावंत होत्या.

त्यांनी लोकरंजना बरोबरच लोकशिक्षण देणे हा प्रबोधनाचा वसा घेवून कार्य केले **"वसईच्या गावीत बिगी बिगी चालीत दारात तुमच्या आली,** आली मुंबईची केळीवाली" ची भूमिका लोकप्रिय ठरली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत योगदान देणाऱ्या या कलावतीने देशासाठी प्राणप्राणाने लढणाऱ्या सैनिकांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्यक्ष युद्ध भूमीवर जावून लोककला सादर केली होती. युद्ध भूमीवर लढणाऱ्या सैनिकांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रत्यक्ष युद्धभूमीवर कला सादर करणारी एकमेव स्त्री योद्धा कलावंत म्हणजे विठाबाई नारायणगावकर होय. आजपर्यंत कोणत्याही स्त्री कलावंतांना हा बहुमान प्राप्त झाला नाही अशी धाडसी कलावंत म्हणून विठाबाईची ख्याती होती. तमाशा या लोककलेला राजप्रतिष्ठा प्राप्त करुन देणाऱ्या विठाबाईंनी अनेक पुरस्कार प्राप्त झाले होते. त्यांनी चि. शांताराम निर्मित 'जन्माची गाठ' 'उमज पडल तर' 'छोटे जवान''सर्व साक्षी''तर सांगते ऐका'या मराठी चित्रपटातून भूमिका साकार केल्या होत्या. मराठी चित्रपटातून मोलाची कामगिरी करणाऱ्या विठाबाई चित्रपट सृष्टीत रमल्या नाही. त्या खऱ्या लोककलावंत होत्या.संगीत नाटक अकादमीचा राष्ट्रीय पुरस्कार तसेच १९६३ मध्ये राष्ट्रपती पुरस्कारा साठी विठाबाईची निवड झाली होती.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO-398 -A
ISSN : 2278-9308
March, 2023

सामाजिक जाणीव ठेवून कला सादर करणारी विठाबाई एक धाडसी कलावंत म्हणून गणल्या जातात. कलेच्या क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण करणारी ही कलाकाराची कलावंताचा मान वाढवीणारी होती. आपल्या कलेनी रसिकांचे मन तृप्त करणारी विठाबाई तमाशाच्या रंगमंचावर नेहमीच गात होती.

**"नाच गं घुमा पाहून चंद्र मनाची मनाची**
**पोटासाठी नाचते मी पर्वा कोणाची"**

**निष्कर्ष -**

महाराष्ट्राच्या तमाशा लोककलेत लावणी प्रकाराला राजप्रतिष्ठा प्राप्त करुन देणाऱ्या **विठाबाई नारायणगावकर** एक प्रतिभावंत स्त्री कलावंत ठरतात. त्यांनी महाराष्ट्राच्या तमाशा कलेला अधिक लोकप्रियता मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

**संदर्भ -**

१) तमाशा सम्राज्ञी विठाबाई भाऊ नारायणगावकर -खुशाल खडसे - नेहा प्रकाशन, नागपूर
२) आठवणीतील विठाबाई (लोकमत - २० जाने २००१) – प्रा. मिलिंद कसबे
३) महाराष्ट्राची मिठाराणी (सकाळ दिवाळी अंक २०१५) – विश्वास पाटील
४) तमाशा विठाबाईच्या आयुष्याचा -योगीराज वागुल, राजहंस प्रकाशन

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

March -23

(CDIII) 403









**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
**Principal**
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 22 | भारतीय बँकिंग क्षेत्र – आव्हाने व संधी **डॉ. गजानन सोमकुंवर** | 92 |
| 23 | छत्रपती संभाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण : एक अभ्यास **प्रा.डॉ.साईनाथ शेटोड** | 97 |
| 24 | भारतीय अर्थव्यवस्थेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान **प्रा. निलेश अरूण दुर्गे** | 101 |
| 25 | महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प 2023 : कृषी विकासातून समृद्धीकडे **डॉ सुनिता कलावे,** | 105 |
| 26 | शेरशहाच्या शासन व्यवस्थेचे मुल्यमापन **प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर** | 110 |
| 27 | ऑनलाइन व्यापार व त्याचे त्याचे परिणाम **प्रा. डॉ. जयंत पोरे** | 114 |
| 28 | कृषि पर्यटन में अपार संभावनाएं **डॉ. एम.आर. दातीर** | 117 |
| 29 | ग. दि. माडगूळकरांचा सिध्दहस्त लेखनीचा सौंदर्योत्सव : 'चैत्रबन' **प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने** | 122 |
| 30 | प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्याची प्रेरणा **सहा.प्रा.दीपक स.वानखडे** | 126 |
| 31 | कोविड-19 महामारीमध्ये ग्रंथालय उपक्रम **डॉ. राठोड सुखलाल शामराव** | 130 |
| 32 | *Road Accessibility and location of the industries* A Case study of Amravati District. **Dr. Anilkumar Gopi Prasad** | 134 |
| 33 | संदर्भ व्यवस्थापन प्रणालीद्वारे संशोधन कार्यक्षमतेत वाढ **डॉ. प्रतिभा न. बराडे,** | 138 |
| 34 | महात्मा गांधी आणि ग्रामीण शिक्षण **प्रा. डॉ. नितीन दादाराव गौरखेडे** | 142 |
| 35 | महिलांसाठी कायदे व योजना आणि महिला सक्षमीकरण **प्रा.डॉ.आसाराम दि.चव्हाण** | 144 |

ISSN : 2278-9308
March, 2023

# प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्याची प्रेरणा

सहा.प्रा.दीपक स.वानखडे
मराठी विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

**परिचय :—**

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे हे मराठी साहित्यातील एक बहुप्रसवा साहित्यिक असून त्यांचा जन्म वर्धा जिल्हयातील खडकी या गावी ११ नोव्हेंबर १९३२ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव चंद्रभानजी तर आईचे नाव अन्नपूर्णा होते. १९५८ साली शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या नोकरीची सुरूवात केली आणि १९९१ साली पुणे येथील एस.सी.ई.आर.टी. या संस्थेतून वर्ग एक राजपत्रित अधिकारी म्हणून ते निवृत्त झाले. यादरम्यान त्यांनी काव्य, कथा, कादंबरी, चरित्र, प्रवासवर्णन, वैचारिक व संपादित अशा विविध साहित्य प्रकारांमध्ये लेखन करून ३० पुस्तकांची निर्मिती केली आहे. सद्यस्थितीत ते अमरावती येथे राहत असून आज वयाच्या ९१ व्या वर्षीसुद्धा त्यांचे लेखन कार्य चालूच आहे. त्यांची आत्मकथन व सत्यार्जनी धर्माभियान: एक अस्वस्थ शुभ वर्तमान अशी दोन पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये त्यांच्या साहित्याची प्रेरणा कोणती आहे हे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याकरिता त्यांच्या आजपर्यंतच्या साहित्यनिर्मितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्यनिर्मितीचा संक्षिप्त आढावा :—**

१९५९ साली कांग्रेसच्या नागपूर येथील अधिवेशनात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांचे आष्टी स्वातंत्र्य संग्रामाची कहानी सांगणारे 'अभिषेक' नावाचे प्रथम पुस्तक प्रकाशित झाले. त्यांचे हे पुस्तक हिंदी भाषेमध्ये होते. त्यांच्या ह्या पुस्तकानेच त्यांच्या वाङ्‌मयीन प्रवासाला सुरूवात झाली. १९५८ मध्ये शिवाजी विधी महाविद्यालय, अमरावती येथे शिकत असतांनाच त्यांनी ह्या पुस्तकाच्या लेखनाला सुरूवात केली होती. पुढे १९५८ च्या आक्टोबर महिन्यात त्यांनी नया अकोला येथील जनपद हायस्कूलमध्ये नोकरी स्वीकारली आणि १९६१ मध्ये त्यांचे लग्नही झाले. त्यामुळे त्यांच्या वाङ्‌मय निर्मितीमध्ये काही काळ खंड पडला.

१९५४ मध्येच त्यांनी अमरावती येथील कंवर नगरातील महानुभाव आश्रमाचे महंत कविश्वर कुळाचार्य श्री. मुरलीधर बाबा कारंजेकर यांच्याकडून गुरूमंत्र घेऊन उपदेश घेतला होता. येथूनच त्यांच्या महानुभाव जीवन प्रवासाला सुरूवात झाली व त्यांनी महानुभाव साहित्याचे वाचन व संशोधनालाही सुरूवात केली. हयाच कालावधीत डॉ. वि.भि. कोलते यांचे 'महानुभाव संशोधन : १' हे पुस्तक प्रकाशित झाले. डॉ. कोलत्यांनी ह्या पुस्तकाव्दारे महानुभाव पंथ हा अवैदिक असल्याची मांडणी केली तेव्हा त्यांचे हे मत खोडून काढण्याकरिता प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी १९६७ साली 'वादप्रवाद' हे पुस्तक प्रकाशित केले. त्यानंतर महानुभाव पंथीय तत्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला कवी विश्वनाथ व्यास बाळापूरकर कृत 'ज्ञानप्रबोध' हा ग्रंथ त्यांनी १९७१ मध्ये संपादित केला. त्यानंतर वारकरी कीर्तनकार ॲड. ल.सि. चौधरी यांच्या महानुभाव पंथावरील 'महात्मा उर्फ मानभाव पंथ व चक्रधर' या टीकात्मक पुस्तकाला उत्तर म्हणून १९७२ साली त्यांनी 'महानुभाव.एक आव्हान' हे पुस्तक प्रकाशित केले. याचवर्षी अष्टमहासिध्दी ह्या महानुभाव तीर्थस्थळाचे महात्म्य वर्णन करणारे 'अष्टमहासिध्दी महात्म्य तथा स्तोत्र' हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले.

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे हे अमरावती जिल्हयातील चिखलदरा येथील विद्यानिकेतन पब्लिक स्कूलमध्ये रेक्टर म्हणून काम करीत असतांना चिखलदरा येथे प्रौढ शिक्षणाचे एक साहित्यनिर्मिती शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या शिबिरामध्ये त्यांनी 'पिवळा मोती' हे पुस्तक लिहिले जे जुलै १९७८ मध्ये प्रकाशित झाले. त्यानंतर फेब्रुवारी १९८२ मध्ये श्रीचक्रधर स्वामी यांच्या जीवनावरील 'जय श्री चक्रधरा' ही कादंबरी व जुलै १९८२ मध्ये श्री चक्रधरस्वामी यांचे जीवन, कार्य व तत्त्वज्ञान यांचे सम्यक व सर्वांगीण दर्शन घडविणारा 'श्री. चक्रधर दर्शन' हा ग्रंथ डॉ.वि.भि.

कोल्हे, महंत श्री. नागराज बाबा महानुभाव व डॉ. यु.म. पठाण यांच्यासह संपादित केला. तसेच १९८३ साली त्यांची 'जय श्री चक्रधर' ही कादंबरी हिंदी भाषेत प्रकाशित झाली.

अमरावती जिल्हा प्रौढ शिक्षण प्रकल्पाधिकारी म्हणून काम करीत असतांना १९८५ मध्ये त्यांनी प्रौढ शिक्षण वर्गातील प्रौढांकरिता 'सूर्य उगवला' ही प्रबोधनात्मक पुस्तिका प्रकाशित केली. तर १९८६ मध्ये महानुभाव तीर्थ आणि प्रसादांची माहिती देणारे 'तीर्थप्रसाद' व प्रौढ शिक्षण वर्गातील प्रौढांकरिता 'रिवाज तोडो' ही प्रबोधनात्मक हिंदी पुस्तिका प्रकाशित केली सोबतच लीळाचरित्राचाच अंगभूत भाग असलेल्या पण स्थळनिर्देश नसलेल्या लीळांचा 'अज्ञात लीळा' हा ग्रंथ डॉ. व.दि. कुळकर्णी यांच्यासह तसेच लग्नविधी व हिंदू धर्मातील इतर महत्वाचा धार्मिक विधीचे संकलन असणारे 'पौरोहित्य' हे पुस्तक त्यांनी संपादित केले. १९८७ साली पुन्हा प्रौढ शिक्षण वर्गातील प्रौढांकरिता 'शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख' ही छोटेखानी चरित्रात्मक पुस्तिका व 'पंचकृष्ण' हा महानुभाव पंथातील पंचकृष्णांचा चरित्रात्मक ग्रंथ प्रकाशित केला. यानंतर त्यांचा महानुभाव पंथावर विविध लेखकांनी, कीर्तनकारांनी, तत्वचिंतकांनी केलेले आरोप खोडून काढणारा व महानुभाव पंथ व महानुभाव तत्वज्ञानाची सुयोग्य अशी मांडणी करणारा त्यांच्या एकूणच साहित्यातील अत्यंत महत्वाचा असा 'पुनर्शोध' हा ग्रंथ मार्च १९९१ मध्ये प्रकाशित झाला.

१९९९ साली शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने त्यांनी युरोपचा दौरा केला व ह्या दौऱ्याचे वर्णन करणारे 'चा युरोपा' हे प्रवास वर्णन त्यांनी लिहिले; परंतु काही कारणास्तव हे प्रवास वर्णन प्रकाशित होऊ शकले नाही. पुढे ९ जानेवारी २००० रोजी रिध्दपूर येथील महाचिंतनीतील, 'चक्रधरोक्त सूत्रातील आरोग्य चिंतन' हे भाषणरूपी पुस्तक त्यांनी प्रकाशित केले.

श्रीचक्रधर स्वामींच्या लोकोत्तर कार्याची ओळख करून देणारा तसेच त्यांच्या जीवन—कार्याची आटोपशीर व नेटक्या स्वरूपात माहिती देणारा 'सर्वज्ञ श्री चक्रधर' हा त्यांचा ग्रंथ जून २००२ मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईने प्रकाशित केला.''पंढरी संदेश या साप्ताहिकाच्या दि. ०४/१२/२००२ च्या आळंदी विशेषांकात महानुभाव संप्रदायाची निंदानालस्ती करणारे, अत्यंत, शिवराळ, असभ्य भाषेतील 'चार लेख' प्रसिध्द करण्यात आले. त्यातील मजकूर आणि भाषा दोन्ही निषेधार्ह आहेत''[8] या लेखास उत्तर म्हणून जुलै २००३ मध्ये त्यांचा 'पंढरीस संदेश' हा ग्रंथ तर ऑगस्ट २००३ मध्ये तळवेल जि. अमरावती येथील भैयासाहेब देशमुख यांचे 'तळवेलीतला नरसिंह' हे चरित्रात्मक पुस्तक त्यांनी प्रकाशित झाले.

''टाकळी जि. औरंगाबाद येथील आचार्य श्री. विद्याधर बाबा पंजाबी यांच्या आश्रमाच्या विशाल प्रांगणात पार पडलेल्या धर्मसभेत श्री. बाबुराव बाम लिखित 'वारकरी संप्रदाय विजय' सारख्या निंदात्मक प्रकाशनास आणि महानुभावांच्या निंदा करणाऱ्या प्रयत्नास पंथीयांचे वतीने साधार उत्तर तयार करून ते प्रकाशित करण्याचे ठरविले होते''[9] त्यानुसार १ सप्टेंबर २००८ मध्ये प्रा. पुरूषोतम नागपुरे यांनी 'धर्मजय' हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. सप्टेंबर २०१५ मध्ये त्यांच्या 'जय श्री चक्रधर' ह्या श्रीचक्रधर स्वामींच्या जीवनावरील २४ वर्ष फौजदारी केस चाललेल्या कादंबरीचीच 'उत्तरयात्री' ही आवृत्ती प्रकाशित झाली. तर नोव्हेंबर २०१५ मध्ये त्यांची अचलपूरचा राजा रामदरण्याचा इतिहास वर्णन करणारी 'दरणा' ही कादंबरी व सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या १२४४ सूत्रांचा ससंदर्भ अर्थ सांगणारा, महानुभाव तत्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत मोलाचा असा 'ब्रम्हविद्या : सूत्रार्थ प्रकाश' हा ग्रंथ प्रकाशित झाला.

महानुभाव संप्रदाय हा हिंदुधर्मांतर्गत असलेला 'हिंदू संप्रदाय' नसून तो स्वतंत्र व परिपूर्ण असा धर्म आहे. ह्या गंभीर विचाराची मांडणी करणारा 'महानुभाव एक स्वतंत्र व परिपूर्ण धर्म' हा ग्रंथ मार्च २०१७ मध्ये तर लीळाचरित्र, सिध्दांत सूत्रपाठ, दृष्टांतपाठ आणि उध्दरणाच्या प्रक्रियेस उपयुक्त अशा सूत्रांचे सार्थ विवरण देणाऱ्या 'सार्थक लीळाचरित्र' ह्या ग्रंथाची मराठी आणि हिंदी आवृत्ती एप्रिल २०१७ प्रकाशित झाली.

मराठी भाषेतील पहिला गद्य ग्रंथ जो महानुभाव पंथीयांचा सर्वात महत्वाचा ग्रंथ असून ज्याला 'महानुभाव पंथीयांची गीता' असेही म्हटले जाते. असा म्हाइंभटकृत 'लीळाचरित्र' हा ग्रंथ जानेवारी २०१८ मध्ये आणि उपदेश करतांना श्रीचक्रधर स्वामींनी सांगितलेल्या दृष्टांताचे संकलन असलेला कोशिराजबासकृत 'दृष्टांत पाठ' हा ग्रंथ त्यांनी सप्टेंबर २०२१ मध्ये संपादित केला.

याशिवाय प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी 'ओज' हया साप्ताहिक पत्रिकेचे अनेक वर्ष संपादक म्हणून कार्य केले असून त्यांनी 'महानुभाव' मासिकाच्या संपादक मंडळातही कार्य केले आहे ते महानुभाव साहित्य महामंडळाचे अध्यक्ष असून हया मंडळाने आजवर एकूण १४ महानुभाव साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. अशाप्रकारे प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांचा साहित्य प्रवास असून त्यांचे महानुभाव पंथाच्या प्रचार व प्रसाराचे कार्य आणि साहित्य लेखन आजही चालूच आहे. त्यांनी श्रीचक्रधर स्वामी यांच्या संपूर्ण जीवन कार्याचे वर्णन करणारा 'सत्यार्जवी धर्मभियान : एक अत्यंत शुभ वर्तमान' हा ग्रंथ नुकताच लिहून पूर्ण केला असून हया ग्रंथासह त्यांचे आत्मकथन प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

**प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्य निर्मितीची प्रेरणा :–**

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांचे समग्र वाङ्मय महानुभाव साहित्य विश्वाला पर्यायाने मराठी साहित्याला मौलिक योगदान देणारे आहे. एकुणच त्यांचे लेखन समाजप्रबोधनासाठी उपकारक असेच आहे. त्यांच्या लेखन प्रपंचामुळे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान व समाजोध्दारक विचार सर्व समाजापर्यंत पोहचविण्यास मोलाची मदत झाली आहे.

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्याची प्रेरणा महानुभाव पंथाचे प्रणेते सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांचे समाजोध्दारक तत्त्वज्ञान हीच आहे. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या क्रांतिकारी विचारातच त्यांच्या लेखनामागील प्रेरणा दडलेल्या आहेत. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींना तत्कालीन समाजातील सर्व सामान्यांचे दु:ख दिसले, त्यांची पीडा दिसली, तत्कालीन समाजातील विषमता दिसली, दैन्य दिसले, दास्य दिसले, देवा–धर्माच्या नावावर सर्वसामान्यांची होणारी लुबाडणूक व शोषण दिसले. अंधश्रध्दा, यज्ञयाग, कर्मकांड यामध्ये आकंठ बुडालेला व अनेकानेक देविदेवतांच्या पूजेमध्ये गुरफटलेला सर्वसामान्य वर्ग व त्यामुळे त्यांचे होणारे धार्मिक अध:पतन हे सर्व सर्व पाहून त्यांचे मन करूणेने ओथंबून गेले आणि मग त्यांनी हया सर्व दु:खाच्या मुक्तीचा मार्ग सांगितला. ते म्हणजेच त्यांचे महानुभावीय तत्त्वज्ञान होय.

ज्या काळामध्ये संपूर्ण समाजावर वर्णव्यवस्थेचा पगडा होता व ब्राहमण हाच सर्वश्रेष्ठ वर्ग आणि महार मांगादी जातींना नीच आणि कनिष्ठ समजल्या जात होते. अशा काळात 'शिखासूत्रांचा त्याग करून, महारवाडयावरून धर्म काढा' असे सांगणे म्हणजे त्याकाळी किती मोठा विद्रोह होता ? म्हणून अशी शिकवण देणारा महानुभाव पंथ म्हणजे केवळ एक संप्रदायच नव्हता तर ती एक चळवळ होती. अशाप्रकारे ''परंपरेला न स्वीकारता एक स्वतंत्र जीवनधारेचा मार्ग चक्रधरांनी अनुसरला व आपल्याबरोबर हजारोंना ते घेऊन गेले''[1] सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या हयाच जीवन व कार्याचा प्रभाव प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या जीवनदृष्टीवर पडलेला आहे. त्यामुळे महानुभाव तत्त्वज्ञान हीच त्यांच्या साहित्याची वैचारिक प्रेरणा आहे. त्यांच्या हया वैचारिक तळमळीतूनच वादप्रवाद, महानुभाव : एक आव्हान धर्मजय, पुनर्शोध, लीळाचरित्र, दृष्टांतपाठ, ब्रम्हविद्या सूत्रार्थ प्रकाश, सार्थक लीळाचरित्र, हया वैचारिक संशोधनात्मक व संपादित ग्रंथाची निर्मिती झाली आहे. एका महानुभाव कुटुंबात जन्माला आल्यामुळे अगदी जन्मापासूनच त्यांच्यावर धार्मिक संस्कार होतेच. शिवाय त्यांच्या वडिलांचा आष्टी येथील स्वातंत्र्यसंग्राम चळवळीत असलेला सक्रीय सहभाग; हयामुळे त्यांचे मन अगदी लहानपणापासूनच सर्वज्ञ श्रीचक्रधरांच्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाच्या विचाराने संस्कारित झाले होते. शिवाय १९५४ साली त्यांनी अमरावती येथील कंवर नगरातील महानुभाव आश्रमाचे महंत कविश्वर कुळाचार्य श्रीमुरलीधर बाबा कारंजेकर यांच्याकडून उपदेश घेतला होता. याच काळात त्यांच्या महानुभाव साहित्य वाचनालाही सुरूवात झाली होती. पुढे १९५८ मध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी स्वीकारली. या काळात त्यांच्या वाचनातही भरगच्च अशी वाढझाली आणि १९५९ पासून त्यांनी वाङ्मय निर्मितीलाही सुरूवात केली. अशाप्रकारे श्रीचक्रधर स्वामींच्या स्वातंत्र्यवादी विचारांच्या प्रेरणेतूनच 'अभिषेक' हया आष्टीच्या स्वातंत्र्य संग्रामाची कहाणी सांगणाऱ्या हिंदी भाषेतील त्यांच्या प्रथम पुस्तकाची निर्मिती झाली.

पुढे काही काळानंतर त्यांची मुख्याध्यापकपदी नियुक्ती झाली आणि त्यानंतर ते प्रौढ शिक्षण अभियानांतर्गत अमरावती जिल्हा प्रौढ शिक्षण प्रकल्पाधिकारी म्हणून नियुक्त झाले. हयाच काळात त्यांची प्रौढ शिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रौढांसाठी गद्य वाचन म्हणून १९८६ साली 'सूर्य उगवला' हे मराठी भाषेतील व 'रिवाज तोडो' हे हिंदी भाषेतील जुन्या रीती–रिवाज परंपरांना छेद देणाऱ्या व

ISSN : 2278-9308
March, 2023

अंधश्रद्धेला विरोध करणाऱ्या प्रबोधनात्मक कथांची पुस्तके प्रकाशित झाली. त्यांच्या ह्या पुस्तकामागेही सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या प्रबोधनात्मक विचारांचीच प्रेरणा असल्याचे दिसून येते.

सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे कार्य बघता त्याकाळी येथील कर्मठ धर्मपंडितांनी जे ब्रह्मज्ञान संस्कृत भाषेच्या कडीकुलुपामध्ये बंदिस्त करून ठेवले होते, त्या ब्रह्मज्ञानाला संस्कृत भाषेच्या कडीकुलुपातून मुक्त करून मराठीसारख्या लोकभाषेमध्ये सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी आपले तत्वज्ञान लोकांसमोर मांडले. एवढेच नाही तर वर्णव्यवस्था, जातिभेद, कर्मकांड यांना कट्टर विरोध करून सर्व जातिपातीच्या लोकांना हृदयाशी धरले. तसेच स्त्रीशूद्रांनाही आपल्या धर्माची दारे मोकळी करून दिली. एका मातंगाच्या हातचा लाडू स्वत: खाऊन ब्राह्मण शिष्यांनाही प्रसाद म्हणून खायला दिला. अशा या थोर महापुरुषाविषयी मनामध्ये श्रद्धा व भक्ती निर्माण होणे साहजिकच आहे. म्हणून हा महापुरुष व त्याचे कार्य सहज सोप्या भाषेत लोकांपर्यंत पोहोचावे याकरिता प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांनी 'जयश्री चक्रधर' व 'उत्तरार्धी' अशा कादंबऱ्यांची तसेच 'सर्वज्ञ श्री चक्रधर' 'पंचकृष्ण' इ. चरित्रात्मक पुस्तकांची निर्मिती केली. यातून त्यांची सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींवरील श्रद्धा, भक्ती व पंथनिष्ठा अगदी स्पष्टपणे दिसून येते.

अशाप्रकारे प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांचे साहित्य पंथनिष्ठेच्या प्रेरणेतूनच निर्माण झालेले असून त्यांच्या साहित्यनिर्मितीमागे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या वैचारिक प्रेरणेचा भक्कम असा पाया असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

**निष्कर्ष :–**

१) प्रा. पुरुषोत्तम नागपुरे हे मराठी साहित्यातील एक महत्वपूर्ण व बहुप्रसवा साहित्यिक आहेत.

२) प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांनी वैचारिक संशोधित, संपादित व ललित अशा विविध प्रकारात साहित्य निर्मिती केली आहे.

३) प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांनी आपल्या साहित्यनिर्मितीची सुरूवात आष्टी येथील स्वातंत्र्यसंग्रामाची कथा सांगणाऱ्या 'अभिषेक' या हिंदी पुस्तकाने केली.

४) प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांनी १९५४ साली वयाच्या २२ व्या वर्षी महानुभाव पंथाचा उपदेश घेतला.

५) महानुभाव पंथाचा उपदेश घेतल्यानंतर त्यांनी महानुभाव साहित्याचे वाचन व संशोधनाला सुरूवात केली.

६) प्रा. पुरुषोत्तम नागपुरे हे महानुभाव साहित्य परंपरेतील एक महत्वपूर्ण साहित्यिक असून त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण साहित्यनिर्मितीने महानुभाव साहित्यामध्ये आपले अढळ असे स्थान निर्माण केले आहे.

८) महानुभाव असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वावर महानुभाव तत्वज्ञान व सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या विचारांचा प्रभाव आहे व या प्रभावातूनच त्यांनी साहित्यनिर्मिती केली आहे.

९) प्रा. पुरुषोत्तम नागपुरे यांच्या संपूर्ण साहित्याचे अवलोकन केले असता पंथनिष्ठा हीच त्यांच्या साहित्यनिर्मितीची प्रेरणा असून त्यांच्या साहित्यनिर्मितीमागे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचे समाजोध्दारक तत्वज्ञान व वैचारिक प्रेरणेचा भक्कम असा पाया असल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची :–**

१) प्रा.नागपुरे पुरुषोत्तम, 'पंढरीचा संदेश', प्रकाशक म. श्री. हंसराजदादा खामनीकर, विश्वस्त अध्यक्ष, सर्वज्ञ विद्यापीठ, माडवाडगाव जि.अहमदनगर, प्रथमावृत्ती जुलै २००३ पृष्ठ क्र. १

२) प्रा.नागपुरे पुरुषोत्तम, – धर्मजय, प्रकाशक – म.श्री. पेढ्यनकर बाबा महानुभाव, आंबेवडगाव जि. जळगावखु प्रथमावृत्ती सप्टेंबर २००८, पृष्ठ क्र. २२

३) डॉ. देशमुख उषा माधव, माया प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर, प्रथमावृत्ती जून २००५, पृष्ठ क्र. ४०

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

वर्ष ४० - अंक २८ - एप्रिल, २०२३ (अधिवेशन विशेषांक)

मुख्य संपादक:
**डॉ. राहुल भगत**

कार्यकारी संपादक:
**डॉ. अर्जुन जाधव**

**संपादक समिती सदस्य:**
डॉ. संपत काळे, डॉ. अर्चना जगतकर, डॉ. ज्योती पोटे,
डॉ. दया पांडे, डॉ. ज्योती गगनग्रास, डॉ. सुधीर येवले.
डॉ. अशोक बोरकर, डॉ. धनंजय सोनटक्के, डॉ. अनिल जायभाये,
डॉ. राजकुमार भगत, डॉ. मधुकर देसले, डॉ. श्रीनिवास पिलगुलवार,

**संपादकीय सल्लागार मंडळ:**
डॉ. उत्तम भोईटे, डॉ. शंकर एल. गायकवाड,
डॉ. पी. जी. जोगदंड, डॉ.प्रदीप आगलावे,
डॉ. स्मिता अवचार, डॉ. सुरेश वाघमारे.

**संपर्क पत्ता:**
अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा: एस. एन. मोर महाविद्यालय,
तुमसर जि. भंडारा - ४४१९१२
Website :www.mspmonline.com E-mail : marathisocio@gmail.com

टंकण व मांडणी: मे.गणेश कॉम्प्युटर टायपिंग ॲन्ड झेरॉक्स सेंटर, राजारामपुरी, कोल्हापूर.
मुद्रित शोधक: संशोधन समितीचे सर्व समन्वयक.

**. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्यांना अंक विनामूल्य.**

सूचना: या अंकातील लेखकांनी व्यक्त केलेली मते ही त्या-त्या लेखकांची आहेत. या मतांशी मराठी समाजशास्त्र परिषद अथवा संपादक मंडळ तसेच प्रकाशक, मुद्रक सहमत असेलच असे नाही.

| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ४५. | लिंग भेदभाव आणि तृतीयपंथी | डॉ.नलिनी ईश्वरदास बोरकर | २२८-२३१ |
| ४६. | समाज माध्यमांवरील जाहिरातींचा समाजावर होणारा परिणाम | डॉ.अंजली जोशी | २३२-२३८ |
| ४७. | समाजमाध्यमांच्या परिणामांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.डॉ.एस.व्ही.भद्रशेटे | २३९-२४२ |
| ४८. | पर्यावरण संवर्धनात प्रसार माध्यमांची भूमिका | डॉ.गोपाल गांगर्डे | २४३-२४७ |
| ४९. | बदलती जीवनशैली आणि आरोग्य | प्रा.डॉ.संभाजी शंकर कुरलीकर | २४८-२५१ |
| ५०. | लोकनिधी (क्राउड फंडिंग) द्वारे पर्यायी कथेची रचना : एक टीका | डॉ.मेघा देशपांडे | २५२-२५४ |
| ५१. | बदलती जीवनशैली आणि आरोग्य | डॉ.आनंद मुसळे | २५५-२५७ |
| ५२. | नागरी समाजातील समस्या एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ.गंगाधर वालू चव्हाण | २५८-२६१ |
| ५३. | आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ.सुनिल प्रल्हाद गायगोळ | २६२-२६७ |
| ५४. | शेतात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांच्या समस्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.सुनिता एस. घोपटे (पाडर) | २६८-२७२ |
| ५५. | भारतातील शेतकऱ्यांच्या समस्याचा अभ्यास | प्रा.डॉ.श्रीराम खाडे | २७३-२७४ |
| ५६. | शेतकरी आत्महत्या एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ.संजय जे. भगत | २७५-२७७ |
| ५७. | शेतकरी कुटुंबाच्या समस्येची ऐतिहासिक पार्श्वभुमी एक अध्ययन | डॉ.बामणे मारोती | २७८-२८० |
| ५८. | शेतकरी चळवळी व वर्तमान कृषी व्यवस्था (विशेष संदर्भ : महाराष्ट्रातील सन १९८० ते १९९० दरम्यान प्रमुख आंदोलने) | डॉ.एच.यु.पेटकर | २८१-२८४ |
| ५९. | लिंब गावातील रासायनिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे व्यष्टी अध्ययन | डॉ.राज चव्हाण<br>कु.वैष्णवी कमलेश सावंत<br>कु.पुर्वा शंकर मापारी | २८५-२९० |
| ६०. | पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन काळाची गरज | प्रा.डॉ.प्रतिभा रंगराव बिरादार | २९१-२९६ |
| ६१. | पश्चिम महाराष्ट्रातील कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ.संजय शामराव कांबळे | २९७-३०३ |
| ६२. | अमरावती विभागातील खारजमीन क्षेत्रातील पाणीपट्ट्यातील सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ.अमरिष एस. गावंडे | ३०४-३०७ |
| ६३. | अंधश्रद्धा निर्मुलन चळवळ : वैज्ञानिक दृष्टिकोन | डॉ.संतोष गोविंद गांगुर्डे | ३०८-३११ |
| ६४. | भारतीय नागरिकांची सामाजिक व राजकीय कर्तव्ये एक समाजशास्त्रीय सिंहावलोकन | डॉ.प्रदीप एच.गजभिये | ३१२-३१५ |
| ६५. | राष्ट्राच्या विकासाकरिता संविधानातील समतेच्या मूल्यांची आवश्यकता | डॉ.माधुरी झाडे | ३१६-३२० |
| ६६. | कोविड-१९ लॉकडाऊनचा भारतीय महिलांच्यावर झालेल्या सायबर हिंसाचाराचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा.राजेंद्र पुंडलिक पवार | ३२१-३२९ |

# शेतकरी आत्महत्या एक समाजशास्त्रीय अध्ययन

*प्रा.डॉ. संजय जे. भगत,

शेतीशी संबंधित असणारे
भारत हा खेड्याचा देश आहे. शेती हा ग्रामीण समुदायाचा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीशी संबंधित असणारे
दुग्धव्यवसाय शेळीपालन, कुक्कुटपालन इ. व्यवसाय ग्रामीण समुदायात आढळून येतात. शेती हा व्यवसाय निसर्गावर अवलंबून
असतो. बऱ्याच ठिकाणी निसर्गाची अवकृपा होतांना दिसून येते. त्यामुळे शेती व्यवसाय हा बिन भरोवश्याचा झाला आहे. तरी
देखील ग्रामीण लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनावर शेती व्यवसायाचा प्रभाव दिसून येतो. शेती हा भारताचा
मुलभूत व प्रमुख भारताती उद्योग असल्यामुळे भारतीय लोक आपल्या उपजिविकेसाठी शेती व शेतीशी निगडीत अशा धंद्यावर
अवलंबून असून शेतीवरील हा भार दिवसेंदिवस वाढत आहे. शेती हा भारताचा प्रमुख धंदा आहे. परंतु तो तत्वाप्रमाणे
बालविण्यात आलेला दिसून येत नाही. बहूतांश शेतकरी अर्धपोटी राहत असून अत्यंत दारिद्र्याच्या स्थितीत जीवन जगत आहे.
पुरेसे उत्पन्न शेतीतून मिळत नाही. भारतीय शेतीची उत्पादनक्षमता कमी असण्याचे कारण भारताच्या जमिनीची परिस्थिती हे तर
आहेत. परंतु त्याचबरोबर शेतमालाच्या विक्रीबाबत व इतर बाह्य अडचणीही कारणीभूत आहेत.

स्वातंत्र्यापूर्वी कुळांना पुरेसे संरक्षण नव्हते त्यामुळे त्यांना शेतीतून जास्तीत जास्त पीक काढण्यासाठी उत्तेजन मिळत
नसे. दरवर्षी कुळे बदलविण्याच्या पध्दतीमुळे शेत करणारा जमिनीची कायम स्वरूपाची कोणतीही सुधारणा करण्याचा प्रयत्न
करीत नसे. स्वातंत्र्यानंतर कुळांना संरक्षण व स्थैर्य देण्यासाठी विविध कायदे करण्यात आले असून कुळांना उत्पादन
वाढविण्यासाठी उत्साह वाटेल अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.

भारतातील शेतीचो सरासरी आकडा साधारणत: ७.५ एकर असला तरीही काही भागात अर्ध्या एकरापेक्षा ही लहान
शेत आढळून येतात. जमिनीचे विभाजन व अपखंडन मोठ्या प्रमाणात झालेल्या असल्यामुळे शेतीचा आकार लहान झाला
आहे. त्यामुळे शेतीचा खर्च वाढुन उत्पादकता कमी झाली आहे.

अलिकडच्या काळात शेती व्यवसाय उत्पन्नाच्या दृष्टीने परवडणारा नाही. कारण शेतीच्या उत्पादनाला हमी भाव नाही.
शेतीची लागवडीचा खर्च सुध्दा शेतकऱ्यांना शेतीच्या उत्पादनातून निघत नाही. ग्रामीण भागातील शेतकरी हा दिवसेंदिवस शेती
व्यवसायामध्ये तोट्यात येत आहे. शेतीसाठी लागवडीसाठी खर्च सुध्दा त्याच्याकडून होत नाही. त्यामुळे तो कर्ज काढून शेती
करीत आहे. कधीकधी सावकाराचे कर्ज काढून शेतीची पेरणी शेतकरी करतो. परंतु पुरेसे उत्पन्न मिळत नसल्यामुळे कर्जबाजारी
होवून शेती विकण्याशिवाय किंवा आत्महत्या करण्याशिवाय त्याच्यापुढे दुसरा पर्याय नसतो. अपुऱ्या उत्पन्नामुळे अनेक
महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आपण नेहमीच वर्तमानपत्रातुन वाचत असतो. आपल्या देशामध्ये शेतकरी
आत्महत्या करण्याचे अनेक कारणे आहेत. अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि वैयक्तिक समस्यांना कंटाळून
आत्महत्या केली जाते. ही वस्तुस्थिती म्हणून भारतातील शेतीला मान्सुनचा जुगार असे म्हटले जाते. याचा अर्थ महाराष्ट्रातील
शेती निसर्गावर अवलंबून असते. त्यामुळे जेव्हा जेव्हा पाऊस पडतो तेव्हा तेव्हा पिकाचे नुकसान होते. कधी पेरणी कधी
पेरणीच्या सुरवातीला पाऊस पडतो नंतर मात्र एक महिना पाऊस पडत नाही. त्यामुळे पिकाचे नुकसान होऊन अपुरे उत्पन्न
मिळते. कधी कधी तर हाता तोंडाशी आलेले पिक अवकाळी पावसामुळे पुर्णपणे निस्तनाभूत होते. शेतकऱ्यांनी केलेल्या
पेरणीचा खर्च सुध्दा त्यामधुन निघत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकारापासुन कर्ज काढल्यामुळे ते कर्ज परत करता येत नाही.
त्यामुळे शेतकऱ्या समोर आत्महत्या केल्याशिवाय पर्यायच उरत नाही. जेव्हा शेतकरी आत्महत्या करतो तेव्हा त्यांच्या कुटूंबाला
नुकसान भरपाई दिली जाते मात्र जेव्हा जेव्हा शेतकरी कर्जबाजारी असतो तेव्हा मात्र शासन त्याला पुरेशी मदत करत नाही.
त्यामुळे त्यांच्या समोर नैराश्याची भावना निर्माण होवून आत्महत्या केल्याशिवाय त्याला पर्यायच उरत नाही.

**संशोधनाचे उद्देश :-**

- शेतकरी आत्महत्येच्या समस्यांचा अभ्यास करणे.
- शेतकऱ्याच्या आत्महत्येची कारणे शोधने.
- शेतकरी आत्महत्येच्या संदर्भात उपाय योजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधाकरिता दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला असून तथ्य संकलन ग्रंथ, मासिके,
वर्तमानपत्र, इंटरनेटच्या माध्यमाने केले आहे. व माहितीची मांडणी विश्लेषनात्मक केली आहे.

**शेतकरी आत्महत्येची कारणे मीमांसा :–**

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करण्याचा शोध घेत असतांना शेतकऱ्यांच्या आत्महत्या हया केवळ शेतकऱ्यांची अंतर्गत बाब नाही ही एक चिंतनीय बाब आहे. निराशा आणि वैफल्य ग्रस्त हे जरी आत्महत्येचे कारण असले तरी एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी आत्महत्या करतो ही चिंतनीय बाब आहे. नेमके कोणत्या कारणाने शेतकरी आत्महत्या करीत आहे याचे कारण अजुनही संशोधकाला कळले नाही. शेतकऱ्याचे आत्महत्येचे कोणतेही एक कारण नसुन अनेक कारणांचा तो परिणाम असतो. अनेक कारणे इतकी ऐकमेकात गुंतलेली असतात की त्यामुळे कोणतेही एक्च कारणाने आत्महत्या केली हे सांगणे कठीण जाते. कर्जबाजारी पणा हे शेतकऱ्याचे ऐकमेव कारण मानले तर असा प्रश्न निर्माण होतो की, कर्जबाजारी असणारे इतर शेतकरी आत्महत्या का करीत नाहीत. आत्महत्येची जी कारणे सांगितली जातात ती वेगळीच असतात.

**शेतकरी आत्महत्येची कारणे :–**

१) कर्जबाजारीपणा :– शेतकरी कर्जकाढून शेती करतो शेतकऱ्यांना आपल्या उत्पादन खर्च वसूल होईल एवढा भाव मिळत नाही. बाजार पेठे मध्ये त्याच्या मालाला हमीभाव मिळत नाही. ज्यावर्षी पिक, उत्पन झाले नाही तरी पुढील वर्षी आपल्याला शेतीतील पिकाला उत्पन होईल हमी भाव मिळेल या आशेने तो पुन्हा कर्ज काढतो परिणामी तो आनखीही कर्ज बाजारी होत जातो. पुढे त्याला निराशा वैफल्य ग्रस्तता येते त्यातुन तो आत्महत्येचा मार्ग निवडतो.

२) निर्सगावर आधारित शेती :– भारतातील शेती ही बहुतांश निर्सगावर अवलंबुन असते. पाऊस चांगल्या प्रमाणात पडला तर पिक चांगले होऊन चांगले उत्पन्न होईल. अन्यथा पिक होणार नाही. अशी परिस्थीती निर्माण होते. विदर्भात जुन, जुलै महिन्यामध्ये शेतीची पेरणी केल्यानंतर थोडयाफार प्रमाणात पाऊस पडतो नंतर पंधरा दिवस एक एक महिना शेतकरी इनाकडे पाणी येण्याची वाट बघत असतो. पावसाच्या लहरीपणा मुळे पाऊस वेळेवर येत नाही. शेतातील बी–बियाणे वाया जाते तेव्हा शेतकरी निराश होतो. आणि त्याच्या मनात आत्महत्या करण्याचे विचार येतात.

३) सिंचनाच्या अपुऱ्या सोयी :– कोरडवाहू शेतीमध्ये कमी पावसामध्ये येणारे पिक घ्यावे लागते. सिंचनाची सोय शेतकऱ्यांना नसल्यामुळे पाण्याअभावी अपुरे उत्पन मिळते. पाऊस नियमित येत नसल्यामुळे हाताशी आलेले पिक अपुरे होते. सिंचनाची सोय नसल्यामुळे शेतकरी निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागते त्यामुळे त्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण होऊन शेतकरी आत्महत्या ग्रस्त होतो.

**४) अपुरे भांडवल :–** शेतीमध्ये पेरणी करण्याकरीता मशागत करण्यापासून लागणारा खर्च बी–बियाणे, पेरणी आंतरमशागत, रासायनिक खतांचा खर्च, फवारणी, मळणीचा खर्च करावा लागतो म्हणजे पिक शेतातून घरात, घरातून बाजारात नेण्यापर्यंत येणारा खर्च व त्या पिकातून उभा राहिलेला पैसा यामध्ये खुप तफावत पडते. या पिकात नफा आला तर ठिक, पण जर यामध्ये तोटा आला तर त्या शेतकऱ्याजवळील भांडवल पूर्णपणे त्या पिकात लागलेले असते. जवळचा सर्व पैसा निघून गेल्याने त्यात कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या खर्चाची भर पडल्याने शेतकरी आर्थिकदृष्टया हतबल होऊन जातो. अपुरे भांडवल असल्यामुळे शेतीकरीता जमेल त्या स्थितीत पेरणी करतो. त्यानंतर त्याला उत्पन कमी मिळते त्यातुन त्याला नैराश्याची स्थिती निर्माण होते.

**५) व्यसनाधिनता :–** शेतकऱ्याच्या आत्महत्येला जशी अनेक कारणे जबाबदार आहेत त्यापैकी व्यसनाधिनता हे एक प्रमुख कारण आहेत. या व्यसनामुळे शेतकऱ्यांचा उत्पनाचा बराचसा भाग व्यसनावर खर्च होतो त्यामुळे तो कर्जबाजारी होतो. व्यसनामुळे त्याची शारीरिक हाणी होते. तसेच त्याची कार्यकरण्याची क्षमता ही कमी होते. आणि कुटूंबामध्ये कलह निर्माण होवून कधी कधी कुटूंब विघटन ही होते.

**६) सामाजिक धार्मिक प्रथा व परंपरा :–** भारतीय शेतकरी सामाजिक, रूढी, प्रथा, परंपरा तसेच धार्मिक बंधनामध्ये अडकलेला दिसून येतो. इच्छा नसुन सुध्दा त्याला अनुत्पादक स्वरूपाचा अनावश्यक खर्च करावा लागतो. उदा. लग्नविवाह, मृत्यू इत्यादी प्रसंगी करण्यात येणारे खर्च. या खर्चामुळे त्याचे उत्पन कमी होवून कर्जबाजारीपणा येतो. कारण शेतीमधून जास्त उत्पन्न मिळून बचत होत नाही. घरखर्च आणि शेतीसाठी त्याला कर्ज घ्यावे लागते. परंतु हे कर्ज शेतकऱ्यांना परत करणे शक्य होत नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतो.

**शेतकऱ्याच्या आत्महत्येवरील उपाययोजना :–**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याकरिता त्यावर कोणती उपाययोजना करावी ? हा प्रश्न स्वभाविकपणे निर्माण होतो शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे गंभिर स्वरूप लक्षात घेवून खालील उपाय योजना आमलात आणल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यास मदत होऊ शकते.

१) शेती व शेतीशी पुरक व्यवसायाला प्राधान्य देणे
२) कोरड वाहू शेतीचे क्षेत्र हळूहळू बागायती शेतीमध्ये रूपांतर करून विशेष सिंचन कार्यक्रम राबविणे
३) शेतकऱ्यांना ज्या संस्थेव्दारे कर्ज पुरवठा होतो तो अतिअल्प व्याज दराने उपलब्ध करून देणे
४) शेतकऱ्यांना चांगल्या प्रतिचे बि–बियाणे उपलब्ध करून देणे.
५) अल्पभुधारक शेतकऱ्यांना सरकारी योजने व्दारे मोफत सिंचनाच्या सोई करून देणे.
६) पिक विमा योजनेच्या रक्कमेत वाढ करणे.
७) विवाह समारंभावर अनावश्यक खर्च टाळण्यासाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करून विवाहीत कुटूंबाला आर्थिक मदत करणे.
८) आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटूंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीची तरतुद करावी.
९) आत्महत्या ग्रस्त शेतकरी कुटूंबाला शिक्षणाच्या व आरोग्याच्या सोई उपलब्ध करून देणे.
१०) शेतकऱ्यांना सबसीडी योजनेमध्ये वाढ करावी या योजनेमध्ये खते, औषधी बी–बियाने यावर अनुदान देण्यात यावे.
११) शेतीचा दर्जा सुधारण्यासाठी मोहीम राबवणे.

**निष्कर्ष :–**

वरील अध्ययनामध्ये शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे शेतकरी आत्महत्येचे प्रमुख कारण असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी अल्पभुधारक शेतकऱ्याचे कर्ज माफ करणे आवश्यक आहे. भविष्यात कोणताही शेतकरी आत्महत्या करण्याचा मार्ग निवडणार नाही. शेतकऱ्याला तात्काळ मदत करण्याच्या दृष्टीने सरकारने नविन योजना आखाव्यात. शेतकरी हा आर्थिक संकटात सापडलेला आहे. या संकटातून शेतकऱ्यांना वेळीच सावरणे गरजेचे आहे. यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना मदत करणे गरजेचे आहे. यामधूनच शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारेल व शेतकरी आत्महत्या थांबवील आत्महत्या करणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. डॉ. कविमंडन विजय, आर्थिक विकास व नियोजन.
२. दास्ताने संतोष, महाराष्ट्र २००६ दास्ताने रामचंद्र आणि कंपनी पुणे.
३. डॉ. साळुंके एस. आर, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था.
४. आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन नागपूर
५. डॉ. नरेन्द्र जाधव, शेतकरी आत्महत्या आणि कृषी समोरील आव्हान प्रकाशन २७ जुलै २००८
६. वानखडे चंद्रकांत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या परिसर प्रकाशन अंबे जोगाई.

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, पार्वती नगर अकोली रोड अमरावती.
E-mail : sanjayjbhagat76@gmail.com

***

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed
## Multidisciplinary International Research Journal

**April -2023**

**ISSUE No - (CDVII) 407**








**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci College
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

## INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dalit Literature and Translation | Mr. Shuddhodhan P. Kamble | 1 |
| 2 | A Comparative Analysis Of Geographical Indication Between India And United States | Ms. Shilpa Ram Rathod | 3 |
| 3 | Unveiling the Diverse Male Personalities in Jaishree Misra's Novel ' A Scandalous Secret' | Ajay Madhukarrao Kalmegh | 9 |
| 4 | Economic Ideology of Pandit Jawaharlal Nehru | Prof. Dr. Vijay Dalpatrao Kapse | 13 |
| 5 | Digital Transformation In Finance: Challenges And Future In India | Dr. Patil Bhagwan Shankar | 16 |
| 6 | Green Supply Chain Management | Dr. Sou. Parvati B. Patil | 20 |
| 7 | Urban Expansion and Its Consequences: A Case Study of Chandla Town, Bundelkhand, Madhya Pradesh | Vaseem Ahmad | 25 |
| 8 | New Education Policy: A need of hoursand nor mere an issue | S.S.Arsad | 31 |
| 9 | A Conceptual Review of Literature on Rural-Urban Fringe: A Link with Bilaspur City, Chhattisgarh | Hari Shankar Kumar | 33 |
| 10 | A Study On Financial Performance Of Private Sector Banks On The Basis Of Profitability Analysis. | Dr. Madhavi Mahesh Nighoskar | 41 |
| 11 | A Critical Assessment Of The Election Laws In India | Dr. Mahendra Pachadkar | 48 |
| 12 | Consumer's Demographic Features as contiributors to Hedonic Motivation. | Shreya Gawande | 53 |
| 13 | भारत मे चुनाव सुधार और सशक्त होता लोकतांत्रिक व्यवस्था | आशीष कुमार सिंह | 56 |
| 14 | आदिवासींचे भारतीय स्वतंत्रता आंदोलनातील योगदान एक - ऐतिहासिक अवलोकन | प्रा. डॉ. मस्के नारायण कारभारी | 59 |
| 15 | राज्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटल : एक चिंतन | प्रा.डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे | 63 |
| 16 | क्रिप्टो करेंसी | डॉ . विद्या चत्रे | 67 |
| 17 | बापूसाहेब राजभोज आणि काळाराम मंदिर सत्याग्रह | प्रा. डॉ. किशोर कोंडबाजी काजळे | 72 |
| 18 | स्किझोफेनिया आजार : समज-गैरसमज आणि उपचार | डॉ. विजयता एम. चिटनकर | 83 |
| 19 | जातीसंस्था आणि सामाजिक अशांतता | प्रा. डॉ. संजय जे. भगत | 88 |
| 20 | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील स्त्रियांचे योगदान | प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम | 91 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDVII) 407
ISSN : 2278-9308
April, 2023

# जातीसंस्था आणि सामाजिक अशांतता

प्रा. डॉ. संजय जे. भगत
महात्मा ज्योतिबा फुलेमहाविद्यालय ,अमरावती sanjayjbhagat76@gmail.com

प्रस्तावणा :

भारतीय समाज व्यवस्था ही पूर्णता चातुर्वण्य आणि जातिसंस्थेवर आधारलेली आहे. भारतीय लोकांचे सामाजिक संबंध जातीवर आधारित आहेत. एका जातीने दुसऱ्या जातीतील लोकांशी कोणत्या प्रकारचा सामाजिक व्यवहार करावा हे जातिसंस्थेव्दारे निर्धारीत करण्यात आले होते. ''शैक्षणिक, वैज्ञानिक आणि संशोधनाच्या क्षेत्रात प्रगती झाल्यावर देखील लोकांचा जातीवर अतुट विश्वास आहे. हा केवळ विश्वास नसुन त्यांची श्रध्दा आहे. लोकांची जातीसंस्थेवरली श्रध्दा असण्याचे प्रमुख कारण म्हणजे जाती संस्थेला कायदेशीर मान्यता आहे. पुर्वी जातीच्या नियमांचे उल्लंघन करणे, हा अपराध असून त्यासाठी शिक्षेची तरतुद करण्यात आली होती. जाती नुसार वर्तन करणे हाच त्यांचा धर्म होय असे मानल्या जात होते. जो जातीचे उल्लघन करील त्याला कडक शिक्षा देण्याची तरतुद होती. ज्या लोकांनी जातीच्या नियमांचे पालन केले नाही त्यांना शिक्षा दिल्याचे अनेक उदाहरणे इतिहासामध्ये आढळुन येतात.

भारतीय समाजाचे शेकडो जातीमध्ये विभाजन झाले आहे. त्यामुळे भारतीय समाज हा एकसंघ नाही. या संस्थेस हिंदु धर्माचा आधार आहे. अशी जातिसंस्था जगात इतर कोणत्याही देशात आढळुन येत नाही. भारतात हिंदु धर्माची मान्यता असल्यामुळे जाती व्यवस्था शेकडो वर्षापासुन टिकुन आहे. हिंदु धर्माची प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या जातीची सदस्य आहे. विशेष महत्वाची बाब म्हणजे भारतीय समाजातील व्यक्तीचा दर्जा हा त्याच्या जातीवरून निश्चित होतो. व्यक्तीची ओळख त्याच्या मधील गुणवत्ता किंवा कर्तुत्वावरून केली जात नव्हती. तर जातीच्या आधारवर व्यक्तीची ओळख करण्याची परंपरा आपल्या देशात आहे.

प्रत्येक जातीचा स्वतंत्र असा व्यवसाय होता. व्यक्तीचा जन्म ज्या जातीमध्ये झाला त्या जातीचा परंपरागत असलेला व्यवसाय त्या व्यक्तीला करावा लागत असे. दुसरा व्यवसाय तो करू शकत नव्हता. आपल्या इच्छेनुसार कोणताही व्यवसाय करण्याचे स्वतंत्र्य नव्हते. त्यामुळे उच्च जातीच्या लोकांच्या व्यवसायाचा दर्जा हा श्रेष्ठ तर कनिष्ठ जातीच्या लोकांच्या व्यवसायाचा दर्जा कनिष्ठ मानल्या जात होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीची व्याख्या करतांना असे म्हटले आहे 'बर्हीगत विवाह बंधनावर अंतर्गत विवाह बंधनाचे वर्चस्व प्रस्तापित होणे म्हणजे जात होय. जात हा बंद झालेला वर्ग होय. प्रा.सी.एच.कुले या समाजशास्त्रज्ञाने ''संपुर्ण अनुवंशिकतेवर आधारलेल्या वर्गास जाती असे म्हटले आहे.'' तसेच मुजुमदार व मदन यांनी ''जाती हा एक बंद वर्ग आहे असे म्हटले आहे''. श्री. केतकर यांच्या मते 'जात हा सामाजिक वर्ग असुन त्याची मुख्य दोन लक्षणे आहेत'. (१) जात या सामाजिक वर्गाचे सभासदत्व त्यात जन्म घेणाऱ्या लोकांनाच मिळते (२) जात या सामाजिक वर्गाचे सभासदांना जातीच्या गटाबाहेर विवाह करण्यापासून परावृत्त केले जाते. वरील व्याख्ये वरून असे दिसून येते की, जाती संस्थेची दरवाजे बंद आहे. एक व्यक्ती दुसऱ्या जातीमध्ये प्रवेश करू शकत नाही. जातीचे सभासदत्व जन्मानेच मिळते इतर कोणातही मार्ग नाही. तसे जातीमधील सभासदांना आंतरविवाहाचे बंधन आहे.

जात ही एक अशी व्यवस्था आहे की, जी प्रत्येक प्रकारच्या सुधारणेमध्ये अडथळा निर्माण करीत असते. त्याचा परिणाम समाज हा स्थितीशील बनला. काळानुसार समाजामध्ये परिवर्तन घडुन येवु शकले नाही. सुधारणेचे सर्व मार्ग बंद झालेत. अनेक संशोधकांनी व समाज सुधारकांनी जात ही एक सामाजिक समस्या आहे असे प्रतिपादन केले. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या समस्येचा अत्यंत बारकाईने अभ्यास करून जातीच्या विविध दुष्परिणामांची चर्चा केली आहे. जातीची समस्या ही केवळ समाजमुलक नाही. ती जर सामाजिक समस्या असती तर आतापर्यंत नष्ट झाली असती. परंतु शेकडो वर्षापासुन जातिसंस्था टिकुन आहे. कारण जातिसंस्थेला हिंदुधर्माची मान्यता आहे. जातिसंस्था ही केवळ समस्या आहे. असे नाही तर जातिसंस्थेचा सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक,

राजकीय, आर्थिक इत्यादी सर्वच क्षेत्रावर प्रभाव पडाला असुन त्यावर जातीच्या दुष्परिणामांचा प्रादुर्भाव झाला आहे. जातिसंस्थेने सामाजिक अशांतता निर्माण झाल्या आहेत.

जातीसंस्था विषमतेवर आधारीत आहे. खोटया धार्मिक श्रद्धा परंपरा आणि शोषणावर आधारीत जातीव्यवस्था असल्यामुळे समाजामध्ये सामाजीक अशांतता निर्माण होते. व्यक्तीगत आणि सामाजिक जीवनामध्ये जातीचे फार महत्व असले तरी जातीमुळे व्यक्तीगत आणि सामाजिक विकासामध्ये फार मोठी बाधा निर्माण झाली होती. स्वतंत्र, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मुल्यांना जातीसंस्थेमध्ये कोणतेही स्थान नव्हते. उच्च जातीच्या लोकांना जातीचा खुप फायदा होता. परंतु खालच्या स्तरातील लोकांना ही व्यवस्था अतीशय घातक होती. या जातीव्यवस्थेमुमळे समाजामध्ये अशांतता निर्माण झाली होती. शुद्र आणि अस्पृश्य जातीच्या लोकांच्या मानवी अधिकाराचे हनन झाले. जातीयवाद, अस्पृश्यता, सामाजिक शोषन इत्यादी अनेक समस्या जातिव्यवस्थेमुळे निर्माण झाल्यात. जातीव्यवस्थेमुळे एकसंघ असा भारतीय समाज निर्माण होऊ शकला नाही. सामाजिक विकास आणि व्यक्तीगत विकासाच्या दृष्टीने जातीसंस्था घातक आहे. जातीव्यवस्थेमुळे भारतीय समाजाचा विकास होऊ शकला नाही. शुद्र आणि अस्पृश्य जातीच्या लोकांना मानवी अधिकारापासुन वंचित ठेवण्यात आले. म्हणुन शुद्र आणि अस्पृश्य जातीच्या लाखो लोकांनी हिंदु धर्माचा त्याग करून मुस्लीम, ख्रिश्चन आणि बौध्द धर्माचा स्विकार केला.

जातिसंस्थेमध्ये सामाजिक अशांतता निर्माण होण्याची कारणे :

१) जातियवाद :

जतियवादामुळे समाजामध्ये सामाजिक अशांतता निर्माण होते. प्रत्येक व्यक्तीचे सामाजिकरण हे त्यांच्या जातीनुसार होत असते. उच्च जातीचे लोक स्वतःला श्रेष्ठ समजतात आणि कनिष्ठ जातीच्या लोकांना तुच्छ मानतात. प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीचा अभिमान वाटतो. व्यक्ती आपल्या जातीच्या हितावात विचार करते. यातुन जातीयवाद निर्माण होते. कनिष्ठ जातीतील लोक उच्च जातीच्या लोकांचे वर्चस्व आधुनिक काळात सहन करीत नाही. त्यामुळे श्रेष्ठ आणि कनिष्ठ जातीमध्ये वाद निर्माण होऊ संघर्ष निर्माण झाल्याचे उदाहरणे आपल्याला आढळुन येतात. जातीयवाद ही एक ज्वलंत समस्या निर्माण झालेली आहे.

२) उच्च जातीची हुकुमशाही :

जातिव्यवस्थेमध्ये उच्च जातीच्या लोकांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी निर्माण झालेली आहे. जातीव्यवस्था ही उच्च जातीच्या लोकांच्या सुरक्षीततेची ढाल आहे. म्हणुन उच्च जातीच्या हिताचे अनेक नियम आहे. उच्च जातीच्या लोकांना अधिकार आहेत. तर कनिष्ठ जातीच्या लोकांनी कधिच प्रगती करू नये, त्यांनी उच्च जातीचे गुलाम बनुन राहावे म्हणुन त्यांच्यावर अनेक निर्बंध लादण्यात आलेत. उच्च जातीच्या लोकांचे गुलाम बनुन राहावेत अशा प्रकारची कायम व्यवस्था जाती व्यवस्थेव्दारे निर्माण करण्यात आलेली आहे. आधुनिक काळातही भारतातील अनेक राज्यामध्ये उच्च जातीच्या लोकांच्या घरासमोरून कनिष्ठ जातीचे लोक जेव्हा जातात तेव्हा त्यांना आपल्या पायातील चप्पल हातात घेवुन पुढे जावे लागते. या नियमाचे पालन न केल्यास कनिष्ठ जातीतील लोकांना शिक्षा देण्यात येते. यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होते.

३) उच्च जातीच्या लोकांच्या दर्जामध्ये ऱ्हास :

परंपारीक जातीव्यवस्थेत ब्राम्हणाचे स्थान श्रेष्ठ मानले जात होते. आजच्या समाजव्यवस्थेतअनेक उच्चस्थाने गुण कतृत्वाच्या आधारावर विविध जातीच्या लोकांनी मिळवली आहे. एकेकाळी शासक किंवा राजा असे उच्च स्थान मिळविणारे राजपुत आज काही खेडयामध्ये शेत मजुर म्हणुन राबत असल्याचे दिसुन येते. ग्रामीण आणि नागरी अशा दोन्ही क्षेत्रात ब्राम्हण जातीचा उच्च दर्जा पुर्वी सारखा राहीला नाही. त्यामुळे भारतातील समाजात सामाजिक अशांतता असल्याचे दिसुन येते.

४) मानवी मुल्यांचा अभाव :

व्यक्तीचा सर्वांगिक विकास होण्याकरीता मुलभुत मानवी अधिकाराची आवश्यकता असते. व्यक्तीला विकास करण्यासाठी स्वातंत्र, समानसंधी, न्याय, या मानवी मुल्यांची गरज असते. जेव्हा समाजात ही मानवी मुल्ये असतात तेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तीला विकास करण्याची संधी मिळते. परंतु जातीव्यवस्थेमध्ये या मानवी मुल्यांचा पुर्णतः अभाव दिसतो. कनिष्ठ जातीतील लोकांना

ISSN : 2278-9308
April, 2023

जेव्हा समान संधी मिळत नाही तेव्हा कनिष्ठ लोक आपले अधिकार आणि हक्क मिळविण्यासाठी संघर्ष करतात तेव्हा समाजामध्ये सामाजिक अशांतता निर्माण होते.

**५) जाती – जातीमध्ये संघर्ष :**

सर्व जातींचा दर्जा समान नाही. ज्या जाती उच्च आहेत त्या जातींच्या लोकांना आपल्या उच्च जातीचा अभिमान असतो. आणि कनिष्ठ जातीच्या लोकांविषयी हिनतेची भावना असते. उच्च जातीचे लोक कनिष्ठ जातीच्या लोकांवर सतत अन्याय करतात. त्यांची वारंवार अवहेलना केली जाते. उच्च जातीचे लोक आपल्यावर अन्याय करतात ही भावना कनिष्ठ जातीतील लोकांच्या मनामध्ये असते. त्यामुळे उच्च जाती आणि कनिष्ठ जातीत व्देषाची भावना निर्माण होते. त्यामुळे भारतात सामाजिक अशांतता निर्माण होते.

**६) अनुसूचीत जातींच्या स्थितीत बदल :**

स्वातंत्र्योत्तर काळात घटनात्मक अधिकार, नविन शासनाने योजलेले उपाय यामुळे जातीव्यवस्थेतील कनिष्ठजातीतील लोकांच्या स्थितीत बदल घडुन आला. अनुसूचीत जातींच्या लोकांचे जीवनमान सुधारले. परंतु भारतीय समाज जिवनातुन अस्पृश्यतेचे समुळ उच्चाटन झाले नाही. अस्पृश्यता नष्ट झाली असती तर ॲट्रॉसिटी ॲक्ट करण्याची वेळ शासनावर आलेली नसती. अनुसूचित जातीच्या लोकांच्या स्थितीत अनेक प्रकारचे बदल घडुन आले. शिक्षणाचे प्रमाण वाढले. रोजगार मिळविण्याच्या सुविधामध्ये वाढझाली. विशेष महत्वाचे म्हणजे अन्याय व शोषनाविरूध्द संघटीत लढा देण्याची वृत्ती या जाती समुहामध्ये निर्माण झाली. अनुसूचीत जातीच्या लोकांचे वर्चस्व उच्च जातीतील लोकांना सहन न झाल्यामुळे जाती जाती मध्ये संघर्ष होतांना दिसुन येते. यामुळे सामाजिक अशांतता निर्माण होते.

**संदर्भग्रंथ :**

१) डॉ. प्रदिप आगलावे – लोकराज्य – ऑक्टोबर २००६ मुख्य संपादक, मनिशा म्हैसकर – डॉ. आंबेडकरांचे समाजशास्त्रीय अध्ययन, पृ.क्र. १२४
२) डॉ. प्रदिप आगलावे – भारतीय समाज संरचना आणि सामाजिक समाजशास्त्र, पृ.क्र. ७२
३) डॉ. प्रदिप आगलावे – पाश्चिमात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञ, पृ.क्र. १७७–१७८
४) रा.ज. लोटे – भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या.
५) भा.कि. खडसे – भारतातील सामाजिक समस्या.
६) डॉ. बी.एम.कराळे – ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र.

2319 - 8508
An International Multidisciplinary
Half Yearly Research Journal

# GALAXY LINK



Volume - XI, Issue - I,
November - April - 2022-23
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2020 - 6.495
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

ISSN 2319 - 8508

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - XI Issue - I November - April - 2022-23

Marathi Part - I

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.495
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**

Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कवी केदार यांच्या तीन संस्कृत महाकाव्यांचा काव्यशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास<br>**अजय विद्याधर पेंढरी** | १-७ |
| २ | स्वातंत्र्योत्तर भारतात संस्कृत पत्रिकेची विकास यात्रा<br>**प्रा. दर्शना साथम** | ८-११ |
| ३ | संगीत संस्कृत सहसंबंध<br>**सहा. प्रा. अमोल द. वाडवे** | १२-१३ |
| ४ | छत्रपती संभाजी राजांनी बुधभूषणम् ग्रंथात मांडलेले विचार स्वातंत्र्योत्तर काळाही शासनाला मार्गदर्शकच<br>**डॉ. दर्शना साथाम**<br>**उत्कर्षा संजय वानरे** | १४-१७ |
| ५ | योग एवं आयुर्वेद पुस्तके वर्णितं प्राणायामस्य स्वरुपम् ।<br>**डॉ. दर्शना दि. वरगंटीवार**<br>**प्रा. दिनेश वरगंटीवार** | १८-२२ |
| ६ | स्वतंत्र भारतातील संस्कृत साहित्याची ७५ वर्ष<br>**कु. दीपिका बेलोकार** | २३-२५ |
| ७ | संस्कृत व संगीत अनुबंध<br>**प्रा. जगन्नाथ इंगोले** | २६-२७ |
| ८ | नीतीमूल्य शिक्षणाच्या दृष्टीने बुभुक्षित : काक : या संस्कृत बालकथा संग्रहाचे महत्त्व<br>**अया सुनील मुंधाटे** | २८-३२ |
| ९ | भुवमानीता भगवद्भाषाधारे संस्कृताभ्यसकाय दिशा<br>**डॉ. मंजुश्री श्रीपाद नेव्हल** | ३३-३९ |
| १० | नवविलाप स्तोत्र - चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. मीनाक्षी सुभाष भांदककर** | ४०-४४ |
| ११ | डॉ. हर्षदेव माधव यांच्या संस्कृत काव्यातील वैविध्यपूर्ण विदेशी काव्यप्रकार<br>**डॉ. मृदुला विजय काळे** | ४५-५१ |
| १२ | पं. मिथिलेश शर्मा यांचे स्वातंत्र्योत्तर संस्कृत साहित्यातील योगदान<br>**डॉ. मृणालिनी आबासाहेब शिंदे** | ५२-५९ |

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com) CC - 24

# ३. संगीत संस्कृत सहसंबध

**सहा. प्रा. अमोल द. वाडवे**
संगीत विभाग, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

**सारांश**

मनुष्याच्या विकासा सोबतच भाषेचा आणि कलेचा विकास होत गेला वेदकालीन ग्रंथाची उत्पत्ती मानवाला विकासाची नवीन उर्जा देणारी ठरली.

संगीत व संस्कृत साहित्य यांचा सहसंबध प्राचिन काळापासून दिसून येतो. प्राचिन काळी मंत्राचे पठण , ऋचा गायन केल्या जायचे ते संस्कृत भाषेतील स्वरांच्या माध्यमाने मधुर करणे हे संगीत कलेचे कार्य असत चार वेदांमधील पहिला वेद म्हणून ज्याला ओळखतात त्या ऋग्वेदामध्ये उदात्त, अनुदात्त व स्वरीत स्वरांचे स्थान असणे हेच संगीत व संस्कृत साहित्याच्या सहसंबधाची पुष्टी देतात. संगीत व साहित्य दोन्ही कला आहेत व दोन्हीचा विकास सामांतराने झाला. भारतीय संगीताचे स्थान प्राचिन काळापासून महत्वाचे आहे. संगीताचे उगमस्थान जगातील सर्व संगीत कलांच्या उगमस्थानापेक्षा अधिक प्राचीन आहे. वेद हे जगातील आद्यवाङ्मय असून त्याचे जतन व्हावे म्हणून लेखन कलेच्या अभावी मुखोद्गत करून जिवंत ठेवले गेले.

**प्रस्तावना**

संस्कृत भाषेला देववाणी आणि विश्वातील प्राचीन भाषा मानतात संस्कृत भाषा ही भारतातील समस्त भाषेची जननी मानली जाते. संस्कृत भाषा हिंदू धर्माची पवित्र भाषा मानतात. शास्त्रीय हिंदू दर्शन भाषा आणि बौद्ध आणि जैन धर्माच्या ग्रंथाची ऐतिहासिक भाषा आहे. कालिदास, अभिनवगुप्त, शंकराचार्य, असे अनेक विद्वान पंडित मानले जातात साहित्या व्यतिरिक्त आयुर्वेदशास्त्र, दर्शनशास्त्र, विज्ञान शास्त्रांमध्ये सुद्धा संस्कृत भाषा प्रचलित आहे.

संस्कृत भाषेचे साहित्य अनेक अमुल्य ग्रंथरत्नाचा सागर आहे. अतिप्राचीन भाषा असून सुद्धा तिची शुद्धता, स्पष्टता कायम आहे. मानवी जीवनाचे परमध्येय, अंतिम ध्येय, परमात्माची प्राप्ती परमात्म्याचा साक्षात्कारच मानलेले आहे. हे ध्येय प्राप्त करण्यासाठी संगीतच सर्वोत्कृष्ठ माध्यम मानले असल्यामुळे सामवेदातील ब्राम्हणसंहिता, गांधर्ववेद, प्रतीशाख्य ग्रंथ, नारदीय शिक्षा, च्छांदोग्यादि उपनिषद, भरताचे नाट्शास्त्र आदि संस्कृत ग्रंथ त्याचेच चिन्तनपरंपरेचे प्रमाण मानले जातात.

मानवी जीवनाचा विकास अनेक तत्वांनी घडत असते बालवयात श्लोक, आरती, संस्कृत सुभाषिते अशा म्हणायला अवघड गोष्टी त्या बोबळ्या वयात दिल्याने त्याची. (जिव्हा) जीभ स्पष्ट उच्चार करण्याकरीता तरफळत राहते, कालांतराने मात्र स्पष्ट उच्चारासाठी संस्कृत भाषेतील श्लोक हे म्हणायला लावतात व उपयोगी सुद्धा पडतात. संगीत आणि संस्कृत भाषेचा समन्वय साधला गेला तर लयात्मक, छंदात्मक, तालमय पद्धतीने लोकांच्या भावनात्मक, विचारात्मक, काव्याचरूप आपणास मिळते म्हणूनच संगीत संस्कृत भाषेचा सहसंबध दिसून येतो.

संस्कृत भाषा भारतीय संस्कृती आणि विचाराचे माध्यम असून सुद्धा धर्मनिरपेक्ष आहे. त्यामुळे धार्मिक, साहित्यिक, अध्यात्मिक, दार्शनिक, वैज्ञानिक सर्व दृष्टीने प्रचलीत आहे. ऋग्वेदा मध्ये गीत, वाद्य आणि नृत्य या तिन्ही कलाचा उल्लेख

आपल्याला पहावयास मिळतो. ऋग्वेदांमध्ये गायनासाठी गीर, गातु, गाथा, गायत्र तसेच गीति सारखे शब्दांचा वापर केलेला आढळतो. हे सर्व त्याकाळातील गीत प्रकार होते. त्याचा आधार छंद आणि गायन शैली होती. गीत तसेच त्याच्या धूनसाठी 'साम' संज्ञा दिली जात असे या सर्व वेदकालीन भाषा संस्कृतच होती प्राचिन संगीत मध्ये शब्द आणि स्वर या दोघांना समान महत्व दिले जात होते. गीत गायनासाठी शब्दाची आवश्यकता होती या रूपाने वैदिक ऋचांचे गायन केले जात होते. शब्द आणि स्वर याचे गठबंधन म्हणजे 'साम' म्हटले गेले आहे.

सामवेद संज्ञेने परिचित असलेले सामांचे (वैदिक ऋचांचे) गायन रुपाकडे झुकलेले पठण हेच भारतीय संगीताचे उगमस्थान आहे. म्हणूनच संस्कृत ग्रंथाचा त्याच्या ठेवीचा फार मोठा सिंहाचा वाटा भारतीयांना मिळालेला आहे. अनादीकाळापासून प्रगत मानवी संगीत आपल्या संस्कृतीचा आधारस्तंभ झाला आहे.

'गीत वाद्यं च नृत्यं' अशी संगीताची व्याख्या केली जाते संस्कृत ग्रंथकारांनी आपल्या ग्रंथातून संगीत विषयाचा अभ्यास त्याची जोपासना त्याची मांडणी केलेली दिसते. नारद मुनी, संगीत रत्नाकार, भरत मुनी, मतंग मुनी, संगीत पारिजात असे अनेक ग्रंथ व ग्रंथकार संस्कृत भाषेत आपणास पाहावयास मिळतात. त्यांच्या सिद्धांतावर आधारित पुढील काळात वेगवेगळ्या भाषेत साहित्य निर्माण झाले परंतु सर्व प्रथम संस्कृत भाषेलाच पहिला मान दिला आहे. चारही वेदातील संगीताच्या दृष्टीने सामवेदाला विशेष स्थान आहे. हा एकमेव असा ग्रंथ आहे की ज्याने भारतीय संगीताच्या चिरंतन स्त्रोताचे हृद्यरूप आपल्या समोर सादर केले. गंधर्ववेद हा सामवेदाचा उपवेद मानला आहे. संगीताचा मूळ स्त्रोत सामवेद आहे. सामवेदाव्दारे संगीताला नियमबंध करण्यात आले आहे ते सर्व संस्कृत तज्ञांनी आपल्या ग्रंथ संपदेव्दारा त्यांच्या लिखीत, मुखतगद् क्रियेव्दारा आजतागायत संकलित ठेवली यामुळे जनसामान्या पर्यंत पोहचले व फायदेशीर ठरले. संगीत संस्कृत याचा सहसंबध यामधून स्पष्ट दिसून येतो.

मानवाने आपल्या दैनंदिन कार्यामध्ये संस्कृत भाषेचा वापर केलेला दिसतो जसे - 'शुभंकरोति कल्याणमं' मनाचे श्लोक , संस्कृत श्लोक, पसायदान सुभाषिते, मंगलाष्टके, मंगलगीत या अनेक स्वरूपात संस्कृत भाषा व त्याचे चिंतन हा करीत असतो या सर्व गीतांना सांगितीक दृष्ट्या लय, छंदा मध्ये बांधण्याचे कार्य मानवाने केले आहे. संस्कृत भाषा जनसामान्यांना अवगत नसली तरी त्याच्या लय, छंद युक्त पदांना संगीत शास्त्राव्दारे सामान्यांना म्हणण्यास सोयीचे झाले आहे. यामुळे सुद्धा संगीत संस्कृत भाषेचे अनुबंध जवळचे वाटतात.

**निष्कर्ष**

मानव जातीला ऐक्य, बंधूभाव सारख्या भावना निर्माण करण्यात संगीत आणि संस्कृत साहित्याचा मोठा वाटा आहे. मानव कल्याणासाठी कला, साहित्य सदैव प्रयत्नशील असते, त्यामुळे समाज प्रबळ व समृद्ध होऊ शकतो. संगीतकला व संस्कृत साहित्याव्दारे सहसंबध प्रस्थापित होतो व खऱ्या अर्थाने संस्कृतीचे जतन करणे हे सुद्धा काळाची गरज ठरते.

**संदर्भ**

१. www.knowledge.com.in
२. संगीत कला विहार अ. भा. गां. म. प्रकाशन ऑक्टो २००३
३. संगीत विशारद डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग (२००८) हाथरस
४. भारतीय संगीटाचा इतिहास श्री. उमेश जोशी, मानसरोवर प्रकाशन, प्रतिष्ठान फिरोजाबाद आगरा.

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023

ISSN 2319 - 8508
An International Multidisciplinary
Half Yearly Research Journal

# GALAXY LINK

Volume - XI, Issue - I,
November - April - 2022-23
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2020 - 6.495
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कवी केदार यांच्या तीन संस्कृत महाकाव्यांचा काव्यशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास<br>**अजय विद्याधर पेंडसे** | १-७ |
| २ | स्वातंत्र्योत्तर भारतात संस्कृत पत्रिकेची विकास यात्रा<br>**प्रा. दर्शना सायम** | ८-११ |
| ३ | संगीत संस्कृत सहसंबंध<br>**सहा. प्रा. अमोल द. वाडवे** | १२-१३ |
| ४ | छत्रपती संभाजी राजांनी बुधभूषणम् ग्रंथात मांडलेले विचार स्वातंत्र्योत्तर काळाही शासनाला मार्गदर्शकच<br>**डॉ. दर्शना सायाम**<br>**उत्कर्षा संजय वानरे** | १४-१७ |
| ५ | योग एवं आयुर्वेद पुस्तके वर्णितं प्राणायामस्य स्वरुपम् । <br>**डॉ. दर्शना दि. वरगंटीवार**<br>**प्रा. दिनेश वरगंटीवार** | १८-२२ |
| ६ | स्वतंत्र भारतातील संस्कृत साहित्याची ७५ वर्ष<br>**कु. दीपिका बेलोकार** | २३-२५ |
| ७ | संस्कृत व संगीत अनुबंध<br>**प्रा. जगन्नाथ इंगोले** | २६-२७ |
| ८ | नीतीमूल्य शिक्षणाच्या दृष्टीने बुभुक्षित : काक : या संस्कृत बालकथा संग्रहाचे महत्व<br>**जया सुनील मुंधाडे** | २८-३२ |
| ९ | भुवमानीता भगवद्भाषाधारे संस्कृताभ्यसकाय दिशा<br>**डॉ. मंजुश्री श्रीपाद नेवल** | ३३-३९ |
| १० | नवविलाप स्तोत्र - चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. मीनाक्षी सुभाष भांदककर** | ४०-४४ |
| ११ | डॉ. हर्षदेव माधव यांच्या संस्कृत काव्यातील वैविध्यपूर्ण विदेशी काव्यप्रकार<br>**डॉ. मृदुला विजय काळे** | ४५-५१ |
| १२ | पं. मिथिलेश शर्मा यांचे स्वातंत्र्योत्तर संस्कृत साहित्यातील योगदान<br>**डॉ. मृणालिनी आबासाहेब शिंदे** | ५२-५९ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | प्रज्ञाभारती श्रीधर भास्कर वर्णेकर रचित ''रामगीता एक अध्ययन''<br>प्रा. प्रज्ञा व्ही. इंगळे | ६०-६३ |
| १४ | श्री. गणेश त्रिंबक काळे विरचित मेघदूतावरील समश्लोकी चे समीक्षण<br>रोहिणी र. देशमुख<br>प्रो. डॉ. नंदा ज. पुरी | ६४-६७ |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर अनुवादित 'ग्रामगीतामृतम्' ग्रन्थातील महिलोन्नती<br>रोशनी घोडमारे | ६८-७४ |
| १६ | प्रभाकर भातखंडे यांच्या संस्कृत नाटकांतील आधुनिक आविष्कारांचा चिकित्सक अभ्यास<br>रुपाली रघुनाथ वाडेकर | ७५-७८ |
| १७ | संस्कृत-संगीत अनुबन्ध<br>प्रा. डॉ. ऋजुता गोडबोले | ७९-८३ |
| १८ | संस्कृत भाषेत चलचित्रपटांची निर्मिती<br>शैला अशोक बडगुजर | ८४-८९ |
| १९ | प्रज्ञाभारती डॉ. वर्णेकरांची रागांवर आधारित संस्कृत गीते<br>सोनाली आसरकर शिलेदार | ९०-९१ |
| २० | कालिदासचरितम् चे नाट्यशास्त्रदृष्ट्या समीक्षण<br>सौ. सुवर्णा संजयकुमार केवटे<br>प्रो. कविता सु. होले | ९२-१०० |
| २१ | संस्कृत अध्ययनाचे अभिनव ई-माध्यम गीर्वाण वाणी<br>विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद गजानन पुंड | १०१-१०३ |
| २२ | 'सुनन्द बालनाटिका:' ह्या डॉ. सौ. शैलजा रानडे ह्यांनी मराठीतून संस्कृतमध्ये अनुवादित केलेल्या नाटिका संग्रहाचे चिकित्सक अध्ययन<br>श्री. उल्हास मधुकर रानडे | १०४-१०९ |
| २३ | संस्कृत-संगीत अनुबंध<br>प्रा. उत्तरा र. तडवी (प्रधान) | ११०-११३ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | आधुनिक कवी डॉ. रानडे मंडमचे बालगीते<br>कु. वैष्णवी लक्ष्मीकांत येळूकर | ११४-११७ |
| २५ | नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि संशोधनाची भूमिका<br>प्रा. डॉ. गणंजय कहाळेकर | ११८-१२१ |
| २६ | महाराष्ट्राची संस्कृत महाकाव्य सृष्टी<br>डॉ. सौ. अबोली व्यास | १२२-१२९ |
| २७ | भारतीय संगीत आणि संस्कृत ग्रंथ<br>डॉ. वैशाली देशमुख | १३०-१३४ |

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23 CC - 24
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com)

# ७. संस्कृत व संगीत अनुबंध

प्रा. जगन्नाथ इंगोले
संगीत विभाग प्रमुख, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

संस्कृत ही विश्वातील एक समृद्ध भाषा आहे. भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या भाषेला ज्ञान भाषा म्हणून संबोधल्या जाते, तर संपूर्ण विश्वात आपल्याकडे आकर्षित करणाऱ्या भारतीय संगीताला आत्म्याची भाषा म्हणून संबोधल्या जाते. संगीत हे भारताला लाभलेली फार मोठी देणगी आहे. या संगीत कलेला अधिक विकसित करण्यात संस्कृत भाषेचे फार मोठे योगदान असून या दोन्ही विषयात एक अनुबंध जोडला आहे.

**संस्कृत भाषेची महानता**

संस्कृत शब्दाचा अर्थ 'संस्कार' भाषा या अर्थाने मानतात. हा शब्द 'सम' पूर्वक 'कृ' धातू पासून तयार होतो. या भाषेत धार्मिक साहित्याची अधिक निर्मिती झाली असल्यांनी या भाषेला 'देववाणी' तसेच 'सुर - भारती' असे म्हटल्या जाते. आधुनिक काळात भारतीय संविधानाच्या अनुसूचितील २२ भाषेत संस्कृतला स्थान प्राप्त झाले आहे. प्राचीन काळात भारतीय संस्कृत भाषा ही ग्रीक व लेटीन या भाषेच्या तुलनेत अधिक परिपूर्ण असल्याचे दिसून येते. या भाषेत विशाल साहित्य निर्मिती, लोकहीत भावना, नवनवीन शब्द निर्मिती क्षमता असल्यांनी, या भाषेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीच दर्शन घडविण्यासाठी अनेक महर्षी पुढे आले. त्यांनी वेद उपवेद, पुराण व रामायण, महाभारत यासारख्या ग्रंथाची निर्मिती केली.

भारतीय संस्कृतीशी एकरूप ठरलेल्या या भाषेचा संपूर्ण भारतात बोलल्या जाणाऱ्या सर्वच भाषांवर प्रभाव दिसून येतो. प्राचीन भारतात बोलल्या जाणारी द्रविडीयन भाषा सोडून सर्वच भारतीय भाषा 'जननी' म्हणून संस्कृत भाषेला मानली जाते. या भाषेनी हिंदी, मराठी, गुजराती, राजस्थानी, बंगाली, पंजाबी, उडीसा, मैथीली, सिंधी, कश्मीरी, कोकणी, मणिपुरी इत्यादी भारतीय भाषेला शब्दांनी समृद्ध केले आहे.

प्राचीन भारतात धर्माचे महत्व सांगणाऱ्या संस्कृतनी साहित्य कला, विज्ञान, गणित, चिकित्सा पद्धती, आध्यात्मिकता, धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास व राज्यशास्त्र या सर्वच विषयावर आपला प्रभाव टाकला आहे. प्राचीन भारतीय इतिहासाची ओळख करून देणारी संस्कृत भाषा खऱ्या अर्थानी ज्ञान भाषा ठरली आहे. या भाषेच्या महत्वपूर्णता संबंधित राष्ट्रपिता महात्मा गांधी, श्रीअर बिंदो, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. राधाकृष्णन, सर विलीयम जोन्स, प्रो. बोप्पो, मिसर बुलोइस, मॅक्स मुलर, सर मिर्जा इस्माईल इत्यादी विद्वान लेखक व समाज सुधारक यांनी आपली मते मांडली आहेत. तसेच अनेक पाश्चात्य लेखकांनी आपल्या मातृभाषेत संस्कृत साहित्य अनुवादित केले आहे. या भाषेच्या विकासात महर्षी पाणिनी महर्षी कात्यायन व महर्षी पतंजली याचे फार मोठे योगदान ठरते. या भाषेला संस्कार देणारी भाषा संबोधल्यानी संस्कृत ही भाषा नसून "वसुधैव कुटुम्बकम" अशी भावना रूढ झालेली आहे.

**संस्कृत व संगीत**

संस्कृत भाषेची संगीत कलेला विकसित करण्यात मोलाची भूमिका ठरते प्राचीन काळापासून संस्कृत व संगीत कलेची एक घनिष्ठता दिसून येते वेद या प्राचीन ग्रंथातील सामवेदात संगीत कलेचे मूळ सापडते सामसंगीतातील 'सामगायन' ही पद्धती त्या काळात

प्रचलीत असून ऋच्या, स्तोत, स्वरात गायले जात असल्याचा उल्लेख मिळतो. पुढील काळातील सांगितीक वाटचाल विकसीत करणारी अनेक संस्कृत ग्रंथ महत्वाचे ठरतात. त्यातून संगीत कलेतील सूक्ष्मता गायण - वादन पद्धती, वाद्य व रचना या संबंधीत ज्ञान प्राप्त होतो. भारतीय संगीत शास्त्रातील स्वर, ताल, लय, मात्रा, मेल, थाट, मूर्च्छना, राग व रागांची शास्त्रीय माहिती तसेच वाद्य व नर्तन कलेतील सर्व प्रमुख घटकांवर संस्कृत भाषेत श्लोक लिहलेले दिसून येतात. संस्कृत भाषेतील या श्लोकामुळे संगीत कलेतील अनेक सूक्ष्म बाबींचा अभ्यास करण्यात मदत होतो. उदा:

१. श्रुती - श्रुमते इति श्रुती
२. स्वर - "स्वतो रंजयाति श्रोतृचितं स स्वर उच्यते"
३. थाट - मेल : स्वरसमूह स्याद्रागव्यंजनशवितमान्।
४. राग - रंजयति इति राग

अश्या प्रकारे संगीत कलेतील शास्त्रीय पक्ष समाजापर्यंत पोहचविण्यात संस्कृत भाषेचे महत्वपूर्ण कार्य दिसून येते. या भाषेच्या विद्वानांनी संगीत कलेचा शास्त्रीय पक्ष अनेक ग्रंथातून मांडून संगीत कला टिकविण्यासाठी तसेच तिला समाजमान्यता मिळवून देण्यासाठी अथक कष्ट केले. भारतीय संगीत कलेशी संबंधित अनेक संस्कृत ग्रंथात लिखान झाले असून या ग्रंथातून संगीतातील विविध विषयांचे ज्ञान प्राप्त होते.

**संगीतशास्त्र व संकृत ग्रंथ**

भारतीय संगीत विषया संबंधी अधिक ग्रंथ संस्कृत भाषेत असल्याचे दिसते या ग्रंथ संपदेत भरताचे नाट्यशास्त्र नंदकेश्वरांचे भरतर्णव, मातंग - बृहदेशी, नारद - नारदीय, शिक्षा व नारद का संगीत - मकरंद, लोचन - रागतरंगिणी, राममात्य - स्वरमेलकला - निधी, पुंडलिक विठ्ठल- सदरागचंद्रोदय, रागमाला व रागमंजरी, सोमनाथ - राग विबोध व्यंकटमुखी - चतुरदंडी - प्रक्षीका, दामोदर - संगीतदर्पण, श्रीनिवास - रागतत्व - विबोध, अहोबल- संगीत पारिजात.

संगीत विषया संबंधित लिहलेली ग्रंथ आजही उपयुक्त असून या ग्रंथांच्या आधारावर भारतीय संगीतातील अनेक ग्रंथांचे लिखाण झाले आहे संस्कृत ग्रंथातून संगीत विषयावर झालेले लिखाण भारतीय संगीतासाठी अत्यंत उपयुक्त असून महत्वपूर्ण योगदान ठरते.

**निष्कर्ष**

संस्कृत एक समृद्ध भाषा असून भारतीय संस्कृती व इतिहासाचे अध्यनास उपयुक्त आहे. या भाषेच्या विद्वांनानी सर्वच विषयांवर उल्लेखनीय लिखाण केले असल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून प्रत्येक काळखंडात या भाषेत संगीत विषया संबंधीत अधिक लेखन झाले आहे, हे लेखन अत्यंत उपयुक्त असून भारतीय संगीतासाठी महत्वपूर्ण योगदान ठरते. त्यामुळेच संस्कृत व संगीत कलेचा एक घानिष अनुबंध असल्याचे दिसून येते.

**संदर्भ**

१. संगीत विशारद - वंसत - हाथरस प्रकाशन - हाथरस
२. संगीत विजयणी - नारायण मंगळूरकर - सौ. विजया मंगळूकर, नागपूर
३. https//him.wikipedia.org

प्रचलीत असून ऋच्या, स्रोत, स्वरात गायले जात असल्याचा उल्लेख मिळतो. पुढील काळातील सांगितीक वाटचाल विकसीत करणारी अनेक संस्कृत ग्रंथ महत्वाचे ठरतात. त्यातून संगीत कलेतील सूक्ष्मता गायण - वादन पद्धती, वाद्य व रचना या संबंधीत ज्ञान प्राप्त होतो. भारतीय संगीत शास्त्रातील स्वर, ताल, लय, मात्रा, मेल, थाट, मूर्च्छना, राग व रागांची शास्त्रीय माहिती तसेच वाद्य व नर्तन कलेतील सर्व प्रमुख घटकांवर संस्कृत भाषेत श्लोक लिहलेले दिसून येतात. संस्कृत भाषेतील या श्लोकामुळे संगीत कलेतील अनेक सूक्ष्म बाबींचा अभ्यास करण्यात मदत होतो. उदा:

१. श्रुती - श्रुमते इति श्रुती
२. स्वर - "स्वतो रंजयाति श्रोतृचितं स स्वर उच्यते"
३. थाट - मेल : स्वरसमूह स्थाद्रागव्यंजनशवितमान् |
४. राग - रंजयति इति राग

अश्या प्रकारे संगीत कलेतील शास्त्रीय पक्ष समाजापर्यंत पोहचविण्यात संस्कृत भाषेचे महत्वपूर्ण कार्य दिसून येते. या भाषेच्या विद्वानांनी संगीत कलेचा शास्त्रीय पक्ष अनेक ग्रंथातून मांडून संगीत कला टिकविण्यासाठी तसेच तिला समाजमान्यता मिळवून देण्यासाठी अथक कष्ट केले. भारतीय संगीत कलेशी संबंधित अनेक संस्कृत ग्रंथात लिखान झाले असून या ग्रंथातून संगीतातील विविध विषयांचे ज्ञान प्राप्त होते.

**संगीतशास्त्र व संकृत ग्रंथ**

भारतीय संगीत विषया संबंधी अधिक ग्रंथ संस्कृत भाषेत असल्याचे दिसते या ग्रंथ संपदेत भरताचे नाट्यशास्त्र नंदकेश्वरांचे भरतर्णव, मातंग - बृहदेशी, नारद - नारदीय, शिक्षा व नारद का संगीत - मकरंद, लोचन - रागतरंगिणी, राममात्य - स्वरमेलकला - निधी, पुंडलिक विठ्ठल- सदरागचंद्रोद्‌य, रागमाला व रागमंजरी, सोमनाथ - राग विबोध व्यंकटमुखी - चतुरदंडी - प्रक्षीका, दामोदर - संगीतदर्पण, श्रीनिवास - रागतत्व - विबोध, अहोबल- संगीत पारिजात.

संगीत विषया संबंधित लिहलेली ग्रंथ आजही उपयुक्त असून या ग्रंथांच्या आधारावर भारतीय संगीतातील अनेक ग्रंथांचे लिखाण झाले आहे संस्कृत ग्रंथातून संगीत विषयावर झालेले लिखाण भारतीय संगीतासाठी अत्यंत उपयुक्त असून महत्वपूर्ण योगदान ठरते.

**निष्कर्ष**

संस्कृत एक समृद्ध भाषा असून भारतीय संस्कृती व इतिहासाचे अध्यनास उपयुक्त आहे. या भाषेच्या विद्वानांनी सर्वच विषयांवर उल्लेखनीय लिखाण केले असल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून प्रत्येक काळखंडात या भाषेत संगीत विषया संबंधीत अधिक लेखन झाले आहे, हे लेखन अत्यंत उपयुक्त असून भारतीय संगीतासाठी महत्वपूर्ण योगदान ठरते. त्यामुळेच संस्कृत व संगीत कलेचा एक घनिष्ठ अनुबंध असल्याचे दिसून येते.

**संदर्भ**

१. संगीत विशारद - वंसत - हाथरस प्रकाशन - हाथरस
२. संगीत विजयणी - नारायण मंगळूरकर - सौ. विजया मंगळूकर, नागपूर
३. https//him.wikipedia.org

ISSN 2277-8071

J-Gate INDEXED

RESEARCH NEBULA

An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

DOI PREFIX10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

# NAVADASHPRABHA GAURAVANK

# नवदशप्रभा गौरवांक

*THE SPECIAL ISSUE ON THE WORK AND CONTRIBUTION OF*

**SWARAYOGINEE PADMAVIBHUSHAN DR. PRABHA ATRE**

*PUBLISHED ON OCCASION OF HER 90TH BIRTH YEAR.*



Special Issue September, 2022

www.ycjournal.net

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SJIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071


| | | | |
|---|---|---|---|
| 35. | डॉ. सोनाली मरोडे<br>सहा. प्राध्यापक, संगीत विभाग,<br>दयानंद आर्य कन्या महाविद्यालय, जरीपटका, नागपुर. | डॉ. प्रभा अत्रे - मधुर गायन की धनी | 66 |
| 36. | अनूप मोघे<br>सहायक प्राध्यापक, शासकीय के. आर. जी.<br>महाविद्यालय, ग्वालियर.<br>वैशाली मोघे<br>संगीत शिक्षिका, सारदा नाद मंदिर' महाविद्यालय,<br>ग्वालियर. | डॉ. प्रभा अत्रे :एक लोकप्रिय बंदिशकार | 71 |
| 37. | प्रा.डॉ. अभय अरविंद गद्रे<br>संगीत विभागाध्यक्ष,<br>श्रीमती सु.रा. मोहता महिला म.वि. खामगांव. | सादरीकरण मे बंदीश का महत्व तथा स्वरांगिनी की जोड बंदिशे | 72 |
| 38. | Dr. Pravin Radhakrishna Alshi<br>Asst. Professor<br>Smt. S. R. Mohata Mahila Mahavidyalaya,<br>Khamgaon Dist. Buldana Maharashtra. | The Legendry Hindustani Classical Vocalist<br>Dr. Prabah Atre | 78 |
| 39. | डॉ. जयश्री विश्राम कुळकर्णी<br>संगीत विभाग,<br>स्व.सी.एम.कढी आर्टस कॉलेज,अचलपुर कॅम्प,परतवाडा. | डॉ प्रभा अत्रेंच्या कविता | 83 |
| 40. | डॉ. सौ. स्मिता सुधीर बर्वे,<br>मुंबई विद्यापीठ, मुंबई. | संगीतज्ञ "गानप्रभा" अर्थात डॉ. प्रभा अत्रे | 88 |
| 41. | सोनाली आसरकर शिलेदार<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती. | 'स्वरांगिनी' - आ. डॉ. प्रभा अत्रे रचित बंदिशींचा अमूल्य ठेवा | 90 |
| 42. | डॉ. नेहा तेल्हारकर<br>संगीत विभाग, जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय,दर्यापुर. | बंदिश - एक चिंतन | 92 |
| 43. | शोधार्थी-नेहा<br>निर्देशिका-डॉ. वन्दना तिवारी | डॉ. प्रभा अत्रे की सरगम प्रस्तुति | 95 |
| 44. | -Dr.Preethy.K<br>Associate Professor,<br>Department of Music,<br>Sree Sankaracharya University of Sanskrit, Kalady, Kerala | Teaching Music at Institution: Review of the article by Padmavibhushan Dr. Prabha Atre in the book "Enlightening the Listener". | 99 |
| 45. | Dr. Suvapriya Chatterjee<br>Assistant Professor in English,<br>Gourav Guin Memorial College | Sailing Against All Odds: Representation of Women in Music in Prabha Atre's "Along the Path Of Music" | 102 |
| 46. | शोधकर्ता परनीत कौर<br>निर्देशिका डॉ वंदना तिवारी | डॉ प्रभा अत्रे का संगीत सफर व उनका योगदान | 107 |
| 47. | श्री. किरण प्रकाश सावंत<br>संशोधक विद्यार्थी, ललित कला केंद्र (गुरुकुल),<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. | पद्मविभूषण डॉ.प्रभा अत्रे यांच्या बंदिशींतील सौंदर्य | 110 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 2.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly
Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

# 'स्वरांगिनी' - आ. डॉ. प्रभा अत्रे रचित बंदिशींचा अमूल्य ठेवा

प्रा. डॉ. आगरकर
सहाय्यक प्राध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,

**'स्वरांगिनी',** डॉ. प्रभा अत्रे रचित सर्वांग सुंदर बंदिशींचा संग्रह आहे. खरंतर स्वरांगिनी बाबत काही लिहायचे म अत्यंत कठीण बाब आहे. परंतु या बंदिशी बसवताना किंवा गातांना जी अनुभूती येते तसेच त्यांचे विचार चिंतन म प्रयत्न करीत आहे. या बंदिशींच्या संग्रहाबाबत असलेला आदर, आत्मियता यामुळे स्वरांगिनीशी विशिष्ट प्रकारचे नाते झाले आहे.

बंदिश म्हणजे रागातील स्वर व लयीच्या चौकटीत बांधलेली रचना होय किंवा भाषिक तत्व, हे कंठ संगीताशी आहे. राग प्रस्तुतीकरणामध्ये आवश्यक अशा विभिन्न घटकांची सुसंगत रचना बंदिश होय. बंदिश बाबत महत्वपूर्ण असे 'स्वरांगिनी' मधून मिळते. रागभाव, स्वररचना, शब्दरचना या विषयीचे संपूर्ण ज्ञान स्वरांगिनीतील बंदिशींमधून तसेच प्रभाताईंच्या मनोगतातून प्राप्त होते.

फारशी भाषेतील मूळ शब्द 'बंद' तसेच संस्कृत भाषेतील मूळ शब्द 'बंध' यानुसार बांधणे, असा अर्थबोध होतो. बंदिश यामध्ये स्वरांवर शब्द बांधण्याची क्रिया हि महत्वाची होय. भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये राग गायनामध्ये बंदिश महत्वाची भूमिका आहे. बंदिशींच्या माध्यमातून रागाचे प्रस्तुतीकरण तसेच बढत करतांना विशिष्ट दिशानिर्देश मिळून कोटीची, कलेची निर्मिती होते. डॉ. प्रभा अत्रे रचित बंदिशी हे नावनिर्मिती व सृजनात्मकतेचा उत्कृष्ट संगम आहे. केवळ बंदिशी नाहीत तर तराणा, ठुमरी, दादरा, भजन असे गीतप्रकार ही त्यांनी रचले आहेत. प्रत्येक गीतप्रकाराची एक वेगळी व त्यानुसार त्या त्या गीतप्रकारांची स्वररचना व शब्दरचना होणे हे प्रभाताईसारख्या एका प्रतिभावान कलाकारालाच श प्रत्येक शैलीचा आविष्कार हा, त्यातील अंगभूत किंवा आवश्यक घटकांनुसार होणे हे देखील डॉ. प्रभाताईंच्या रचनांचे वैशि त्यांच्या मते कलाकाराची प्रतिभा, उत्तम शिक्षा, योग्य संस्कार, साधना, चिंतन इतर गायकांच्या गुणांचे अनुकरण करण्या किंवा उदार दृष्टीकोन तसेच शारीरिक क्षमता यांच्या संयोगानेच उत्कृष्ट कलाकृती किंवा शैली निर्माण होते आणि अशा शैलीनुसार बंदिश असणे आवश्यक असते. प्रभाताईंच्या रचना ह्या सर्व बाबींचा अभ्यास करूनच निर्माण झाल्या असल्या दर्जेदार आहेत. प्रत्येक बंदिशीतून प्रकट होणारे रागस्वरूप, रस हे रागप्रकृतिनुसारच आहे. कारण प्रभाताई रचित रागातील बंदिश गातांना स्वर व शब्दांच्या संयोगातून निर्माण होणाऱ्या प्रभावाची अनुभूती येते. बंदिशींच्या माध्यमातून स्वरांची वैशिष्ट्यपूर्ण मांडणी करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळते किंबहुना ती कार्यान्वित होते. स्वरांचे विविध आकृती होत असतानाच बंदिशीतील शब्दांची त्यावर सहज होणारी गुंफण हि आनंदानुभुती या बंदिशींमधून होते.

रागातील भावानुसार होणारी बंदिशीतील स्वररचना व शब्दरचना या भावस्पर्शी व अर्थपूर्ण आहेत. प्रत्येक काव्य, शब्द हे प्रभाताईंच्याच रचना आहेत. स्वराबरोबरच साहित्य व भाषा यांचे जतन होणे हा देखील त्यांचा विचा महत्वाचा ठरतो बंदिशींमध्ये प्रयुक्त होणारे शब्द हे स्वरांना पुरक असे असतील तर साहित्याच्या व भाषेच्या अनुषंगा अर्थबोध व स्वरांच्या माध्यमातुन होणारी भावाभिव्यक्ती यामुळे एक उच्च दर्जाची कलाकृती निर्माण होते व चिरकाल राहते. भाषा व साहित्यरुपी अमुल्य ठेवा हे श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याचे बंदिश हे एक सुरेल माध्यम होऊ शकते. बंदिशीतील शब्दांचा अर्थ गायक व श्रोता या दोघांनीही समजून घेतला तर त्यांच्यामध्ये सहज संवाद निर्माण होण्यास असे प्रभाताई मानतात. शब्द तेथे अर्थ व भाव आहेच म्हणूनच पारंपारिक बंदिशी ह्या लोकप्रिय तसेच सुरक्षित राहण्या त्यातील साहित्य व काव्य यातून निर्माण होणारे भाव जाणकारांकडून योग्य करून घेतल्यास साहित्य व भाषेचे जतन असे प्रभाताई म्हणतात. प्रभाताईंचा हा विचार नव्या पिढीकरिता मार्गदर्शक ठरतो. आजही विद्यार्थ्यांना पारंपारिक बंदिशी

असतांना त्यातील शब्दांचा विचार व त्यांचा अर्थ जाणून घेऊन शिकविल्यास विद्यार्थ्यांमध्ये शास्त्रीय संगीता विषयी आत्मीयता व रुची निर्माण होऊ शकते. जेणेकरुण भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग असलेले शास्त्रीय संगीत टिकून राहण्यास मदत होईल. प्रभाताई रचित सर्वच बंदिशी मधील शब्दरचना रागभावाला समर्पक असाच आहेत व गातांना त्यांचा प्रत्यय येतो जसे भैरव रागातील 'हे आदिदेव शिवशंकर भोर भई जागो करुणाकर' या बंदिशीतील शब्दांमधून व्यक्त होणारे भाव व भैरव रागातील स्वर तसेच सकाळच्या सधिप्रकाशात गायला जाणारा हा राग यांचा सुरेख समन्वय या बंदिशीतून साधला आहे. 'देहो दरस किरपा कर' या ओळीच्या स्वररचनेतून दर्शनप्राप्ती असलेली उत्कटता प्रतीत होते. राग समय चक्रानुसार प्रत्येकच राग हा विशिष्ट वेळेला गायला जातो. समयानुसार निसर्गात होणारे बदल ह्या वेळेतील रागांच्या स्वरांतून व शब्दांमधून अतिशय प्रभावीपणे प्रभाताईंनी आपल्या बंदिशीतून मांडले आहेत. माध्यान्ह समयी गायल्या जाणाऱ्या शुद्ध सारंग रागातील 'तपन लागी चहूँ ओर, सूरज तेज अगनिया बरसत है' असे दुपारच्या तप्त वातावरणाचे वर्णन करणारी विलंबित लयीतील बंदिश तर या परिस्थितीला शांत करण्याकरिता विनंतीपर 'आओ रे आओ कारे बदरा, बिनती करत से जल बरसाओ' ही द्रुत लयीतील बंदिश या दोहोमधून व्यक्त येणारे भाव समान आहेत. सगळ्याच रचनांमधील विलंबित व द्रुत लयीतील बंदिशीतून सारखी भावनिर्मिती होणे हा सामान्य श्रोत्यांना राग संगीताच्या अमूर्त स्वरुपाकडून मूर्त स्वरुपाकडे नेण्याचा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे असे प्रभाताई मानतात. खरोखरच यामुळे रागांच्या प्रकृतीनुसार रागगायनातून होणारी भावनिर्मिती कायम राहून एक प्रभावी कलाकृती निर्माण होते.

राग गायनामध्ये बंदिशीच्या माध्यमातून होणाऱ्या रागविस्ताराचे योग्य मार्गदर्शन या बंदिशींमधून मिळते. प्रभाताई म्हणतात राग विस्तार प्रयोग केला गेला आहे जेणेकरुण शब्दांवरही अन्याय होणार नाही म्हणजेच बंदिशींची स्वररचना, शब्दरचना या पलीकडेही तिचे गायन, सादरीकरण तसेच परिणाम या बाबींचा देखील त्यांनी सखोल विचार केला आहे. त्यांच्या तराणा सारखा गीतप्रकार गातांना कुठेही शब्दांची ओढाताण न होता समर्पक शब्द प्रयोगातून रागभावनिर्मितीची अनुभूती येते. मालकौंस, भीमपलासी या सारख्या रागांच्या स्वर व काव्याच्या समन्वयातून जीवनात नामसंकीर्तनाचे महत्व त्यांनी मांडले आहे. कारण कोणताही रागभाव हा व्यक्तींच्या अंतःकरणातील भावाशी स्वाभाविकपणे संवाद साधतो व ज्याचा सकारात्मक परिणाम होऊन आनंदानुभूती होते व आनंदातून परमानंद प्राप्ती होते. या बरोबरच ठुमरी, भजन, दादरा या रचना देखील उत्कृष्ट आहेत तरीही त्या स्वतःला कवयत्री मानत नाहीत हा त्यांच्यातील असलेला मोठेपणा त्यांच्या व्यक्ती विशेषांचे दर्शन घडविते. केवळ उत्तर भारतीय शास्त्रीय संगीतच नव्हे तर कर्नाटकी, अरबी व पाश्चात्य संगीतातील वैशिष्ट्यांचा अभ्यास व त्यातून कृतीशील विचार प्रभाताईंनी मांडले आहेत. रागातील स्वरांबरोबरच शब्दांची योग्य निवड यावरुन त्यांचा भाषा व साहित्याचा असलेला गाढा अभ्यास दिसून येतो.

पारंपारिक बंदिशींप्रमाणेच संगीत क्षेत्रातील परिवर्तनाचा विचार करुन नवीन बंदिशी तयार होणे म्हणजे सर्वार्थाने नवीन नव्हे तर पारंपारिकतेतूनच नवनिर्मिती व्हावी अशा चिंतनशील, प्रतिभावान कलाकार डॉ. प्रभा अत्रे यांचे स्वरांगिनी हे बंदिशींचा अमूल्य ठेवा आहे. एक बंदिशकार म्हणून संगीत क्षेत्रातील त्यांचे कार्य अत्यंत महत्वाचे व प्रेरणादायी आहे. आ. डॉ. प्रभा अत्रे यांच्या कार्याला शतशः नमन.

किराणा घराण्याच्या जेष्ठ गायिका, पद्मविभूषण, स्वरयोगिनी आ. डॉ. प्रभा अत्रे यांना शतकोत्तर वाटचालीकरिता मनःपूर्वक शुभेच्छा तसेच आ. प्रभाताईंना उत्तम आरोग्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

संदर्भ ग्रंथ :-

१) स्वरांगिनी

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023

ISSN 2319 - 8508
An International Multidisciplinary
Half Yearly Research Journal

# GALAXY LINK



Volume - XI, Issue - I,
November - April - 2022-23
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2020 - 6.495
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | प्रज्ञाभारती श्रीधर भास्कर वर्णेकर रचित ''श्रमगीता एक अध्ययन''<br>**प्रा. प्रज्ञा व्ही. इंगळे** | ६०-६३ |
| १४ | श्री. गणेश निळकंठ काळे विरचित मेघदूतावरील समश्लोकी चे समीक्षण<br>**रोहिणी र. देशमुख**<br>**प्रो. डॉ. नंदा ज. पुरी** | ६४-६७ |
| १५ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लिखित प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर अनुवादित 'ग्रामगीतामृतम्' ग्रन्थातील महिलोन्नती<br>**रोशनी घोडमारे** | ६८-७४ |
| १६ | प्रभाकर भातखंडे यांच्या संस्कृत नाटकांतील आधुनिक आविष्कारांचा चिकित्सक अभ्यास<br>**रुपाली रघुनाथ वाडेकर** | ७५-७८ |
| १७ | संस्कृत-संगीत अनुबन्ध<br>**प्रा. डॉ. ऋजुता गोडबोले** | ७९-८३ |
| १८ | संस्कृत भाषेत चलचित्रपटांची निर्मिती<br>**श्वेता अशोक बडगुजर** | ८४-८९ |
| १९ | प्रज्ञाभारती डॉ. वर्णेकरांची रागांवर आधारित संस्कृत गीते<br>**सोनाली आसरकर शिलेदार** | ९०-९१ |
| २० | कालिदासचरितम् चे नाट्यशास्त्रदृष्ट्या समीक्षण<br>**सौ. सुवर्णा संजयकुमार केवटे**<br>**प्रो. कविता सु. होले** | ९२-१०० |
| २१ | संस्कृत अध्ययनाचे अभिनव ई-माध्यम गीर्वाण वाणी<br>**विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद गजानन पुंड** | १०१-१० |
| २२ | 'सुनन्द बालनाटिका:' ह्या डॉ. सौ. शैलजा रानडे ह्यांनी मराठीतून संस्कृतमध्ये अनुवादित केलेल्या नाटिका संग्रहाचे चिकित्सक अध्ययन<br>**श्री. उल्हास मधुकर रानडे** | १०४-१० |
| २३ | संस्कृत-संगीत अनुबंध<br>**प्रा. उत्तरा र. तडवी (प्रधान)** | ११०-११ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कवी केदार यांच्या तीन संस्कृत महाकाव्यांचा काव्यशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास<br>**अजय विद्याधर पेंडसे** | १-७ |
| २ | स्वातंत्र्योत्तर भारतात संस्कृत पत्रिकेची विकास यात्रा<br>**प्रा. दर्शना सायम** | ८-११ |
| ३ | संगीत संस्कृत सहसंबध<br>**सहा. प्रा. अमोल द. वाडवे** | १२-१३ |
| ४ | छत्रपती संभाजी राजांनी बुधभूषणम् ग्रंथात मांडलेले विचार स्वातंत्र्योत्तर काळाही शासनाला मार्गदर्शकच<br>**डॉ. दर्शना सायाम**<br>**उत्कर्षा संजय वानरे** | १४-१७ |
| ५ | योग एवं आयुर्वेद पुस्तके वर्णितं प्राणायामस्य स्वरुपम् ।<br>**डॉ. दर्शना दि. वरगंटीवार**<br>**प्रा. दिनेश वरगंटीवार** | १८-२२ |
| ६ | स्वतंत्र भारतातील संस्कृत साहित्याची ७५ वर्ष<br>**कु. दीपिका बेलोकार** | २३-२५ |
| ७ | संस्कृत व संगीत अनुबंध<br>**प्रा. जगन्नाथ इंगोले** | २६-२७ |
| ८ | नीतीमूल्य शिक्षणाच्या दृष्टीने बुभुक्षित : काक : या संस्कृत बालकथा संग्रहाचे महत्त्व<br>**जया सुनील मुंधाटे** | २८-३२ |
| ९ | भुयमानीता भगवद्भाषाधारे संस्कृताभ्यसकाय दिशा<br>**डॉ. मंजुश्री श्रीपाद नेव्हल** | ३३-३९ |
| १० | नवविलाप स्तोत्र - चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. मीनाक्षी सुभाष भांदककर** | ४०-४४ |
| ११ | डॉ. हर्षदेव माधव यांच्या संस्कृत काव्यातील वैविध्यपूर्ण विदेशी काव्यप्रकार<br>**डॉ. मृदुला विजय काळे** | ४५-५१ |
| १२ | पं. मिथिलेश शर्मा यांचे स्वातंत्र्योत्तर संस्कृत साहित्यातील योगदान<br>**डॉ. मृणालिनी आबासाहेब शिंदे** | ५२-५९ |

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | आधुनिक कवी डॉ. रानडे यांच्या बालगीते<br>**कु. वैष्णवी लक्ष्मीकांत वेळूकर** | ११४-११७ |
| २५ | नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि संशोधनाची भूमिका<br>**प्रा. डॉ. गणंजय कहाळेकर** | ११८-१२१ |
| २६ | महाराष्ट्राची संस्कृत महाकाव्य सृष्टी<br>**डॉ. सौ. अबोली व्यास** | १२२-१२९ |
| २७ | भारतीय संगीत आणि संस्कृत ग्रंथ<br>**डॉ. वैशाली देशमुख** | १३०-१३४ |

# १९. प्रज्ञाभारती डॉ. वर्णेकरांची रागांवर आधारित संस्कृत गीते

**सोनाली आसरकर शिलेदार**
सहाय्यक प्राध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

**सारांश**

भारतीय संगीताची अत्यंत प्राचीन परंपरा आहे. तसेच संस्कृत भाषा ही प्राचीन भाषा आहे. वेद, उपनिषद यासारखे साहित्य संस्कृत भाषेत असून शास्त्रीय संगीताचे उगम स्थान सामवेद आहे. चार वेदांपैकि सामवेद हा संगीतप्रधान वेद मानला जातो. संस्कृत व संगीत यांचा सहसंबंध पूर्वीपासूनच असून आधुनिक काळातही प्रज्ञाभारती श्री. वर्णेकरांच्या गीतीकाव्य, व संगितीकांच्या माध्यमातून दृढ झाल्याचे दिसून येते.

**प्रस्तावना**

संस्कृत अत्यंत प्राचीन भाषा आहे. वैदिक तसेच अन्य साहित्य, शास्त्र व उपनिषदे हे संस्कृत भाषेतच असल्यामुळे निश्चितच या भाषेला श्रेष्ठतम दर्जा प्राप्त झाला आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या उत्पत्तीचा विचार केल्यास काही पौराणिक व दंतकथाही सांगितल्या गेल्या आहेत. परंतु भारतीय शास्त्रीय संगीताचे उगमस्थान हे सामवेद मानले जाते. भारतीय संगीताची ही प्राचीनतम परंपरा आहे. भारताची प्राचीनतम वाङ्मीन निर्मिती ज्याला प्रथम निर्मिती मानता येईल अशी म्हणजे वेद. वेदवाङ्मयात पंचमहाभुते, ईश्वर तसेच देवतांना प्रसन्न करण्याकरिता काव्यात्मक ऋचा रचलेल्या आहेत. यज्ञयागादी प्रसंगी या ऋचांचे गायन होत असे हेच वेदकालीन संगीत होय. ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद व सामवेद या चार वेदांपैकी सामवेद हा संगीत प्रधान वेद मानला जातो. ऋग्वेदातील ऋचांचे आलपबद्ध गायन म्हणजे सामवेद असे सामवेदाचे वर्णन केले जाते. भगवान श्रीकृष्णाने देखील "सामवेदाला वेदानां सामवेदोऽस्मी" असे भागवतात सामवेदाचे वर्णन केले आहे. सामसंगीत विकसित होऊनच आधुनिक शास्त्रीय संगीताचे स्वरूप निर्माण झाले. भारतीय संगीताचे प्राचीन ग्रंथ हे संस्कृत मध्ये आहेत म्हणजेच संस्कृत व संगीताचा अतिशय प्राचीनतम, वैदिक काळापासूनच संबंध आहे.

आधुनिक काळातही संस्कृत व संगीत यांचा उत्तम मेळ आपल्या काव्यातून प्रज्ञाभारती वर्णेकरांनी साधला आहे. संस्कृतचे गाढे अभ्यासक तसेच शास्त्रीय संगीताचे जाणकार व प्रतिभासंपन्न व्यक्तीमत्व असलेले वर्णेकर यांनी संस्कृत मध्ये सहज व अत्यंत प्रभावी काव्यरचना व गीते विविध वृत्तांमध्ये तसेच विविध रागांमध्ये रचलेल्या आहेत. संस्कृत मधील महानाट्य, खंडकाव्य, महाकाव्य याबरोबरच विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे गीतीकाव्य व संगितिका तसेच पद्यरचना या आहेत. तीर्थभारतम, श्रीराम संगितिका व श्री कृष्ण संगीतिका यातील प्रसंग व विविध भाव प्रदर्शित करतांना काव्यतील भाव व रस यानुसार वेगवेगळ्या राग घेतले आहेत.

**संगितीकेमध्ये प्रयुक्त राग**

गीतीकाव्याची परंपरा संस्कृत साहित्यामध्ये अतिशय प्राचीन आहे. "जयदेवकृत गीतगोविंदम्" हे गीतीकाव्य प्रकारापैकी प्रथम काव्यप्रकार मानला जातो. प्रभूरामचंद्र व श्रीकृष्ण यांच्या जीवनावरील गीतात्मक संवाद स्वरूपांत संगितिकांमध्ये वर्णेकरांनी विविध रागांचा प्रयोग केला आहे केवळ प्रचलीत रागांचाच नव्हे तर अप्रचलित जसे जंगला, गौरांजनी, देवरंजनी, धन्य धैवत, कामो

या रागांचाही प्रयोग या गीतीकाव्यामध्ये झालेला आहे. राजा दशरथ, कौसल्या, विश्वमित्र यांचे काव्यात्मक संवाद हे हमीर, बिलावल, हिंडोल यासारख्या रागांमध्ये रचले आहेत. प्रत्येक संवादानंतर वेगळ्या रागाचा प्रयोग हा संवादातील भाव व रागातील भावांच्या आधारे व्यक्त होण्याकरिता असावा.

संगीतिकेमधील काही भूमिकांचे काव्यात्मक संवाद हे केदार, दुर्गा, देशकार, शंकरा यासारख्या प्रचलीत रागांमध्ये आहेत तर काही संवाद हे त्याच भूमिकांकरिता सरपरदा, जलधरकेदार मालश्री, लच्छासाख, कुकुभ यासारख्या अप्रचलित रागांमध्ये आहेत. इथे गायकांची कौशल्यपूर्णता व कसब दिसून येते. संगीतिकेतील भूमिका कर्त्याला संस्कृत भाषेबरोबरच शास्त्रीय संगीताचे ज्ञान तसेच राग सादरीकरणाचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. प्रसंगानुरूप रागांची निवड हे संगीतिकेचे वैशिष्ट्य आहे. राग व रस यांचा काव्यातील भावाशी जोडलेला संबंध हा अत्यंत समर्पक व प्रभावी संगीतिकेचे द्योतक आहे. सीतास्वयंवराच्या प्रसंगी सुरुवातीला तसेच श्रीकृष्ण संगीतिकेच्या नांदी करिता संपूर्ण वातावरण प्रफुल्लीत करणाऱ्या यमन रागाचा प्रयोग केला आहे. तर भरताला झालेला रामाचा विरह दर्शविण्याकरिता करुण तसेच आर्तभाव व्यक्त करणारा तोडी राग घेतला आहे. उत्तर हिंदुस्थानी संगीत पद्धतीतील रागांबरोबरच दाक्षीणात्य पद्धतीतील नागस्वरावली, नाटकुरंजिका व शोभावरी अशा रागांचा प्रयोग संगीतिकेची वैशिष्ट्य पूर्णता दर्शविते तीर्थभारतम् या गीती काव्यसंग्रहामध्ये भारतातील विविध स्थळांचे, जे भारताचे भूषण आहेत तसेच देवतांचे, ग्रंथांचे पर्वतांचे गंगा, यमुना, कावेरी असे नद्यांचे देखील वर्णन केले आहे व त्याकरिता विशिष्ट रागांचा उल्लेखच केला नाही तर त्या रागांचे आरोह, अवरोह तसेच मुख्यांग, चलन इ. विषयी संपूर्ण माहिती दिली आहे. यामुळे रागाभ्यास असणाऱ्या सामन्य व्यक्तींना सुद्धा ही वर्णनात्मक गीते गाता येणे शक्य होते. त्याचबरोबरच काही नवीन रागांचा परिचयही होण्यास मदत होते श्रीराम व श्रीकृष्ण संगीतिकांमधील काव्यांकरिता ज्या रागांचा प्रयोग होण्यास सांगितले आहे त्या रागांची देखील संपूर्ण माहिती संगीतिकेच्या समाप्तीनंतर दिली आहे. यामुळे काही अप्रचलित रागांबद्दलचे ज्ञान त्या रागांचे स्वरूप तसेच दाक्षीणात्य रागही ज्ञात होतात. जिजामाता, देवी अहिल्या, स्वामी विवेकानंद, रामदास स्वामी, लोकमान्य टिळक अशा अनेक थोर व्यक्तींवर रचलेले काव्य ही विविध रागांवर आधारित आहे ज्यामुळे व्यक्तीचरित्र लक्षात ठेवण्यास मदत होते.

सर्व कलांची सम्राज्ञी असलेली संगीत कला मानवी जीवनाशी एकरूप झालेली असून केवळ मानवच नव्हे तर साऱ्या चराचर सृष्टीला मोहित करणारी ही स्वरांची जादू म्हणजे एक चमत्कारच, अशाच या प्रभावी स्वरांमुळेच किंवा स्वरांच्या आधारे कोणतेही काव्य प्रभावी पणे मांडता येते. त्यातही विशिष्ट रागातील स्वरांमध्ये रचलेले संस्कृत काव्य हे जनसामान्यपर्यंत सहजपणे पोहचू शकते.

**निष्कर्ष**

प्रज्ञाभारती श्री. वर्णेकर लिखीत गीतीकाव्य तसेच संगीतिका या शास्त्रीय संगीतावर आधारित म्हणजेच रागांवर आधारित असल्यामुळे त्या, त्या स्वरांच्या माध्यमातून गायल्यास सुलभ होईल. संगीत हे भाव व्यक्त करण्याचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. प्रज्ञाभारती श्री. वर्णेकरांचे रागांवर आधारित हे संस्कृत गीती काव्य व संगितिका संस्कृत बरोबरच संगीत क्षेत्रातही अत्यंत मोलाचे ठरले आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**

भारतीय संविधानात राजकीय पक्षांचा उल्लेख नसला तरीही जबाबदार शासनपद्धतीत राजकीय पक्षांची भूमिका अनन्य साधारण असते. सत्तारूढ पक्षाप्रमाणेच विरोधी पक्षाची क्रियाशिलता महत्वाची असते. भारतीय पक्षपद्धतीचे अध्ययन करतांना असे आढळते की १९५१ पासून २०२२ पर्यंत भारतीय पक्षपद्धतीचे स्वरूप बदलत राहिलेले आहे. १९५१ ते १९६७ या दरम्यान भारतात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा एकछत्री अंमल राहलेला आढळतो केंद्र व राज्य स्तरावर प्रथम सभागृहात काँग्रेसलाच स्पष्ट बहुमत मिळत गेले. १९६७ मध्ये पहिल्यांदा नऊ घटक राज्यात पहिल्यांदा काँग्रेस ला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. आणि सात घटक राज्यात गैर - काँग्रेस सरकारे आलीत घटकराज्य स्तरावर काँग्रेस विरोधात मोर्चा बांधणी सुरु होऊन त्याचे परिणाम १९७७ च्या सार्वत्रिक निवडणूक निकालानंतर स्पष्ट झालेत.

१९७७ ते १९९६ या कालावधीत काँग्रेसचा जनाधार कमी होत जाऊन आघाड्यांच्या राजकारणाला सुरुवात झाली. भारतात व्दिध्रुवीय पक्षीय पद्धतीचे अस्तित्व निर्माण झाले. यापैकी एक ध्रुव काँग्रेस आणि दुसरा ध्रुव गैर - काँग्रेस पक्ष अशी स्थिती आढळते. १९९६ नंतर भारतीय राजकारणात पक्षीय स्तरावर तीन आघाड्या निर्माण झालेल्या आढळतात. ज्यात भारतीय जनता पक्ष व त्याचे मित्र, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मित्रपक्ष व या दोन्ही गयत शामिल न होणारी तिसरी आघाडी (बहुजन समाज वादी पक्ष वगैरे)होय असे निदर्शनास येतेकी, १९९६ नंतर

प्रादेशिक पक्षाचे प्रमाण वाढल्यामुळे त्यांच्या मदतीशिवाय राष्ट्रीय पक्षाला सार्वत्रिक निवडणुकीत स्पष्ट बहुमत प्राप्त करणे कठीण होऊ लागले त्याचा परीनाम निवडणूक पूर्व आघाडीच्या राजकारणाला सुरुवात झाली.

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थितीचे अध्ययन केले तर नेतृत्व बदलाचा पक्षाच्या लोकसभा स्थितीवर कसा परिणाम झाला ते निदर्शनास येते.

लोकसभा - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थिती (१९५२ ते १९६७) निवडणूक

| वर्ष | एकुण जागा | कॉंग्रेसने जिंकला | मतदान % |
|---|---|---|---|
| १९५२ | ४०१ | ३६४ | ४५% |
| १९५७ | ४०३ | ३७१ | ४७.८% |
| १९६२ | ४९४ | ३६१ | ४४.७% |
| १९६७ | ५२० | २८३ | ४०.८% |

(स्रोत -The Decline of congress party in Indian politics Economic & Political weekly, ISSN – 23498846)

असे निदर्शनास येते की भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे नेतृत्व पं. जवाहरलाल नेहरू व लाल बहादूर शास्त्री यांचेकडेअसतांना भा. रा. कॉं. ला लोकसभेत स्पष्ट बहुमत मिळत गेले आणि ४५% च्यावर जनाधार मिळाला परंतु पहिल्यांदा इं. गांधीजी कडे नेतृत्व गेल्यावर लोकसभेतील जागांचे प्रमाणच कमी झाले नाही तर मताची टक्केवारी (%) घसरलेली आढळते

लोकसभा निवडणुका - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थिती (इंदिरा - राजीव गांधी कालावधी)

| वर्ष | एकुण जागा | कॉंग्रेसने जिंकला | मतदान % |
|---|---|---|---|
| १९७१ | ५१८ | ३६२ | ४३.७% |
| १९७७ | ५४३ | १५४ | ३४.५% |
| १९८० | ५४३ | ३५३ | ४२.७% |
| १९८४ | ५४३ | ४१५ | ४८.१% |
| १९८९ | ५४३ | १९७ | ३९.५% |
| १९९१ | ५४३ | २४४ | ३६.४% |

(स्रोत -The Decline of congress party in Indian politics Economic & Political weekly, ISSN – 23498846)

इंदिरा गांधी प्रधानमंत्री झाल्यावर त्यांनी घेतलेल्या काही महत्वाच्या निर्णयामुळे बँकांचे राष्ट्रीयीकरण, बांग्लादेश युद्ध, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, गरिबी हटाओ यामुळे १९७१ च्या सार्वत्रीक निवडणुकीत पक्षाने लोकसभेत स्पष्ट बहुमत प्राप्त केले. १९७५ च्या आणीबाणी च्या घोषणेने व विरोधी पक्ष इं. गांधीजी विरुद्ध चालवीत असलेल्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनामुले १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला दाऊन पराभव पत्करावा लागला. १९८० व १९८४ दरम्यान कॉंग्रेसला नि:पक्ष जनाधार मिळाला याला महत्वाचे कारण सक्षम नेतृत्व व १९८४ मध्ये इं. गांधीची हत्या हे दोन आहेत. १९८९ व १९९१ ला राजीव गांधीजींच्या नेतृत्वात पक्षाने स्पष्ट बहुमत प्राप्त केलेले नव्हते असे आढळते.

१९९२ नंतर राजीव गांधींच्या हत्येनंतर पहिल्यांदा कॉंग्रेस पक्षाला गांधी - नेहरू घराण्याबाहेरचे नेतृत्व प्राप्त झाले. जे भारतीय जनतेकडून स्वीकार्य नव्हते असे आढळते. कारण १९९२ च्या निवडणुकीत पक्षाने केवल २४४ जागा लोकसभेत ५४३ पैकी जिंकल्या कॉंग्रेसला केवल ३६.४०% मतदान झाले व बहुमताचा आकडा २६८ गाठू शकली नाही व अण्णा डी. एम. के. सोबत कॉंग्रेस पक्षाने निवडणुकीनंतर युती करून सरकार स्थापन केल.[१]

लोकसभा निवडणुका - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थिती (सोनिया - गांधी)

| वर्ष | एकुण जागा | कॉंग्रेसने जिंकला | मतदान % |
|---|---|---|---|
| १९९८ | ५४३ | १४१ | २५.८% |
| १९९९ | ५४३ | ११४ | २८.३% |
| २००४ | ५४३ | १४५ | २६.५% |
| २००९ | ५४३ | २०६ | २८.६% |
| २०१४ | ५४३ | ४४ | १९.५% |
| २०१९ | ५४३ | ५२ | १९.४९% |

(स्रोत -The Decline of congress party in Indian politics Economic & Political weekly, ISSN – 23498846)

१९९१ ते १९९६ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या नेतृत्वात पोकळी निर्माण झाल्यामुळे या दरम्यान नेहरू - गांधी घराण्यातील वारस शोधला गेला आणि १९९७ ला सोनिया गांधी चे नेतृत्व पुढे आले. १९९८, १९९९,२००४

काँग्रेस पक्षाने सोनिया गांधीच्या नेतृत्वात सार्वत्रिक निवडणुका लढविल्या पण भारतीय नागरिकांचा जनाधार या दरम्यान ३०% पर्यंतही पोहचू शकला नाही.[१] काँग्रेस पक्षामधील अंतर्गत गटबाजी आणि जेष्ठ नेत्यांची प्रधानमंत्री बनण्याची लालसा यामुळे १९९९ मध्ये पक्षात मोठी फूट पडून पक्ष दुबळा झाला. १९९९ ला शरद पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसनेच काँग्रेसपक्षाला मोठी लढत दिली व पक्षाची स्थिती अजून खालावली. २००४ च्या निवडणुकीत इतर पक्षांच्या मदतीने १४५ जागांच्या आधारावर काँग्रेसने मनमोहन सिंगांच्या नेतृत्वात सरकार स्थापन केले. मनमोहन सिंगांनीकेलेल्या महत्वाच्या कार्यामुळे २००९ ला काँग्रेसला मोठा जनाधार मिळाला पण असे निदर्शनास येते की काँग्रेस पक्षातील अंतर्गत गटबाजी व राहुल गांधीना पक्षाचा नेता करण्याबाबतच्या कार्यकर्त्यांच्या लागलेल्या शर्यतीत पक्षात दुफळी निर्माण झाली.[१] २००९ ते २०१४ या दरम्यान भारतीय काँग्रेस पक्षात रिमोट कंट्रोल संस्कृती विकसित झाली व मनमोहन सिंग हे सोनिया गांधीकडून कंट्रोल होऊ लागले. परिणामत: मनमोहन सिंगाचे नेतृत्व मौनी प्रधान मंत्री म्हणून नावारूपाला आले. राहुल गांधीच्या अपरिपक्व नेतृत्वाचा झालेला उदय हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला अवनतीकडे जाणारा ठरला त्यांचे परिणाम २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतून स्पष्टपणे दिसतात.[१]२०१४ व २०१९ च्या निवडनुकीत काँग्रेस पक्ष तीन अंकी आकडा पण गाठू शकले नाही असे आढळते.

ऐकूण अध्ययनावरून असे निदर्शनास येते की भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये झालेल्या नेतृत्व बदलणे काँग्रेस पक्षाची स्थिती दिवसेंदिवस खालावत गेलेली आहे. यावरून खालील निष्कर्ष निघतात -

१) १९५१ ते १९६७ पर्यंत काँग्रेसचा एकछत्री अंमल भारतावर राहील याचे महत्वाचे कारण म्हणजे पं. जवाहरलाल नेहरू व लाल बहादूर शास्त्री यांचे सक्षम नेतृत्व, नियोजनबद्ध राष्ट्रीय कार्यक्रमाची आखणी, दांडगा जनसंपर्क आणि प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव होय.

२) १९७१ ते १९९१ या दुसऱ्या टप्प्यात काँग्रेसची स्थिती लोकसभेत कधी मजबूत राहिली तर कधी दुबळी. १९७१ मध्ये इं. गांधीच्या नेतृत्वात जी जादू सामान्य भारतीयांवर केली ती १९७७ च्या निकालात ओसरलेली दिसते. १९७७ च्या काँग्रेसच्या पराभवाची प्रामुख्याने तीन कारणे आढळतात एकतर इं. गांधीजी बद्दल विरोधी पक्षांनी उघडलेली मोहीम, दुसरे प्रादेशिक पक्षाचा उदय आणि स्थानीकांचे प्रश्न घेवून त्यांच्या निष्ठा आपल्याकडे वळवण्यात प्रादेशिक पक्षांना आलेले यश व तिसरे काँग्रेसच्या विरोधात प्रभावी विरोधी पक्षाचा पर्याय उपलब्ध होणे हे होय. १९७७ ते १९८० या दरम्यान विरोधी पक्षाला सरकार चालविण्यात आलेल्या अपयशाने पुन्हा काँग्रेसशिवाय देशाला पर्याय नाही याची खात्री पटल्याने यामुळे काँग्रेसने लोकसभेत ३५० च्या वरचा आकडा पार केला. १९८४ ला इं. गांधीच्या मृत्यूने सहानुभूतीच्या लाटेचा परिणाम होऊन काँग्रेसने ४१५ चा आकडा गाठला.

३) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात नेतृत्वात पोकळी राजीव गांधीच्या काळातवाढलेली आढळते. राजीव गांधी हे पहिले राजकारणी नव्हते पण स्मित हास्य आणि नेहरू - घराणे परंपरा त्यांच्या जमेच्या बाजू होत्या.बोफोर्स प्रकरण शहाबानो प्रकरणामुळे गांधी घराण्याचे वलय असूनही ते जनाधार प्राप्त करू शकले नाही.

४) १९९८ ते २०१९ पर्यंत काँग्रेसचे नेतृत्व पुनश्च गांधी घराणाकडे आलेले असले तरी १९९१ पासून काँग्रेसमध्ये निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी गांधी घराणाचे वलयही वाचवू शकलेली नाही. या कालावधीतील पहिल्या दशकात सोनिया गांधी पक्षांतर्गत कलह कमी करण्यात आणि पक्षाबाहेरील विरोधी पक्षाला सोपवण्यात यशस्वी झाली असली तरी राहुल गांधी व रिमोट कंट्रोल संस्कृतीने पक्षांतर्गत दुफळी निर्माण केली.

५) २०१४ व २०१९ या दोन्ही लोकसभा निवडणुकीत सामान्य मतदारांनी राहुल गांधी ऐवजी नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाला प्राधान्य दिले कारण २०१४ ते २०१९ या पाच वर्षात देशातील महत्वाचे पायाभूत प्रश्न हाताळण्यात, सर्वसामान्यामध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यात व नेत्याविषयी प्रेम व विश्वास निर्माण करण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ज्याप्रमाणे यशस्वी झाले तसे राहुल गांधीकडे होऊ शकले नाही. राजकारणाची सुझ - बुझ जी वय आणि अनुभवातून नरेंद्र मोदींकडे आहे ती राहुल गांधी नाही त्यामुळे राहुल गांधीचे सभागृहातील वक्तव्ये किंवा कृतीविरोधकांसाठी गमतीचा विषय बनलेला आहे. एखाद्या प्रसंगा विषयी राहुल गांधी यांनी केलेले वक्तव्य फार उथळ व सुमार दर्जाचे ठरते असे विश्लेषकांचे मत आहे.

६) काँग्रेस पक्षाला नेतृत्वाची समस्या निर्माण होण्यामध्ये नेता - अनुयायी यांच्यातील सुसंवाद हा घटक जबाबदार अनुयायी पक्षाला व नेत्याला मोठा करीत असतांना पण जर नेत्याशी संपर्क साधणे जर अनुयायांना कठीण होऊन बसत असेल तर हा दुरावा स्वस्थ राजकीय संबंधाला छेद देतो. यातून संघटनात्मक बांधणीची समस्या निर्माण होते.

७) दांडग्या जनसंपर्काचा अभाव हा घटक जबाबदार आहे. वर्तमान प्रधानमंत्री 'मन की बात' च्या माध्यमातून वारंवार जनतेशी प्रत्यक्ष संवाद साधतात, सोशल मिडीयाच्या माध्यमातून जनतेत आपली प्रतिमा चांगली ठेवण्याचा प्रयत्न करतात. आपल्या कार्याला वारंवार 'प्रोजेक्ट' करून जनतेला विश्वासानेघेतात व जनतेकडून आलेल्या सूचनांची दखल

घेतात. दांडगा संपर्क नेतृत्वाला आधीमान्यता प्राप्त करून देतो जो सत्ता टिकविण्यासाठी मदत करतो. नेतृत्व जनाभिमुख असल्यास त्याचा परिणाम होतो. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हे करण्यात कमी पडले.

शेवट -

वरिल सर्व कारणांमुळे २०१४ पासून काँग्रेस टप्याटप्याने दुबळी होत आहे.२०२२ २३ च्या वर्तमान परिस्थितीत नेतृत्वाच्या दृष्टीने नरेंद्र मोदी व राहुल गांधी याच्या कार्य, भूमिका, व्यक्तिमत्व याचा तौलानिक अभ्यास केल्यास असे निदर्शनास येते की जनता क्रियाशील, दूरदर्शी किंवा निर्णयक्षम नेतृत्वाला प्राधान्य देते जे त्यांना काँग्रेस ऐवजी वर्तमान BJP मध्ये आढळले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला पूर्व स्थितीचे वैभव प्राप्त करण्यासाठी राष्ट्रीय पक्षांना घेवून नियोजनबद्ध पद्धतीने वर्तमान सरकारवर नियंत्रण ठेवणारे कसलेले, परिपक्व, दूरदृष्टी नेतृत्वाची गरज आहे. पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याची नितांत आवश्यकता आहे. भारत जोडो यात्रेने जनतेशी संपर्क प्रस्थापित करून जनाधार मिळविण्याचा प्रयत्न केलेला असला तरी तो पुरेसा नाही असे आढळते. नेतृत्वाचा बिंदू गांधी - नेहरू घराण्यातून शोधण्याऐवजी गुणवत्ता व अनुभव या आधारावर शोधण्यास त्याचा परिणाम काँग्रेसवर होऊ शकतो.

संदर्भ -

१) https//en.mwikipedia.org, 199 Indian equal election.

२) The Decline of congress party in Indian politics Economic & Political weekly, ISSN – 23498846.

३) https//en.mwikipedia.org, 199 Indian equal election.

४) Sanjay Baru, The Accidental Prime Minister: The Making and Unmaking of Manmohan Singh, Publisher Penguin Book Ltd.- April 2014, Page no. 215.

UGC - CARE LISTED

ISSN: 0974 - 8946

अनुसन्धान-प्रकाशन-विभागीया त्रैमासिकी शोध-पत्रिका

# शोध-प्रभा

(A Refereed & Peer-Reviewed Quarterly Research Journal)

48.2 वर्षे तृतीयोऽङ्कः (जनवरी - मार्च) 2023 ई.

प्रधानसम्पादकः
प्रो. मुरलीमनोहरपाठकः
कुलपतिः

सम्पादकः
प्रो. शिवशङ्करमिश्रः

सहसम्पादकः
डॉ. ज्ञानधरपाठकः

श्रीलालबहादुरशास्त्रीराष्ट्रियसंस्कृतविश्वविद्यालयः
( केन्द्रीयविश्वविद्यालयः )
नवदेहली - 16

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 33 | रशिया - युक्रेन युद्ध व जागतिक शांतता | प्रा.डॉ.बबिता येवले | राज्यशास्त्र विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती | | | 129 |
| 34 | बदलते जागतिक राजकारण | डॉ. विजया एन. राऊत | राज्यशास्त्र विभाग प्रमुख एन.जे.पटेल कला व वाणिज्य महा. मोहाडी जि. भंडारा (441904) | | | 132 |
| 35 | सावित्रीबाई फुले यांचे स्त्रीमुक्तीचे विचार व कार्य | स्वाती मधुकर टेंभे | संशोधनकर्ती गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | प्रा.संजय डी. गोरे डॉ . | राज्यशास्त्र विभाग प्रमुख शरदराव पवार कला, वाणिज्य महाविद्यालय, गडचांदूर, जि . चंद्रपूर | 134 |
| 36 | जागतिक शांततेसाठी पंडीत नेहरूंच्या परराष्ट्र धोरणांची प्रासंगिकता | प्रा.डॉ. दिनकर रामेश्वर चौधरी | कला व वाणिज्य महाविद्यालय, पिसी ता. चिमूर जि. चंद्रपूर | | | 141 |
| 37 | युक्रेन युद्धाचा जागतिक .रशिया" एक : अर्थव्यवस्थेवरील प्रभाव "राजकीय अध्ययन | प्रोफे.डॉ राहुल बावगे डॉ . | राज्यशास्त्र विभाग प्रमुखवसंतराव नाईक , ,शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर | प्रा .विजयकुमारघोरे | राज्यशास्त्र विभागाती , विद्यापीठ नगर नागपूर ,महाविद्यालय | 143 |
| 38 | रशिया युक्रेन युद्ध - बदलती जागतिक व भारतीय व्यवस्था | डॉ. अमर बोंदरे . | सहायक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग व्हिएमव्हीवाणिज्य, जेएमटी कला आणि जेजेपी विज्ञान महाविद्यालय, नागपूर | | | 46 |
| 39 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्राम जीवनाचा : मूलाधार | मार्गदर्शक प्राध्यापक कांबळे .डॉ .रे | चिंतामणी महाविद्यालयघुग्घुस, | संशोधकविद्यार्थी मराठी) रेधी . सुधीर बावीसकर | | 50 |
| 40 | माहिती अधिकार कायद्याच्या निर्मितीतअण्णाहजारे यांचेयोगदान | सहा. प्राध्यापक जगदीश आर.चिमूरकर | डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपूर | प्रा. डॉ. प्रमोदएस. शंभरकर | सरदार पटेल महाविद्यालय | 154 |

Shodha Prabha (UGC CARE Journal) Shri Lal Bahadur Shastri Rashriya Sanskrit

ISSN: 0974-8946
Vol. 48, Issue. 01, No.3: 2023

# रशिया युक्रेन युद्ध व जागतिक शांतता -

प्राबविता येवले .डॉ .
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,
अमरावती
इमेल : bpyeole@gmail.com

**सारांश -**

जागतिक राजकारणात महाशक्तीची भूमिका महत्वाची असतेआज आंतरराष्ट्रीय राजकारण इतके गतिमान आणि . एखादे राष्ट्र आपल्या अंतर्गत क्षेत ,संवेदनशील झालेले आहे की्रात काय करते किंवा कोणते निर्णय घेते हा त्या राष्ट्राचा अंतर्गत प्रश्न आहे असे म्हणून थांबण्याचा हा काळ नक्कीच नाही है कोरोना संकटावरून निदर्शनास आलेले आहेशेजारी राष्ट्र आपल्या देशात . करीत असलेल्या कृतीने जर एखाद्या राष्ट्रांची किंबहुना सर्व जगाचीच सुरक्षीतता धोक्यात येत असेल तर इतरांचा हस्तक्षेप क्रमप्राप्त ठरतोयुक्रेनने नाटो गटात शामिल होण्याच्या घेतलेल्या निर्णयाने रशियाला वाटणारी असुरक्षीतता आणि रशियाच्या कम्युनिस्ट . दडपणातून बाहेर पडण्यासाठी युक्रेनने नाटोचा निवडलेला पर्याय या दोन्ही राष्ट्रांच्याभूमिका त्यांच्या राष्ट्रीय हिताचा केंद्रबिंदू मानून त्यांच्या जागी योग्यच आहेपण या युद्धाचे जागतिक परिणाम अतिशय धोकादायक ठरून त्याची झळ कमी अधिक प्रमाणात सर्वच . त्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांनी पुढाकार घेव .देशांना सोसावी लागेल आणि जागतिक शांततेचा भंग होईल्न संवाद आणि चर्चेच्या माध्यमातून यावर उपाययोजना करण्याची गरज आहे.

**की - वर्ड्स** -नाटोराष्ट्रीय हीत ,जागतिक राजकारण ,, जागतिक शांतता ,आंतराष्ट्रीय संघटना ,G -8

**प्रस्तावना -**

विद्यमान काळात प्रत्येक राष्ट्र आंतरराष्ट्रीय घटनांचे संदर्भ लावतांना आपल्याराष्ट्रीय हिताला इतके प्राधान्य देतात की त्यामुळे जागतिक परिणाम खुजे समजण्याची मानसिकता रशिया .युक्रेनसारख्या संघर्षांना जन्म देते - फेब्रुवारी २०२२ पासून रशिया युक्रेन - त्यांच्या कारणांचे अध्ययन केल्यास असे आढळते की दोन्ही राष्ट् .युद्धाची सुरुवात झालीरांच्या यासंबंधातील भूमिका परस्परभिन्न असून आपआपल्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणाऱ्या आहेतप्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश या भूमिका समजून घेणे व त्यावरील उपायांवर चर्चा . .करण्यापुरता मर्यादित आहे

**उद्दिष्टे -**

१.जागतिक राजकारणाची पार्श्वभूमि अभ्यासणे (
२ (रशिया व युक्रेनच्या राजकीय संबंधाचा अभ्यास करणे.
३.युक्रेन युद्धाच्या कारणांचा अभ्यास करणे - रशिया (
४.जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या उपायांचा अभ्यास करणे (

देशांनी एकत्र येवून युनायटेड स्टेट्स ऑ १५मध्ये रशियात बोल्शेव्हिक क्रांतीनंतर रशियासहित १९१७फ सोव्हिएट रशिया नावाचे संघराज्य स्थापित केले .मध्ये युक्रेन यु १९२२ .एसया दरम्यान रशियन १९९१ते १९२२ .मध्ये शामिल झाला .आर .एस . .संघराज्यात युक्रेन एक मोठी अर्थव्यवस्था होती२६ डिसे १९९१ रोजी सोव्हिएट रशियाचे विघटन झाले आणि सोव्हिएट युनियनमधून १५ राष्ट्रे बाहेर पडली त्यांनी आपल्या स्वातंत्र्याची घोषणा केली.

**रशिया - युक्रेनमधील तणाव -**

सोव्हिएट युनियनमधून बाहेर पडल्यानंतर युक्रेनने नाटोचे सदस्यत्व मिळविण्याचा व युरोपियन राष्ट्रांशी जवळील साधण्याचा इतकेच नव्हे तर युक्रेनवरील व .पासून सुरु केला २००८प्रयत्न रील दोन मुद्यांना आपल्या निवडणुकीचा अजेंडा बनवून बरेच अध्यक्ष निवडणुकीत विजयी झालेले आढळतातनतर युक्रेनच्या राजकीय घडामोडींना आपल्या पद्धतीने वळवण्याचा प्रयत्न सतत रशियाकडून . मध्ये युक्रेनचे अध्यक्ष बनले विक्टर यानुकोविच २०१४व २०१० .नंतर केलेला आढळतो १९९१हे रशियाचे समर्थन करणारे होतेत्यांनी . नंतर रशियाने २०१४ .युक्रेनचे धोरण रशियाकडे वळवले आणि अमेरिकाऐवजी त्यांनी रशियासोबत व्यापारी संबंध प्रस्थापित केले .टप्याटप्याने युक्रेनचे तुकडे पाडण्यास सुरुवात केलीप्रथम क्रिमीयावर वर्चस्व प्रस्थापित केले आणि नंतर डॉनेत्स्क आणि लुहान्सच्या भागातील लोकांना चेतवून या दोन देशाला स्वतंत्र देश म्हणून घोषित केलेवरील तिन्ही प्रांत नैसर्गिक संसाधनाच्या दृष्टीने संपन्न भाग . .असून युक्रेनला दुबळे करण्याचा हा रशियाचा प्रयत्न होता

**रशियाच्या दृष्टीने युक्रेनचे महत्व -**

Shodha Prabha (UGC CARE Journal) Shri
Lal Bahadur Shastri Rashriya Sanskrit
ISSN: 0974-8946
Vol. 48, Issue. 01, No.3: 2023

१.राजकीय ( आर्थिक व भौगोलिक दृष्टीने विचार करता रशियानंतर युक्रेन सोव्हिएट संघातील मोठे राष्ट्र आहेयुक्रेन रशियासाठी , या सर्व गॅस .महत्वपूर्ण आहे कारण युरोपियन राष्ट्रांना नैसर्गिक गॅसचा पुरवठा करणारा रशिया सर्वात मोठा निर्यात देश आहे .पाईपलाईन युक्रेन मधून जातात२०१४ मध्ये रशिया .युक्रेन संघर्षाच्यावेळी युक्रेनने या सर्व गॅसपाईप लाईन उध्वस्त केल्याचे आढळले .[१] २युक्रेनची युरोपीय संघाशी साधली जाणारी जवळीक .भौगोलिक दृष्ट्या पूर्व युरोप आणि रशिया यांना जोडणारा भूप्रदेश युक्रेन आहे ( रशियाच्या अर्थव्यवस्थेला दुर्बल करू शकते असे रशियाला वाटते.

३ युक्रेनचे अध्यक्ष विक्टर यानुकोविच नंतर युक्रेनचे नवीन अध्यक्ष पेट्रो पोरोशेनको हे अमेरिका समर्थक व रशियन विरोधक होते त्यांनी ( मध्ये नवनिर्वाचित अध्यक्ष व्होदिमि २०१९ .सत्तेवर आल्यावर युरोपियन युनियन सोबत व्यापारी संबंध वाढविलेर झेलेन्स्की यांनी ही पूर्वीच्याच अध्यक्षाच्या पाठपुरावा केला आणि २०२१ मध्ये अधिकृतपणे नाटोकडे सदस्यत्वाची मागणी केली.[२] युक्रेनचे नाटोमध्ये जाणे रशियाला कधीच मान्य नाहीयुक्रेन जर नाटोच्या लष्करी गटात शामिल झाले तर रशिया चहुबाजूने आपल्या शत्रू राष्ट्रांनी . वेढला जाईल व नाटो 'एकासाठी अनेक' या तत्वाने कार्य करीत असल्याने या भागात अमेरिका व त्याच्या समर्थित राष्ट्राचे वर्चस्व वाढेल व रशियाच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका उत्पन होईल म्हणून युक्रेनवरचा दबाव वाढविण्याचा रशिया सतत प्रयत्न करीत आहेत्यामुळे युक्रेनव .र आक्रमण करून त्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न रशिया करीत आहे .

**युक्रेनची भूमिका** :यासंबंधात युक्रेनला काय वाटते हाही भाग महत्वाचा आहेपर्यंत सोव्हिएट युनियनचे एक सशक्त १९९१ते १९२२ . राष्ट्र बनून राहिलेला युक्रेनला आता रशियाच्या कम्युनिस्ट दबावातून बाहेर पडण्याची तीव्र इच्छा आहेयाला काही कारणे जबाबदार . .आहेत असे अभ्यासाअंती आढळले

**पहिले** म्हणजे १९४५ पासून १९९१ पर्यंत सोव्हिएट रशिया व अमेरिका यांच्यात असणाऱ्या शीत युद्धामध्ये नाईलाजाने सहयोगी राष्ट्र ओढले गेलेसोव्हिएट रशियाची समाजवादी अर्थ .व्यवस्था सहयोगी राष्ट्रांना आतून दुर्बल करीत असतांनाही ती वाचविण्या सोबतच शीतयुद्ध सुरु ठेवण्याचे आव्हान या सहयोगी राष्ट्रांना नाईलाजाने स्वीकारावे लागत होतेत्यापैकी एक युक्रेन होता त्यामुळे वरवर . सोव्हिएट रशिया महाशक्तीच्या रुपात जगापुढे वावरत असला तरी आतून सहयोगी राष्ट्रांमध्ये असंतोष घुमसत होता.[३]

**दुसरे** सोव्हिएट युनियनमध्ये शामिल झाल्यामुळे समाजवादी अर्थव्यवस्था स्वीकारण्याचे बंधन सहयोगी राष्ट्रांवर होते . च्या दशकात सोव्हिएट युनियन १९८० :समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर सरकारची मालकी असते परिणामत आर्थिक दृष्ट्या अमेरिकेच्या तुलनेत मागे पडू लागला आणि अमेरिकेच्या तुलनेत रशियाचा JDP ५०वर आला सोव्हिएट संघाची अर्थव्यवस्था % त्यामुळे युक्रेनच्या मनात .दुर्बल झाली आणि ज्या देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी होते त्या देशाच्या सीमाही खिळखिळ्या होत असतात असंतोषघुमसू लागला.[४]

**तिसरे** १९१७ ला स्थापन झालेल्या सोव्हिएट संघात १५ राष्ट्रे सहभागी झाली असली तरी ते केवल एक राजकीय संघटन बनले एक राष्ट्र नाही %७युक्रेनमध्ये .कारण यातील बरेच सहयोगी राष्ट्र विविध धर्मांचे प्रतिनिधित्व करीत होते ,पेक्षा जास्त लोक इसाई धर्मांचे आहेत कथोलिक १० ,%रुढीवादी ६७डोमेन्स्क व लोहान्य या भागात मुस्लिमांची संख्या अधिक ,क्रिमीया .आहे %१५ - व इतर धर्मीय % .आहे जे रशिया समर्थक आहेत[५] युक्रेनमध्ये रशिया समर्थक व रशिया विरोधक असे दोन गट आहेत त्यामुळे युक्रेनचा मोठा जनसमूह पूर्वीपासूनच सोव्हिएट रशियाला आपले राष्ट्र मानत नाही त्यामुळे सोव्हिएट रशियात एकता प्रस्थापित होऊ शकली नाही.

**चौथे** सोव्हिएट रशियाने स्वीकारलेल्या सैनिक हस्तक्षेपामुळे रशियाची प्रतिमा आणि ताकद याबाबत जागतिक लोकमत खराब झालेले होते विशेषतया दरम्यान रशि १९८८ते १९८०अफगाणीस्तानमध्ये :याने केलेल्या सैनिक कार्यवाही नंतर १९८९ मध्ये कट्टर पंथीयांमुळे सोरशियासाठी नामुश्की आढेवणारी .ही घटना सो .रशियाला अफगाणीस्तान मधून आपल्या फौजा काढून घ्याव्या लागल्या . .होती

**पाचवे** सोव्हिएट रशियामधील सहयोगी राष्ट्रे रशियाच्या कम्युनिस्ट एकाधिकार शाहीच्या सतत दडपणाखाली वावरत होती . यातून बाहेर पडण्याचा .कट्टरपंथीय कम्युनिस्टांची मनमानी वाढल्यामुळे सहयोगी राष्ट्रांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले होते रश .त्यापैकीच एक युक्रेन होता ,नियनच्या विघटनाने सहयोगी राष्ट्रांना मिळालाच्या सोव्हिएट यु १९९१मार्ग ियाच्या कम्युनिष्ट वर्चस्वापासून बाहेर पडण्यासाठी या सहयोगी राष्ट्रांना एकच उपाय वाटतो व तो म्हणजे NATO गटात शामिल होणे खाजगीकरण , वर अमेरिकेच्या एकाधिकार शाहीची पकड असतांना ही राष्ट्रे उदारीकरण व जागतीकीकरणाच्या या काळात जागतिक राजकारण अमेरिकेच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करीत आहेत .NATO गटात गेल्यामुळे अमेरिकेशी जवळीक व रशियाला पायबंद हे दोन्ही उद्देश सफल होतील म्हणून यापैकी लिटोव्हिया मधेच २००४लुथुआनिया व इस्टोनिया .NATO गटात शामिल झालेतर्वोर्सा करारात शामिल . १हंगेरी व झेक गणराज्य ,असणारे माजी सदस्य पोलंड९९ मधेच NATO सहभागी झालेमाल्डोनीया सदस्यत्व मिळण्याच्या प्रतीक्षेत , युक्रेनला नाटो गटात मध्ये युक्रेनचे राष्ट्रपती वोलो डीमीर झेलेन्स्की यांनी अमेरिकन राष्ट्रपती जो बाइडेन ला २०२१जानेवारी .आहे .शामिल करण्यास मदत करण्याची विनंती केली होती[६]

Shodha Prabha (UGC CARE Journal) Shri Lal Bahadur Shastri Rashtriya Sanskrit
ISSN: 0974-8946
Vol. 48, Issue. 01, No.3: 2023

**बड्या राष्ट्रांची भूमिका -**

रशियाच्या कृतीचा विरोध करण्यासाठी बड्या राष्ट्रांकडून प्रयत्न झाले . अमेरिका सर्व पश्चिमी राष्ट्रे युक्रेन चे समर्थन करीत आहेत .जाहीत असे नाही G-8 मधून रशियाला बाहेर काढण्यात आलेकेलेल्या व २०२२फेब्रुवारी १९रशियन राष्ट्रपती व्लादीमीर पुतीनने , रशियन भाषिकांचा निषेध म्हणून २२ फेब्रु ला अमेरिकाजर्मनीने नॉर्ड स्ट्रीम , इंग्लंड व अन्य सहयोगी राष्ट्रांनी रशियावर आर्थिक प्रतिबंध लावले , .पाईपलाईन प्रोजेक्ट अडवून धरला २४ रशियाच्या पश्चिम भागातून अमेरिकेच्या नेतृत्वात NATO गटाने युक्रेनच्या सीमेवर सैन्याची जुळवा जुळव केली परंतु युक्रेन हा NATO चा सदस्य नसल्यामुळे NATO कडून कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

**संयुक्त राष्ट्रांची भूमिका -**

पार्श्वभूमीत युनोच्या भूमिकेवर बरेच प्रश्न निर्माण होत असतात युक्रेन युद्धाच्या . रशियाचे आक्रमणसंयुक्त राष्ट्रसंघ ने रशियाने या युद्धामुळे सर्वसामान्य .युक्रेनमध्ये चाललेल्या मानवीसंहाराच्या चौकशीसाठीचा ठराव मानवाधिकार समितीने मंजूर केलेला आहे " .फ्रिकन राष्ट्र सेनेगलचे अध्यक्ष मिस्टर सॅल म्हणतात कीआ .नागरिकांचे जीवन होरपळले जात आहेआमचे देश जरी या युद्धापासून दूर असले तरी या आर्थिक संकटाचे बळी ठरले आहेतपूर्व आणि लॅटिन अमेरिकेतील इतर देशाच्या वतीने ही बाजू मांडील , आशिया खाद्यपदार्थांचे उत्पादन या धान्यापासून होते पण युरोप मधला युक्रेन आणि रशिया जगाचे कोठार आहेत जगभरातील अनेक "आहे अहवालाचाची हे युद्ध लादल्यामुळे अन्नधान्याच्या किमती दुपटीने वाढल्या आहेत असे मत अमेरिकन अध्यक्ष जो बायडेन यांनी मांडले." युनोचे महासचिव अँटोनिओ गुटेरसनेसुद्धा युद्धामुळे अन्न संकटाची समस्या बिकट झाल्याचे मत व्यक्त केलेवरस्थितीची जाणीव असून ही या य.द्धात युनो ची भूमिका इतर घटनाप्रमाणे हतबल झाल्याची आहेत्या युनोच्या आमसभेत रशियाच्या निषेध २०२२मार्च २ .होता देश अनुपस्थितीत राहिले त्यात भारत ३५देशांनी मान्यता दिली १४१करणारा ठराव मांडला गेला त्याला युनोच्या सुरक्षा परिषदेत हा ठराव मांडला गेलाभारत स .ुरक्षा परिषदेचा अस्थायी सदस्य असल्यामुळे भारताने अमेरिकेच्या बाजूने मतदान करावे अशी अमेरिकेची इच्छा होती पण आपल्या परिपक्वतेचा परिचय देत भारताने मतदान प्रक्रियेत भाग न घेवून अमेरिकेचा रोष ओढवून घेतला

**निष्कर्ष -**

युक्रेन युद्धाचे - वरील अध्ययनावरून रशियाचा कारणांचा अभ्यास केल्यास असे आढळते की ,

१रशियाने भविष्यात आपल्यावर वर्चस्व प्रस्थापित .युक्रेनला रशियाच्या अदृश्य साम्राज्यवादी दडपणातून बाहेर पडायचे आहे . युक्रेन नाटो ग .त्याला अमेरिकेच्या नाटो गटात शामिल व्हायचे आहे करण्याचा प्रयत्न करू नये म्हणूनटात शामिल झाल्यास रशियाच्या सुरक्षिततेला बाधा येईलया .आशिया खंडात अमेरिकेचा प्रभाव वाढेल आणि रशियाचे महत्त्व कमी येईल ही भीती रशियाला वाटत आहे , बा व रशियावर होणारे प्रतिबंध यामुळे साम्यवादी रशिया विरुद्धयुद्धात बड्या राष्ट्रांकडून युक्रेनला मिळणारा पाठीNATO असा संघर्ष अप्रत्यक्षपणे आहे याची परिणती पूर्ण युरोपीय राष्ट्रे विरुद्ध रशिया या युद्धात होऊ शकते. युनो मात्र नेहमीप्रमाणे हतबल आहे. रशिया युक्रेन संघर्षावर उपाय शोधण्याऐवजी सुरक्षा परिषदेत महासत्ता राजकारण करतांना आढळतात.

२ या युद्धाचे जागतिक परिणाम .बड्या राष्ट्रांऐवजी गरीब राष्ट्रांना भोगावे लागत आहे – कारण युक्रेन व रशियाकडून आफ्रिकेतील राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची निर्यात होते त्यात अडसर निर्माण झाल्यामुळे आफ्रिकन राष्ट्रांमध्ये अन्नसंकटाची समस्या निर्माण झालेली आढळते.

३ .या युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतांना आढळतो .

**शेवट :** थोडक्यात रशिया – युक्रेन युद्ध स्थानिक पातळीवर वाटत असले तरी त्याचे परिणाम जगव्यापक आहेत्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांनी पुढाकार घेवून वाटाघाटी व चर्चेच्या माध्यमातून त्यावर उपाय शोधण्याची नितांत गरज आहेबड्या राष्ट्रांनी आपले राजकीय .राजनय बाजूला ठेवून यावर योग्य पर्याय निवडण्याची गरज आहे हेतू किंवा

**संदर्भ -**

1. Russia – Ukraine war, from dnaindia.com
2. नाटोचा विस्तार ,en.m.wikipedia.org
3. Ukraine Russia Conflict – en.m.wikipedia.org
4. रशियाच्या युक्रेन युद्धातून धडाजाने ११ , हिंदू .द .संपादकीय , २०२२
5. Russia and Ukraine, Maharashtra time – March 2022
6. रशिया युक्रेन वाद ,http//www.bbc.com.marathi
7. Edition with Sujit Nair : US War India of Consequences Dec 2022


Platinum
A Peer Reviewed National Multidisciplinary Journal

# Index


- **Gandhian Philosophy of Satyagraha** ........ 7
  - *Dr. Santosh Narayan Kayande*
- **Relevance of Mahatma Gandhi's Nonviolence Today** ........ 10
  - *Dr. Chandrashekhar Malviya*
- **Non-Violence of Mahatma Gandhi** ........ 13
  - *Mr. Gajanan. D. Tayade*
- **Gandhism the Panacea for 21st Century Maladies** ........ 16
  - *Dr. Anagha P. Sonwanshi*
- **The Relevance of Gandhian Thought for International Peace** ........ 18
  - *Mr. Awadhut Vitthal Borkar*
- **Mahatma Gandhi and Indian Literature: A Brief Outline** ........ 21
  - *Aakansha R. Bhambar*
- **Mahatma Gandhi : An Ideology Towards Peaceful World and Social Upliftment** ........ 24
  - *Prof. Gajanan B. Ingle*
- **महात्मा गांधी आणि अहिंसा** ........ २७
  - *प्रा.डॉ.योगेश दु. उमाळे*
- **महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य** ........ ३०
  - *डॉ.प्रशांत शिंदे*
- **म.गांधीजींच्या ग्रामराज्याच्या विचारांची प्रासंगिकता** ........ ३३
  - *प्रा डॉ. ममता शिवदास पाझीकर*
- **गांधी–आंबेडकर भावविश्वाचा अन्वयार्थ** ........ ३६
  - *डॉ. अशोक इंगळे*
- **महात्मा गांधी : स्वराज्याची संकल्पना** ........ ३९
  - *डॉ. ए. डी. जाधव*
- **महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्यासंबंधीचे विचार** ........ ४२
  - *-प्रा.डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड*
- **महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना** ........ ४६
  - *प्रा. डॉ. कविता केकरे*
- **महात्मा गांधीची सत्य व अहिंसा संकल्पना** ........ ४९
  - *प्रा. डॉ. मनिषा शंकर यादव*
- **महात्मा गांधिजींचा स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग (महिलांचे विशेष संदर्भात)** ........ ५१
  - *प्रा. डॉ. शिवा भानुदास बोचे*
- **महात्मा गांधी यांच्या अर्थशास्त्रीय विचारांची प्रासंगिकता** ........ ५४
  - *डॉ. एस. के. जाधव*
- **महात्मा गांधी आणि राज्यविरहित समाज** ........ ५६
  - *प्रा. डॉ. संतोष महादेवराव शिंगाडे*
- **भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महात्मा गांधीजींचे योगदान** ........ ५९
  - *डॉ.जयवंत शिवाजी दुकरे*

- महात्मा गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाची अनिवार्यता !! ............ ६१
  - प्रा. रेखा दि. अहाव
- महात्मा गांधीच्या सत्याग्रह व अहिंसा या संकल्पनेचे अध्ययन ............ ६६
  - सहा.प्रा.नासीर कासम शेख
- महात्मा गांधीजींचे स्वराज्य संबंधी विचार ............ ६८
  - प्रा. गोपालकृष्ण श्री. राखोंडे
- महात्मा गांधी यांची स्वराज्य संकल्पना............ ७०
  - प्रा. गुलाब डी. शेंडे
- महात्मा गांधीच्या अहिंसा संकल्पनेची प्रासंगिकता............ ७२
  - श्री राम शत्रुघ्न कुनघरे
- महात्मा गांधींचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान............ ७४
  - देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके
- भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ॲनी बेझंट यांच्या आर्थिक विचारांचे योगदान ............ ७७
  - प्रा. सचिन कोटेकर

# महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना

[illegible]


सारांश

[illegible]

करणे ही सामाजिक सक्षमीकरणासाठी गांधीजींना अभिप्रेत वाटत होते. ग्रामीण विकासात शासनाने समन्वयकाचे व फक्त निधीदात्याची भूमिका पार पाडावी असे गांधीजींना वाटत होते. परंतु गांधीजींच्या या विचाराप्रमाणे आज भारतातील खेड्यांची स्थिती फार समाधानकारक आहे असे नाही पण खेड्यात बदल झालेच नाही असेही म्हणता येणार नाही. आज खेड्यात रस्ते, मुलामुलींच्या शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामपंचायती, बँकामार्फत आर्थिक सहाय्यता, विजपुरवठा व दळणवळण, पाणी पुरवठा व सिंचन, बचत गट, ग्रामोद्योगांना शासनाद्वारे प्रोत्साहन या बाबींबद्दल झालेले बदल सिद्ध करीत आहेत. मग आजही गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची संकल्पना ही केवळ पुस्तकांच्या चौकटीत आदर्शवत राहिली का हा प्रश्न निर्माण होतो. गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेला पूर्णत्व देण्याचा प्रयत्न भारतातील काही भागात होत असून हा सकारात्मक बदल [illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]

प्रस्तावना :

[illegible]

ग्रामस्वराज्याचा अर्थ :

[illegible]

आणि अकार्यक्षम प्रतिनिधींना परत बोलावण्याचा अधिकार जनतेला असावा. सत्ता विकेंद्रीकरण उर्ध्वगामी असावे. गावात सामाजिक समता, राजकीय सहभागीत्व आणि आर्थिक स्वावलंबन असावे. ही मूलतः त्यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना होय.[१] ग्राग्रामस्वराज्याचा मुख्य पाया शेती सुधारणा, रोजगारनिर्मिती, सामान्य व्यक्तीच्या दैनंदिन गरजांचे गावाकडून व्यवस्थापन आणि पूर्तता, गावाच्या गरजा भागवून उर्वरित मालाचे शहराकडे विपणन, शेतीमालावर आधारित उद्योगाचे गावातच व्यवस्थापन, व त्यातून येणाऱ्या आर्थिक लाभाचा गावविकासासाठी उपयोग. या सर्व व्यवस्थापणाचे सर्वाधिकार ग्रामपंचायतीकडे असावेत. त्यासाठी गावागावात ग्रामपंचायतीची स्थापना असावी. निपक्ष आणि खुल्या वातावरणात ग्रामपंचायतीच्या निवडणुका व्हाव्यात व निर्वाचीत गावप्रतिनिधींनी वरीलप्रमाणे ग्रामस्वराज्य स्थापित करण्यास प्रयत्न करावेत असा अर्थ होता.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलन काळात खेड्यापाड्यात फिरतांना ग्रामीण जीवनातील साधेपणा, परस्पराविषयीची आपुलकी, जिव्हाळा, गावात आढळणाऱ्या सांस्कृतिक परंपरा आणि रूढी, त्याआधारे त्यातील होणारे जनजीवन यासर्वांची जाणीव महात्मा गांधींना होती. पण त्याच्या जोडीला ब्रिटिशांकडून खेड्याचे होणारे आर्थिक शोषण व पिळवणूक, त्यातून निर्माण झालेली गावातील दरिद्रता, गरिबी, निरक्षरता व परावलंबित्व, अस्वच्छता व अजागरूकता, पारंपारिक घराघरातून बंद पडलेले उद्योग, त्यातून निर्माण झालेली बेरोजगारी व उदासीनता या सर्वांमुळे खेड्याची दूर्दशा झालेली आहे. ह्याची जाण ही गांधीजींना होती त्यामुळेच त्यांनी भारताच्या विकासाचा पर्याय 'ग्रामस्वराज्य' या संकल्पनेत शोधला.[२]

**ग्रामस्वराज्य व भारतीय खेडी :**

एकूणच वरील अभ्यासनातून असे आढळते की, स्वच्छ, आरोग्यदायी, स्वयंशासीत स्वयंपूर्ण खेड्याचे ग्रामस्वराज्याचे व विकेंद्रित ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वप्न म्हणजेच गांधीजींची रामराज्याची संकल्पना होती. सैद्धांतिक दृष्ट्या ही संकल्पना खूप आदर्शवादी वाटत असली तरी प्रत्यक्षात आणणे अशक्य नाही. हे काही खेड्याच्या विकासावरून निदर्शनास येते. ग्रामस्वराज्याची संकल्पना साकार करण्याचे कार्य अहमदनगर जिल्यातील हिवरे बाजार, राळेगण सिद्धी, वडगाव, चंद्रपूर जिल्ह्यातील घाटकुळ ग्रामपंचायत, औरंगाबाद जिल्ह्यातील सरपंच भास्करराव पेरे पाटील यांची पाटोदा ग्रामपंचायत याचे उत्कृष्ट उदाहरण होय.

आज महाराष्ट्रात २७००० ग्रामपंचायती आहेत त्यापैकी पाटोदा ग्रामपंचायत प्रथम क्रमांकाची असून ती औरंगाबाद शहरापासून ७ की.मी. अंतरावर आहे. गावात ३३५० लोकसंख्या १५० चौ. कि. मी. क्षेत्रफळात राहते. गाव १००% शौचालय युक्त असून पिण्याच्या पाण्यासाठी गावात ठंड पाणी मोफत आहे. वापरण्यासाठी २४ तास पाणीपुरवठा त्यासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प, ओला व कोरड्या कचऱ्यावर आधारित कंपोस्ट खत प्रकल्प, शासकीय कर्मचाऱ्यासाठी बायोमेट्रीक, शासकीय कर्मचारी समन्वयकासाठी मोबाईल ग्रुप, लोकसंख्येच्या दुप्पट फळझाडे, जेष्ठ व वृद्धांसाठी बाग व आरामदायी खुर्च्या, गावात सौरदिवे व बायोगॅस, ग्रामस्थांची वाढदिवस साजरे होण्याची प्रथा. या गावाचे वार्षिक उत्पन्न ५० लाख रु. असून ग्रामपंचायतीला बाहेरचे नागरिक जी देणगी देतात त्या जमाखर्चाचा ताळेबंद सार्वजनिक रुपात प्रकाशित केला जातो.[३] स्वच्छ व पारदर्शी प्रशासन, प्रामाणिकता व सचोटी आणि कार्यक्षमता यामुळे पाटोदा गावाने आजतागायत असंख्य पुरस्कार प्राप्त केले असून ते आता डिजिटल खेडे होण्याच्या मार्गावर आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील राळेगणसिद्धी परिचित नसणारा माणूस भारतात विरळाच. १९७५ सालापूर्वी या गावात दुष्काळ, दारिद्र्य, कर्ज व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात होती. परंतु अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनात सर्व गावकऱ्यांच्या सामुदायिक प्रयत्नाने आज राळेगण सिद्धी महाराष्ट्र व इतर राज्यात एक आदर्श गाव म्हणून भूमिका निभावत आहे. पाणीटंचाई ही मुख्य समस्या असणाऱ्या या गावाने प्रचंड वृक्षारोपण, पाणलोट क्षेत्रनिर्मिती पावसाच्या पाण्याची साठवण करून दूर केली. अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात गावाने प्रत्येकाचे स्वतंत्र सौर पॅनल, चार मोठे बायोगॅस सयंत्रे, गावात पवनचक्की, रस्त्यावर सौर दिवे, कृषी सिंचन,सामाजिक वनीकरण, गोबर गॅस, समाजकल्याण इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केलेली असून गाव १००% व्यसनमुक्त आहे.[४]

१९९० पासून अविरोध सरपंच म्हणून निर्वाचित होणाऱ्या पोपट पवार यांच्या हिवरे बाजारला ग्रामपंचायतीने आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक संपादित केलेला आहे.२६ जानेवारी १९९० रोजी श्री. पोपट पवार यांनी पहिल्या ग्रामसभेच्या बैठकीत सामान्य नागरिकांच्या गरजा ओळखल्या व त्या अनुषंगाने पिण्याचे पाणी पुरवणे, गुरांना चारा, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा, रस्ते, बीज, रोजगार व सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम इत्यादी सवलती उपलब्ध करून दिल्यात.[५] श्री पवार यांनी १९९८च्या आधी गुन्हेगारी प्रतिमा असलेला हिवरे बाजाराचे एका आदर्श गावात रूपांतर केले. चारापाणी वरील प्रतिबंधाने २००१- ०२ मध्ये गवताचे उत्पादन ५००० टनापेक्षा जास्त वाढले. वृक्षतोडबंदीमुळे बायोमास ९००,००० झाडांनी वाढविला आहे. दारूबंदी मुळे मनुष्यबळाच्या कार्यक्षमतेत वाढ झाली, सामाजिक व आरोग्यविषयक सुधारणेसाठी ग्रामपंचायतीने काही महत्त्वपूर्ण बदल केले जसे लग्नापूर्वी एच. आय. व्ही. टेस्ट अनिवार्य केली. आशिया खंडातील सर्वात श्रीमंत गाव म्हणून त्याची नोंद आहे.[६]

राळेगणसिद्धी हिवरे बाजार यांनी आपल्या गावातील रोजगाराचे प्रश्नच सोडविले नाहीत तर दुग्धव्यवसाय, पशुपालन, गांडूळ खते निर्मिती व विक्री प्रकल्प शेतमालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न केले आहेत.

ग्रामस्वराज्याचा हा प्रयोग महाराष्ट्र पुरताच मर्यादित नसून छत्तीसगड या घटक राज्यातील नवनिर्वाचित सरकारने ग्रामीण केंद्रित विकासाला प्राधान्य दिले आहे. छत्तीसगड प्रांत हा आदिवासी बहुल भाग असून येथे एकूण २०,००० पेक्षा जास्त गावे आणि त्यासाठी १०,८०० ग्रामपंचायती आहेत या ग्रामपंचायतींसाठी छत्तीसगड सरकारने सुरू केलेले सुराजी गाव योजना हा अभिनव उपक्रम सुरू केलेला असून ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाने नरवा (वाहणाऱ्या लहान-

सहान ओहोड व नाल्यांचे संवर्धन करणे), गरूवार (पशुपालन)गरवा (उत्पादन वाढ) आणि बाडी(काडी कचऱ्यापासून खत तयार करणे) असे चार महत्त्वाचे उपक्रम हाती घेतले." या उपक्रमासाठी गावातीलच मनुष्यबळ योग्य दिशेने वापरून उपजीविकेची साधने मजबूत करणे आणि त्यातून अर्थार्जनाच्या संधी वाढविणे आवश्यक आहे. भाकड व मोकाट गुरांचा प्रश्न छत्तीसगड ने गोठ्यांच्या माध्यमातून सोडवला आहे. ग्रामपंचायतिच्या जवळपास चा पाण्याची सोय व सावली करणारा दहा एकराचा परिसर कुंपणाने बंदिस्त करून काही काळ मोकाट जनावरांची त्यात सोय करणे व त्यातून मिळणाऱ्या शेणावर महिलांचे गांडूळ खत प्रकल्प चालतात. प्रत्येक घरातील व्यक्ती आपले वैयक्तिक शेणखत दोन रुपये किलोने गावकऱ्यांना विकून पैसे मिळू शकतो. या योजनेचे फलित म्हणजे तीन वर्षांच्या काळात राज्यातील ७५% ग्रामपंचायतीस हे काम पोचले. शेतीमध्ये सेंद्रिय खताचा वापर महिला, युवक, भूमिहीन व गुराखी अशा वंचित घटकांना काम म्हणजे वर्षभर गावातच रोजगार उपलब्ध झाला. सेंटर फोर मॉनिटरिंग इकॉनोमी या संस्थेने मागील महिन्यात जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार छत्तीसगडमध्ये बेरोजगारीचा दर कमी झालेला आहे.

केवळ छत्तीसगड नव्हे तर तेलंगणा मधील गंगा देवी पल्ली ग्रामपंचायत, गुजरातमधील भोसरी किंवा खेडमधील आदिवासी भागातील आर्थिक समावेश प्रकल्प, राजस्थान मधील पिंपळी आणि नाणी युपी मधील मिर्झापूर इत्यादी सर्व ग्रामपंचायती या दृष्टीने महत्त्वाची कार्य करीत आहेत.[८]

**शेवट**

यावरून असे निदर्शनास येते की, गांधीजींच्या ग्राम स्वराज्याच्या संकल्पनेत त्यांना जे जे अपेक्षित होते ते करण्याचा प्रयत्न भारतातील काही ग्रामपंचायती मधून आणि काही घटक राज्यातील सरकारांकडून होत आहे. त्यामुळे त्या खेड्यांची स्थिती बऱ्यापैकी सुधारत असल्याचे चित्र आपणास आढळते. स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांच्या काळात गावात प्राथमिक सुविधा उपलब्ध झाल्या असल्या तरी आता खेडी स्मार्ट करणे, डिजिटल करणे यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सरकारी योजना आदर्श ग्राम पुरस्कार यामुळे गावागावात स्पर्धात्मक वातावरण निर्माण होऊन खेड्याची सुरुवात गुणवत्ता वाढण्यास प्रोत्साहन मिळत आहे हे मान्य केलेच पाहिजे. या संकल्पनेला व्यवहारात आणण्यासाठी जे अनेक घटक जबाबदार आहेत त्यात सर्वाधिक महत्त्वाचा घटक युवा पण कार्यक्षम नेतृत्व, राजकीय इच्छाशक्ती व योजनेच्या अंमलबजावणीसाठी नोकरशाहीच्या कार्यक्षमतेचे बरोबर जन सहभागाची जोड होय. यामुळे पुढील अल्पावधीतच ही संकल्पना व्यवहारात आणण्याची ग्रामपंचायतींची संख्या आणि वेगाही वाढेल असे सिद्ध होते.

संदर्भ :-


१. एम. के. गांधी. ग्रामस्वराज्याची संकल्पना, ग्रामस्वराज्य विकीपिडीया
२. गांधीवाद, तारक काटे, संपादकीय लोकसत्ता दि. १८ मे २०२२ पृ. ७
३. पाटोदा, एक आदर्श गाव, http//www.marathisrushti.com
४. राळेगणसिद्धी – आदर्श भारतीय खेडे, mr.vikaspedia.in
५. https//mr.m.vikipedia.org
६. विकासाच्या दृष्टीने. http//mrmetubharail.com
७. गांधीवाद, तारक काटे, संपादकीय, लोकसत्ता दि. १८ मे २०२२ पृ. ७
८. Ideal Village in India, http//globalgrashopper.com


□ □ □

Azadi Ka Amrit Mahotsav

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

ऋते ज्ञानान्न मुक्तिः

# Srujan Prabhat

## A Biannual Research Journal

ISSN : 2249-1171 | Volume - II | October 2022 | Issue - II

## SPECIAL EDITION

Government Vidarbha Institute of Science And Humanities (Autonomous), Amravati
NAAC Re-accredited 'A' Grade with CGPA 3.32

# ••● अनुक्रमणिका ●••


| | | | |
|---|---|---|---|
| 01 | Administration of Cantonment Board | Capt. Dr. Sunil Ingale | 1-3 |
| 02 | Panchayat Raj and Women Empowerment | Dr. Santosh Sambhaji Dakhare | 4-7 |
| 03 | Whither Local Self Government ? Expectations and Reality | Prof. Satish Dandge<br>Dr. Sushil S. Kamble | 8-12 |
| 04 | Challenges before Rural India and Sustainable Development | Dr. Sadhana S. Khandar<br>Dr.Vaishali L. Deshmukh | 13-16 |
| 05 | Sisterhood as the Political Value in Improvising Rural Women's Leadership through Local Self- government in India | Rohini Arunrao Gaidhane | 17-20 |
| 06 | Women in Local Self Government | Siddharth Ravindra Rote<br>Anil Vimal Narayan Narwade | 21-26 |
| 07 | Panchayati Raj Development in India | Dr. Dipak Krishnarao Raut | 27-30 |
| 08 | Local Self- Government and Rural Development | Triveni Sureshrao Watgule | 31-33 |
| 09 | Challenges before local self Government | Dr.Prashant D.Satpute | 34-40 |
| 10 | Local Self-Government in a Federal Democracy | Dr. Pavan D.Tayade | 41-46 |
| 11 | Local-Self Governance and Peoples Empowerment : The Indian Experience | Awadhut Vitthal Borkar | 47-52 |
| 12 | Sustainable Development Goals and Village Development | Vaishnav S Kadu | 53-58 |
| 13 | Rural Government and Women Leadership in India | Dr. Sunita P. Manwar | 59-63 |
| 14 | Sustainable Development and Gram Rajya Gandhian Perspective | Dr. Sukhadev Sadashiv Undare | 64-67 |
| 15 | गावो-गावचं महिला पायदळ | भीम रासकर | 68-72 |
| 16 | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाची वाटचाल | डॉ. नंदाजी राघोबाजी सातपुते | 73-77 |
| 17 | ७३ वा घटनादुरुस्ती कायदा व सामाजिक परिवर्तन | प्रा. विजया एच. राऊत | 78-81 |
| 18 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास - एक राजकीय अवलोकन | प्रा.राजेंद्र घोरपडे | 82-86 |
| 19 | ग्रामीण विकास योजनांचे विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. भारती कृष्णराव देशमुख | 87-89 |
| 20 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकासाची दिशा व दशा | डॉ. बालासाहेब जी. जोगदंड | 90-95 |

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | पेसा (PESA) कायद्याचा आदिवासींच्या जीवनावरील परिणाम | महेंद्र बी. भगत | 96-100 |
| 22 | ग्रामीण समुदाय व नेतृत्व विकास | प्रा.मनिषा किर्तने | 101-103 |
| 23 | स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास एक चिकीत्सक अध्ययन | प्रा.डॉ.प्रशांत खेडकर | 104-108 |
| 24 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला नेतृत्व | सौ. प्रतिभा विश्वनाथ पांचाळ, डॉ. ए. एच. कदम | 109-112 |
| 25 | पेसा कायद्याचे आदिवासींच्या दृष्टीने महत्त्व, कमतरता व तोटे | प्रा. डॉ. प्रतिभा अशोक भोरजार आशिष संतोष गवार | 113-115 |
| 26 | स्थानिक स्वराज्य आणि महिला नेतृत्व | अश्विनी पांडूरंगजी भोजने | 116-121 |
| 27 | पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) कायदा (PESA ACT) १९९६ : एक अवलोकन | शाम महादेव कोरांगे | 122-126 |
| 28 | पंचायत राज आणि ग्रामीण विकास | नामानंद गौतम साठे | 127-129 |
| 29 | ग्रामपंचायत निवडणूक सुधारणा आणि निकालांचे दावे | प्रा. डॉ. विनोद को. गायकवाड | 130-132 |
| 30 | पंचायत राज व्यवस्थेचा विकास | रुपाली तुळशिराम तोडकर | 133-137 |
| 31 | पंचायत राजव्यवस्थेत महिलांचा सहभाग | डॉ.आर.जी.सुरळकर | 138-140 |
| 32 | भारतातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व महात्मा गांधीजींच्या विचारांची समकालीन प्रासंगिकता | मयूर गिरीश पेठकर | 141-145 |
| 33 | भारतातील पंचायत राज व्यवस्था | प्रा. सचिन जयस्वाल | 146-148 |
| 34 | स्थानिक स्वराज्य संस्थेसमोरील आव्हाने | विशाल उद्धवराव देशमुख | 149-153 |
| 35 | कोलाम जमातीच्या समस्या आणि उपाय एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. आर. एस. खंडारे डॉ. अरूण धों. चौहान | 154-158 |
| 36 | नेतृत्त्वाची भूमिका आणि आदिवासींचा विकास एक विश्लेषण | प्रा. डॉ. व्ही. एच. भटकर | 159-161 |
| 37 | पंचायत राज – महिला नेतृत्व | प्रा. डॉ. बबिता येवले | 162-165 |
| 38 | स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाची वाटचाल | डॉ. रामचंद्र हरिभाऊ बुटले | 166-171 |
| 39 | अनुसूचित क्षेत्र विकासात पेसा ची भूमिका | आशिष सुधाकरराव निमकर | 172-177 |
| 40 | ग्रामीण स्थानिक स्वशासनाचे महत्त्व | प्रा.डॉ.विलास आबा गायकवाड | 178-182 |
| 41 | भारतीय लोकशाहीत स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका | डॉ. हनुमंत फाटक | 183-185 |
| 42 | स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला नेतृत्व व सहभाग– एक राजकीय सिंहावलोकन | डॉ. कन्नोजवार तुळशिराम नितिन | 186-190 |

| | | | |
|---|---|---|---|
| 43 | स्थानिक स्वराज्य आणि महिला नेतृत्व | डॉ. अर्चना ज्ञा. पाटील | 191-195 |
| 44 | स्थानिक स्वराज्य आणि महिला नेतृत्व | प्रा. देवेंद्र उत्तमराव ठाकरे | 196-199 |
| 45 | ७३ वी घटना दुरूस्ती व पंचायत राज व्यवस्था | डॉ. सुनंदा तिडके | 200-202 |
| 46 | स्थानिक स्वराज्य संस्थेसमोरील आव्हाने | डॉ. प्रशांत विघे | 203-207 |
| 47 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला नेतृत्व | अमित पुरूषोत्तम इंगोले<br>प्रा.डॉ. विनायक कोडापे | 208-211 |
| 48 | महात्मा गांधी आणि ग्रामीण विकास | डॉ. डी.के. खोकले | 212-214 |
| 49 | स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला नेतृत्वाचा विकास : एक अवलोकन | प्रा.डॉ.शुद्धोधन एस. गायकवाड | 215-219 |
| 50 | स्थानिक स्वराज संस्था आणि महिला सबलीकरण | डॉ. स्वप्ना त्र्यं. लेंडे | 220-224 |
| 51 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि गांधी विचारांची प्रासंगिकता | डॉ. विष्णु पुंजाजी पवार | 225-229 |
| 52 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास विषेश-संदर्भ:- गोंदिया जिल्हा | डॉ. एच. पी. पारधी | 230-235 |
| 53 | स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व | प्रा. मेघराज आर. शिंदे | 236-237 |
| 54 | ग्रामव्यवस्थेचा ऱ्हास व नागरीकरण | डॉ. दिनेश स. धाकडे | 239-242 |
| 55 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्थानिक लोकांचा लोकसहभाग | प्रा. डॉ. आशिष दि. काळे | 243-245 |
| 56 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि गांधीवादी विचारांची प्रासंगिकता | डॉ. प्रविण जयकृष्ण गुल्हाने | 246-250 |
| 57 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास | डॉ. एल. जी. सोनुले | 251-253 |
| 58 | सत्तेचे विकेंद्रीकरण व ग्रामस्वराज्याची संकल्पना | डॉ. पंकज परसराम नंदेश्वर<br>डॉ. प्रिया अनिरूद्ध सांगोले | 254-256 |
| 59 | महात्मा गांधी यांची स्थानिक स्वशासन संकल्पना | डॉ. प्रमोद एम. तालन<br>डॉ. निना चवरे | 257-259 |
| 60 | स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण विकास | प्रा. डॉ. कल्पना एस. गोडघाटे | 260-263 |
| 61 | ग्रामीण विकासात स्थानिक शासनाची भूमिका | प्रा. डॉ. चावरे एम. व्ही. | 264-267 |
| 62 | महात्मा गांधीचे सर्वोदयी विचार आणि ग्रामीण विकास | प्रा. डॉ. रविंद्र भणगे | 268-276 |
| 63 | ग्रामीण विकास आणि महिला नेतृत्व (विशेष संदर्भ चंद्रपूर जिल्हा) | प्रा. डॉ. राजेंद्र सदाशिव मुद्दमवार | 277-282 |

| | | | |
|---|---|---|---|
| 64 | शाश्वत विकासाची उद्दिष्टे आणि भारतातील ग्रामीण विकास | डॉ. विशाल विष्णू रोटे | 283-284 |
| 65 | सौरऊर्जा : ग्रामीण भागाकरिता शाश्वत ऊर्जा | सुभाष ज्ञानेश्वरराव गोटफोडे<br>प्रा. डॉ. किशोर वि. साबळे | 285-293 |
| 66 | ग्राम स्वराज्य व रोजगार हक्क | प्रा.डॉ. अशोक ना. भोरजार<br>प्रा. डॉ. वनिता चोरे | 294-296 |
| 67 | पंचायत राज व्यवस्थेमुळे बदललेला ग्रामीण विकास | डॉ. देवलाल सुखदेवराव आठवले | 297-301 |
| 68 | स्थानिक स्वराज्य संस्था व महिलांचे राजकीय सक्षमीकरण | कौस्तुभ श्यामशिल भोपळे | 302-304 |
| 69 | महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील पंचायतराज | डॉ. भालेराव सुधाकर नारायण | 305-308 |
| 70 | ग्रामीण समुदाय व नेतृत्व विकास | प्रा.मनिषा किर्तने | 309-311 |
| 71 | भारतातील पंचायतींचे संघटन आणि अधिकार | सविता सु. घरजारे<br>विक्रम भ. ठाकरे | 312-319 |
| 72 | शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये आणि भारतातील ग्रामीण विकास | डॉ. ममता विजयराव पाथ्रीकर | 320-324 |
| 73 | ग्रामीण आर्थिक विकासाचे एक अध्ययन | ओंकार नागोराव ढोले | 325-330 |
| 74 | नागपूर जिल्हा परिषदेतील महिला प्रतिनिधित्वाचे पक्ष व प्रवर्ग निहाय विश्लेषण १९९२-२०१२ | डॉ. असिम खापरे<br>डॉ. राहुल बावगे | 331-334 |
| 75 | स्थानिक स्वराज्य संस्था व महिला नेतृत्व पंचायतराज मधील पंचकन्या - शोध व बोध | मयुरी लाड | 335-340 |
| 76 | स्थानिक स्वशासनाच्या निर्णय प्रक्रियेत महिला प्रतिनिधीचा सहभाग | लिमंत्रिका भगवान नवघडे<br>प्रा. डॉ. एल. एच. नंदेश्वर | 341-343 |
| 77 | पंचायत राज व्यवस्था का इतिहास और गांधीवादी विचारो की प्रासंगिकता | डॉ. ए. डी. जाधव | 344-350 |
| 78 | पंचायत राज व्यवस्था में महिला नेतृत्व | सायत्रा दिगंबर मकेश्वर | 351-353 |
| 79 | अचलपूर नगरपालिका का विकास एवं महिलाओं की सहभागिता | डॉ. माया एस. वाटाणे | 354-357 |

Srujan Prabhat
A Unique Research Journal
ISSN : 2349-3135
Srujan Prabhat / Vol. IV/ Issue -11 / Oct. 2021

# पंचायत राज – महिला नेतृत्व
## (Women Leadership in Panchayat Raj)

**प्रा. डॉ. बबिता [illegible]**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, [illegible]
Email :-bpyeolegmail.com

**सारांश :–**

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या संदर्भात झालेल्या ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने महिलांना स्थानिक राजकारणात हक्काचा राजकीय प्रवेश मिळाला. महिलांच्या राजकीय जागरूकतेचा अभाव असल्यामुळे पहिले एक दशक प्रॉक्सी किंवा डमीप प्रतिनिधी म्हणून त्यांनी कौटुंबिक सहकार्याच्या आधारावर कार्य केले पण आज मात्र त्या स्वेच्छेने, राजकारण समजून घेवून राजकरणात प्रवेश करित आहे.

आजमितील भारतात स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा सहभाग एकूण प्रतिनिधींच्या तुलनेत १.३ दशलक्ष आहे. सहभागी महिलांची केवळ संख्याच वाढली नाही तर त्यांचा गुणात्मक दर्जाही सुधारत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या ग्रामीण प्रशासनात उच्च विद्याविभूषीत महिलांचे प्रमाण वाढलेले आढळते. जसे – भक्ती शर्मा, छावी राजावत, शहनाज, आरती देवी इत्यादी. दुसरे महिलांच्या जिव्हाळ्याचे किंवा दैनंदिन प्रशासनाच्या कार्यात महिला नेतृत्व अग्रक्रम देतांना दिसतात जसे – पाणीपुरवठा, इंधन व्यवस्था, सौर दिवे इत्यादी महिला नेतृत्वाने गावविकासात शिक्षणाला अधिक महत्व दिल्याचे आढळते विशेषत: शाळेतील गळतीचे प्रमाण शून्य करणे, मुलींच्या शिक्षणाला अग्रक्रम, आरोग्य विषयक तरतूदी करणे इत्यादी राधादेवी, भक्ती शर्मा, शेतकऱ्यांना स्वस्त दरात शेती मशागतीचे संसाधने उपलब्ध करून देणारी पद्माबी आजाम अश्या महिला राजकीय दृष्टया सक्रीय आहेत.

परंतु हे करतांना त्यांना विविध प्रश्नांना सामोरी जावे लागत आहे. मतदार स्तरावर, सभागृहातआणि सभागृहाबाहेरही महिलांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनात फारसा फरक पडलेला नाही. राजकीय प्रशासनाच्या अनुभवाचा अभाव, पुरुष कर्मचाऱ्याकडून कामाच्या ठिकाणी होणारा लिंगभेद, महिलांच्या चारित्र्यावर संशय, कामाच्या ठिकाणी पोषक वातावरणाचा अभाव, नातेवाईकाकडून अवाजवी हस्तक्षेप इत्यादी महिलांच्या नेतृत्वात ग्रामपंचायतीत सुधारणा झाल्या असल्या तरी Covid- 19 च्या पार्श्वभूमीत महिलांनी अधिक कार्यक्षमतेने काम केलेले आढळते पण त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी अधिक प्रयत्न केले गेले तर भारतीय खेड्यांचा चेहरा बदलून गांधीजींच्या स्वप्नातील भारत साकार होईल.

२२ डिसे. १९९३ रोजी लोकसभेने ७३ वी ७४ वी घटना दुरुस्ती करून जशी ग्रामीण व शहरी प्रशासनात सुधारणा केली. तशी महिलांच्या स्थितीतही सुधारणा झाली. १४ एप्रिल १९९३ पासून या विधीनियमाची अंमलबजावणी सुरु आहे. या घटना दुरुस्तीमुळे महिला बदलल्या सुरुवातीचे एक दशक नेतृत्व करू लागल्या कारण त्यांना तसा कौटुंबिक वारसा मिळाला पण २००० सालापासून पंचायत राजव्यवस्थेत महिलांच्या सहभागाला अधिक गती आली. त्यांचे नेतृत्व वाढले. सुरुवातीचे एक दशक विशेषत: महाराष्ट्राच्या राजकारणात मतदारसंघ महिलांसाठी आरक्षित झाल्यामुळे गेल्याअनेक वर्षापासून राजकारणात मुरलेल्या पतीने आपल्या पत्नीला, आईला किंवा बहिणीला गावाच्या निवडणुकीत उभे केले. ग्रामपंचायत कार्यकारिणी सदस्य, सरपंच म्हणून त्या निवडून आल्या. 'रबरी स्टँप' किंवा केवळ सयाजी रावाची

भूमिका त्यांनी पार पाडली कारण त्यांचे राजकीय बाबतीत असणारे अज्ञान मात्र कालांतराने चित्र बदलले. पूर्वी पूर्णपणे राजकीय कार्याबाबत पतीवर किंवा सासरच्यांवर अवलंबून असणारी महिला जेव्हा गावच्या निर्णय प्रक्रियेत सामील झाली तेव्हा तिला 'पाण्यात पडल्यावर पोहता यावे' याप्रमाणे राजकारण कळू लागले. ग्रामपंचायतीचा कारभार, विकास निधी विविध योजना, भ्रष्टाचार, मिटींगचा कोरम आणि गावातील राजकारणातील बारकावे तिला कळू लागले. ज्ञान वाढले, आत्मज्ञान आले, क्रियाशील नेतृत्व आले. अधिक निकोप प्रशासन, पारदर्शी कारभार, गावाच्या विकासाचा अग्रक्रम या बाबी महिलांचा प्रशासनात सहभाग वाढल्याबरोबर येवू लागल्या त्यांचा आत्मविश्वास वाढला.

आज एकूण भारतातील पंचायतराज व्यवस्थेतील महिला नेतृत्वाचा आढावा घेतला तर त्या अधिक सक्षमपणे नेतृत्व करतांना आढळतात.

